ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | भगवद्गीताचंद्रिका |
| लेखक | : | सद्गुरु पूर्णानंद शिवराम महाराज |
| संपादक | : | माधव गोविंद भिडे |
| प्रकाशक | : | हणमंत शिवराम मंकाल, निजाम स्टेट |
| प्रकाशन वर्ष | : | १९२४ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर - २०२१

# भगवद्गीताचंद्रिका.

॥ श्रीलक्ष्मीनारायणप्रसन्न. ॥

सद्गुरुपूर्णानंदशिवराममहाराजकृत

# भगवद्गीताचंद्रिका.

संपादक,


## माधव गोविंद भिडे,

" मननामोद " " अनुक्तानुवाद " वगैरे ग्रंथांचे कर्ते,

कांहीं काळ संपादक " मुमुक्षु ".


---


प्रकाशक,

## हणमंत शिवराम मंकाल,

मु. चिटगोपा, निजाम स्टेट.

मुद्रकः—लक्ष्मण भाऊराव कोकाटे, " श्रीहनुमान "

प्रेस, सदाशिव पेठ, घर नंबर ३००, पुणें शहर.

शके १८४६

—:०:—

किंमत १ रुपाया.

# श्रीभगवद्गीताचंद्रिका.

## अनुक्रमणिका.


| अध्यायानुक्रम | नांव | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | अर्जुनविषादयोग ... ... ... ... ... | १५ |
| २ | सांख्ययोग ... ... ... ... ... ... | ३१ |
| ३ | कर्मयोग ... ... ... ... ... ... | ४२ |
| ४ | ज्ञानविज्ञानयोग ... ... ... ... ... | ४२ |
| ५ | कर्मसंन्यास ... ... ... ... ... | ५१ |
| ६ | अभ्यासयोग ... ... ... ... ... | ५८ |
| ७ | ज्ञानविज्ञानयोग ... ... ... ... ... | ६८ |
| ८ | अक्षरब्रह्मयोग ... ... ... ... ... | ७५ |
| ९ | राजविद्याराजगुह्ययोग ... ... ... ... | ८१ |
| १० | विभूतिविस्तारयोग... ... ... ... ... | ८९ |
| ११ | विश्वरूपसदर्शनयोग ... ... ... ... | ९८ |
| १२ | भक्तियोग ... ... ... ... ... ... | ११० |
| १३ | क्षेत्रक्षेत्रज्ञयोग ... ... ... ... ... | ११५ |
| १४ | गुणत्रयविभागयोग ... ... ... ... | १२३ |
| १५ | पुरुषोत्तमयोग .. ... ... ... ... | १२९ |
| १६ | दैवासुरसंपद्विभागयोग ... ... ... .... | १३४ |
| १७ | श्रद्धात्रयविभागयोग... ... ... ... ... | १३९ |
| १८ | मोक्षसंन्यासयोग ... ... ... ... ... | १४६ |

# प्रस्तावना

श्रीसद्गुरु समर्थकृपेनें आज " गीताचंद्रिका " ग्रंथाची संपूर्ण प्रत प्रसिद्ध होत आहे याबद्दल फार आनंद वाटतो. " वाऱ्या हातीं माप चाले सज्जनाचें. " श्रीतुकाराममहाराजांच्या उक्तीचा अनुभव पदोपदीं येतो. एरव्हीं केंदूरसारख्या पुणें जिल्ह्यांतील एका खेडेगांवीं श्रीशिवराम-स्वामींची कृति कशी सांपडणार ? श्रीशिवरामस्वामींची अलौकिक भक्ति व अद्वैतनिष्ठा पाहून महाराष्ट्रांतील " सगुणनिर्गुण पक्षांचा जो वज्रलेप समेट झाला आहे तो घडवून आणणाऱ्या महापुरुषांच्या मालिकेंत श्रीशिवरामस्वामी यांची गणना करावी लागते. स्वामींचीं पदें तर फारच लोकप्रिय आहेत. " प्रीति धरीं हरिपायिं । मना रे " सारख्या पदावर सांप्रदायिक कीर्तनकारानें पूर्वरंग केलेला मीं ऐकिला आहे. शके १७८५ मध्यें मुंबईस छापलेल्या " पदसंग्रह " नामक पुस्तकांत स्वामींचीं पदें घेतलेलीं आढळतात.

२. श्रीशिवरामस्वामींनीं आपल्या चंद्रिकेचा आल्हादकारक व सौम्यप्रकाश रुधिरोद्गारीनामक संवत्सरीं मार्गशीर्षांत गुरुवारीं सप्तमीस तिसरे प्रहरीं दिला. श्रीकृष्णचंद्राची गीता ही आत्मशक्ति, असून तिच्या प्रकाशाला चंद्रिका हें अत्यंत समर्पक नांव देण्यांत स्वामींची चतुराई स्पष्ट आहे. प्रस्तुत ग्रंथ ज्या नकलेवरून छापला आहे तिच्या शेवटीं स्वामींचे शिष्य अच्युत यांनीं केलेली गीतेची आरती नकललेली आहे यावरून ग्रंथ मुळाबरहुकूम असल्याचा पुष्कळच संभव आहे. नकल अगदींच अर्वाचीन ह्मणजे शके १८१३ मध्यें केलेली आहे. तथापि, नकलकाराची मुळाबरहुकूम काळजीकाट्यानें उतरून घेण्याची ओढ जागोजाग दृष्टीस पडते. नकलेचें अक्षर अत्यंत ढोबळ, सुवाच्य, वळ-णदार असें असून पोथी अथपासून इतिपर्यंत एकसारखी लिहिलेली आहे. प्रत्येक पानास सुमारें सात ओळी असून ग्रंथ खिशांत मावण्याजोगा छानदार बांधलेला आहे. प्रत्येक ओळींत वीसबावीस अक्षरें आहेत. ग्रंथ पोथीसारखा असल्यामुळें सुमारें साडेपांच इंच रुंद व साडेचार इंच लांब असा आहे.

३. शके १८३३ मध्यें छापलेल्या प्रो. पोतदार यांच्या प्रतींत

आणि प्रस्तुत छापलेल्या प्रतींत पाठभेद फारच फार आहेत. शुद्धलेखनांतील तफावत लक्षांत न घेतली तरी पुष्कळ पाठभेद शिल्लक राहतात. प्रो. पोतदारांना सांपडलेल्या प्रतींतील मंगलाचरण आणि प्रस्तुत पोथींतील मंगलाचरण यांतच महदंतर आहे. प्रो. पोतदार यांच्या प्रतींतील मंगलाचरण परिशिष्ट म्हणून प्रस्तुत ग्रंथांत दाखल केलें आहे. संशोधनाचार्य राजवाडे यांनीं टीपा दिलेल्या पाठांत उघडउघड अर्वाचीनलेल्या अनेक लेखनविशेषांचा भरणा असल्यामुळें पाठभेदांचा संग्रह केला नाहीं. शिवाय अहवालांत छापलेला भाग चंद्रिकेचा फारच थोडा अंश आहे. जिज्ञासूंनीं शके १८३३ चा भारतइतिहाससंशोधक मंडळाचा अहवाल पहावा.

४. मूळ पोथी शुद्ध तोडून लिहिलेली नव्हती. प्रस्तुत पुस्तकांत ती पद्धत स्वीकारिली आहे. मूळग्रंथ प्राचीन गद्यपद्धतीचा असल्यामुळें वाक्यांची मोडणी अंमळ कठीण आहे; तथापि शक्य व अवश्य तेथें विरामचिन्हांची योजना केली आहे. टीपा अगदींच मोजक्या दिल्या आहेत.

५. श्रीशिवरामस्वामींनीं योगवासिष्ठांतील २२८ श्लोक निवडून काढून त्यांचा दशप्रकरणात्मक योगवासिष्ठसार नामक ग्रंथ लिहिला आहे. श्रीशंकराचार्यांच्या अनेक स्तोत्रांचीं योगवासिष्ठाप्रमाणेंच समश्लोकी भाषांतरें स्वामींनीं केलीं आहेत. विशेषतः श्रीयोगवासिष्ठग्रंथाशीं स्वामींचा सुचिर व दृढ व्यासंग असला पाहिजे. कारण, स्वामींनीं रामपर पुष्कळच पदें केलीं आहेत. व योगवासिष्ठांत आलेल्या उपमा आणि दृष्टांतांचा त्यांनीं गीताचंद्रिकेंत अनेक ठिकाणीं उपयोग केला आहे. श्रीज्ञानेश्वरांप्रमाणें श्रीशिवरामस्वामींच्या वाणींत योगवासिष्ठ खेळत असलेलें दिसतें.

६. श्रीशिवरामस्वामींसारख्या सत्पुरुषाच्या प्रासादिक वाणीचा अधिकाधिक प्रसार होवो !

श्रीललिता पंचमी १८४६.

**माधव गोविंद भिडे.**

शि. प्र. म. ग्रं., पुणे
कै. म. म. डॉ. द. वा. पो
अभ्यासिका
दाखल अंक ......6934.....
ग्रंथांक 894/131
किंमत 1=00 तारीख 7/8

श्री

# ग्रंथपुरस्कार

सत्पुरुष श्रीशिवरामस्वामी कल्याणीकर यांची ' गीताचंद्रिका ' नामक अभिनव टीका रा. मंकाळ ह्यांनीं आज छापून आपलें सांप्रदाय-कर्तव्यच केवळ केलें आहे असें नाहीं तर प्राचीन मराठी सारस्वताच्या सर्व भोक्त्यांस भोजनच घातलें आहे. या प्रेमभोजनांत रा. हुप्रीकर यांनीं रा. मंकाळ यांचे तर्फे मला आंवतण देऊन गौरविलें यावद्दल मी उभयतांचा आभारी आहें.

शिवरामस्वामींचा आणि माझा थोडा ऋणानुबंधच असावा असें मला आतां वाटतें; एरवीं माझ्या आरंभींच्या शोधांत मला पुण्याच्या जुन्या बाजारांत गीताचांद्रिकेची त्रुटित प्रत सांपडून एक नवा ग्रंथ सांपडल्याचा आनंद कां लाभावा आणि पुढेंहि लौकरच केंदूर मुक्कामीं त्यांचें लघु योगवासिष्ट व चिदानंददशक कां उपलब्ध व्हावें ? आज या गोष्टीला एक तप झालें. माझी गीताचंद्रिका मी संशोधकाचार्य राजवाडे यांचे हवालीं केली व त्यांनीं आणखी एका अशाच अपूर्ण प्रतीचा पडताळा पाहून भारत इतिहाससंशोधकमंडळामार्फत ती अपूर्ण गीताचंद्रिका कौतुकानें प्रसिद्ध केली. ( भा. इ. सं. म. अहवाल शके १८३३ ) कौतुकानें म्हणण्याचें कारण त्यांतील रचना गद्यपद्य अशी मिश्र दुरंगी वाटे !

आज गीताचंद्रिका संपूर्ण प्रसिद्ध होत आहे. प्रस्तुतच्या छापील प्रतीचें मूळ शिवरामकालीन नाहीं. तें कल्याणीच्या मठांत किंवा इतर तत्संबद्ध स्थळीं शोधिलें पाहिजे. वास्तविक गोदाकांठीं म्हणजे आदि महाराष्ट्रांत जुनाट मराठी सारस्वत सडकून सांपडेल. रा. मंकाळप्रभृति मित्रमंडळीनें चांगला उपक्रम केला आहे व त्यालाच सर्वांनीं साहाय्य दिलें तर व्यापक व सर्वमान्य स्वरूप आपोआपच येईल. खुद्द शिवरामां-

चेच ग्रंथ छापून काढणें एवढें काम देखील लहान नाहीं व त्यासाठीं " पूर्णानंद कार्यालय " स्थापण्यांत आलें हें योग्य झालें.

प्रस्तुत गीताचंद्रिका पोथी परीक्षून सटीप करण्याचें सर्व संपादकीय काम माझे सन्मित्र रा. रा. माधव गोविंद भिडे 'मननामोद' कर्ते या अधिकारी विद्वानानें माझे विनंतीवरून अतिशय श्रमपूर्वक व दक्षतेनें करून दिलें यामुळें त्यांचे उपकार येथें प्रकटपणें स्मरले पाहिजेत.

रा. मंकाळप्रभृती सांप्रदायिक यांस येथें एक विनंती नम्रपणें करतों. जशा लोकापल्हीस स्वामींच्या पादुका आहेत तशा जेवढया स्वामीशीं व स्वामींच्या सांप्रदायाशीं संबंध असलेल्या पूज्य वस्तु असतील त्यांचे फोटो काढवून क्रमाक्रमानें या शिवराममालेच्या प्रत्येक ग्रंथाला त्यांतला एक एक जोडून त्यांनीं प्रसिद्ध करावा.

पुणें,
श्रावण, व ३०, १८४६.

दत्तो वामन पोतदार.

# प्रकाशकाचे चार शब्द.

**जें जें आपणांस ठावें ॥ तें तें लोकांस शिकवावें**
**शहाणे करूनि सोडावे ॥ सकळ जन ॥**

**श्री समर्थ**

मुमुक्षु जनहो !

कोऽहम् ? व किंमे सुकृतम् ? हे दोन जुनाट व सर्वतोमुखीं वास करणारे प्रश्न सकृद्दर्शनीं जितके साधे भासतात तितकेच ते विचारा-अंतीं निवृत्तीदृष्टया व प्रवृत्तीदृष्टया महत्वाचे व मननीय आहेत अशीं विचारी मनुष्याची खात्री पटल्यावांचून कधींही राहणार नाहीं. हे प्रश्न अर्थानें इतके परिप्लुत आहेत कीं, प्रत्यक्ष परमेश्वरापासोन तों क्षुल्लक प्राण्यापर्यंत सर्वांनीं आपापल्या अधिकाराप्रमाणें त्यांचीं उत्तरें दिलीं आहेत. देवादिकांचे वेद, दानवांची विरोधभक्ति, पुराणांतर्गत जड वस्तूंचे संवाद, महान् महान् अवतारी पुरुषांचीं वचनें, सुप्रसिद्ध विभूतींचे उपदेश, तत्वज्ञान्यांचे आधारभूत व स्वतंत्र विचार या सर्वांत वरील दोन प्रश्नांचींच उत्तरें आहेत. अस्तु. या विषयाचा सांगोपांग उहापोह,

परिणामकारक विवेचन व ज्ञानाचें गुप्त भांडार जर कोठें अनुभवण्यास सांपडत असेल तर तें विश्वमान्य अशा " भगवद्गीतेंत "च सांपडते. या गीतारत्नाकरांतून श्रीशंकराचार्य, ज्ञानेश्वर, रंगनाथ, वामनपंडित व लो. टिळक यांनीं शांकरभाष्य, गूढार्थदीपिका, यथार्थ दीपिका, भावार्थ दीपिका व कर्मयोगशास्त्र वगैरे एकाच किंमतींचीं पण निरनिराळी रत्नें काढिलीं आहेत. अशा प्रकारची कैक रत्नें असतील तीं आमच्या अज्ञानानें म्हणा अगर दैव-दुर्विपाकानें म्हणा आम्हास उपलब्ध नाहींत. तरी पण त्यांच्या संशोधनाचें काम आज कांहीं संस्थाकडून होत आहे व त्यांचा उपभोग घेण्यास आज आम्हांस मिळतो ही एक मोठया आनंदाची व अभिमानाची गोष्ट होय. अशाच प्रकारचे एक रत्न आज आम्हांस लाभलें आहे.

दास-पंचकांपैकीं सुप्रसिद्ध भगवद्भक्त " शिवराममहाराज कल्याणकर यांची कारकीर्द बहुतेक या मोगलाईतच गेली व त्यामुळें त्यांचे समग्र ग्रंथ अप्रकाशितच राहिले. आमचें घराणें याच महाराजांच्या सांप्रदायाचें असोन आमचे परमपूज्य तीर्थरूप महाराजांचे एक कट्टे भक्त होते. व त्यामुळें त्यांना महाराजांच्या ग्रंथांची अभिरुची लागणें साहजिकच होतें. म्हणून "गरज ही संशोधनाची जननी आहे" या न्यायानें आमच्या तीर्थरूपांनीं महाराजांच्या ग्रंथांच्या कांहीं हस्तलिखित प्रती मिळवल्या. व आपल्याप्रमाणचें इतरांनांहीं या ग्रंथांच्या मननामोदाचा लाभ मिळावा या सद्धेतूनें प्रेरित होऊन, त्यांनीं आस्ते आस्ते महाराजांचा एक एक ग्रंथ छापून प्रसिद्ध करावा असा संकल्प केला. या संकल्पास अनुसरून तीर्थरूपांनीं "भक्तिमार्ग आन्हिक, व प्रबोध सुधाकर" हे ग्रंथ छापण्याचे काम हातीं घेतलें. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, ते काम शेवटास जाण्यापूर्वीच पंचमहाभूतांनीं त्यांच्या जवळ ठेवलेले आपापले हिस्से हिरावून घेतले !! असो; त्यांच्याच आशीर्वादानें उपरिनिर्दिष्ट ग्रंथ—प्रकाशनाचें काम येन केन प्रकारेण पुरें झालें. ईश्वरी नेमानेम म्हणा, महाराजांची कृपा समजा, पूर्व संस्कार माना अगर तीर्थरूपांचा सदुपदेश म्हणा यांच्या योगानें प्रस्तुत प्रकाशकालाहीं महाराजांचे ग्रंथ प्रकाशित करावेत अशी स्फूर्ती झाली. साध्य साधण्याची

जरी महत्वा–कांक्षा असली तरी साधन सामुग्रीच्या अभावीं ती महत्वाकांक्षा सफल न होतां जागच्या जागींच विरघळून जाण्याचा प्रसंग येतो. तशीच आमची स्थिति आहे. हा देश शिक्षणाच्या व सुधारणेच्या दृष्टीनें बराच मागसलेला असल्यानें अशा प्रकारचें वाङमयविषयक ध्येय हस्तगत करून घेणें थोडेंसें कठीणच आहे. अशा परिस्थितींत " शिवराममहाराज " कृत " गुरुगीता " व " अपरोक्षानुभूती " हे ग्रंथ प्रकाशित करण्याचें काम आम्हीं हातीं घेतलें; व ते श्रीयुत खंडोकृष्ण ऊर्फ बाबा गर्दे यांनीं अत्यंत परिश्रम घेऊन शेवटासही नेलें, याबद्दल आम्ही त्याचे आभार मानावें तितकें थोडेच आहेत.

बरें, हें प्रकाशनाचें काम कोणत्याही संस्थेकडे सोपवावें म्हटलें तर त्यांना मोठमोठया व महत्वाच्या संशोधनविषयाच्या नगाऱ्यापुढें आमचें तुणतुणें कोठून ऐकूं जाणार ? म्हणून आम्ही प्रोफेसर दत्तोपंत पोतदार पुणें यांच्याकडे धाव घेतली; व त्यांनीं आमच्या विनंतीला मान देऊन हें " गीताचंद्रिकेचें " काम रा. रा. माधवराव भिडे यांच्या सहाय्यानें आपला अमोलिक वेळ खर्च करून पुरें केलें. मूळ प्रत शुद्ध करणें, टीपा देणें, प्रेसमध्यें देणें, प्रुफें तपासणें, वगैरे अथ पासोन इति पर्यंत सर्वच काम या उभयतांनीं केलें; म्हणूनच आज हा ग्रंथ वाचकांच्या हातीं पडत आहे. याबद्दल आम्हीं उभयतांचे अत्यंत ऋणी आहोंत. महाराजांच्या काव्याची रचनाशैली, शद्बचातुर्य, ओजस्विता, चटकदारपणा, व प्रसाद वगैरेबद्दल श्री. बाबा गर्दे, प्रो. पोतदार, रा. रा. माधवराव भिडे वगैरे विद्वान व अधिकारी लोकांनीं प्रशंसा केलीच आहे. तेव्हां पुन्हा आम्ही या ठिकाणीं जागा अडवण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

" शिवराममहाराजांच्या " काव्याचें प्रकाशन करण्याकरितांच आम्हीं या ठिकाणीं " पूर्णानंद " कार्यालय नांवाची संस्था स्थापिली आहे. संस्थेचे वर्गणीदार, हितेच्छू, मॅनेजर व ज्यांचा संस्थेशीं निकट संबंध येतो अशा सर्व सद्गृहस्थांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतों.

चिटगोपा<br>गणेश ४ शके<br>१८४६

आपला नम्र,<br>**हणमंत शिवराम मंकाल.**<br>प्रकाशक

॥ श्री ॥

# भगवद्गीताचंद्रिका.

श्रीमन्महागणाधिपतये नमः॥ श्रीगुरुभ्योनमः॥ श्रीसूर्यनारायणाभ्याम् नमः॥

**मूकं करोति वाचालं पङ्गुंलङ्घयतेगिरिम् ॥**
**यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥ १ ॥**

पण, आम्ही ना ऐकिली हे पद्यरचना. जे तुझी ऐकावया तुजवळी आलो. लाजसी तूं कां[1] ? बुद्धि तूझी हरिशि सन्मुख होय जैं तेंव्हांचि तुज तो सुप्रसन्न असे. झणें[2] अनुमान करिसी येथे. ॥१॥ ऐकविते पद्यरचना. परिसुनी हे संतवाणी, मग नमुनि, जी जी म्हणुनी, शिरी वंदुनि अज्ञा ॥ श्रीगुरूच्या सुप्रसादे कांही कळल्यासारिखे हे पद्यरचनाचंद्रिका आरंभिली. कैसी ? ॥ २ ॥ मी करू म्हणता, अहंते माझी नारायण रिघोनी स्वयेंची वदता जाहला. घोटोनि[3] मी पण हे. ॥ म्हणुनी श्रोता आणी

---

१. प्रस्तुत प्रास्ताविक भागांत श्रीकृष्ण हेच श्रीशिवरामस्वामींच्या मुखानें श्रीगिता सांगत आहेत असें स्वामी म्हणतात. " पण " या पक्षांतरबोधक अव्ययानें टीकेला आरंभ करण्यांत स्वामींनीं बहुत चातुर्य दाखविलें आहे. कारण मंगलाचरणांत वक्ता जो श्रीकृष्णकृपेची अपेक्षा करून द्वैत भावानें वंदन करितो त्यास परमानंद माधव " जे तुझी ऐकावया...आलों " या इशारतीच्या शब्दांनीं त्याचा वक्तृत्वाहंकारच हिरावून घेतात ! समस्त गीतोपदेशाचें तात्पर्य हे ! नव्हे ? २ एकाएकी. असें अनुमान प्रस्तुत प्रकरणीं ( येथें ) करूं नको. ३. पिऊन; ( हें मी पण ) शोषून.

वक्ता होउनी जेणें[1] निजांगे आपणाचि होवूनिया हा ग्रंथ वदवी तूं. ॥३॥ जेंवी वन्हि जाउनी सुखरूप कोणी पहुडला चेववी चेताही दोनी, आपणची जाहाला ॥ तेंवी श्रोता आणी वक्ता होउनी शिवरामवेशे प्रगट अर्थ वदेल गीताचन्द्रिकाग्रंथी. ॥ ४ ॥ ॥ धृ० ॥

॥ धृतराष्ट्र उवाच ॥

**धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ।**
**मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत संजय ॥ १ ॥**

टीका ॥ ॥ क्षेत्र जे विख्यातें[2], कुरु, अभिधानें[3], विद्वज्जन मनोरमें[4], सकळ धर्म निरंकुशत्व विराजती[5], तेथे ॥ येर येरां विजय इच्छितें[6] आमुचे (आणि[7]) पांडव, उभयता, काये करिते जाहले, ते संजया सांगे. ॥ १ ॥

॥ संजय उवाच ॥

**दृष्ट्वा तु पांडवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा ।**
**आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत् ॥ २ ॥**

जेंवी प्रळई[8] पसरिले विक्राळ कृतांतमुख, कीं काळकूट उलंडले[9], ते आवरी कवणु ? ॥ तेंवी पांडवसैन्य रचिले देखुनी, तव पुत्र गुरुप्रती जाउनी, मग काय बोले, ऐक ते राया ! ॥ २ ॥

**पश्यैतां पांडुपुत्राणामाचार्य महतींचमूम् ।**
**व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ॥ ३ ॥**

---

१ जेणें = आणि तेणें. मी पण भगवंतांनीं शोपून घेतलें आणि त्याच कारणास्तव. २ प्रसिद्ध असलेलें. ३ " कुरु " असें नांव. ४ विद्वान् लोकांच्या मनाला रमविणारें. म्हणजे ज्या ठिकाणीं धर्मचर्चा अखंड चाललेली असावयाची. ५ निरंकुशत्व: ज्या ठिकाणीं धर्माचरणास यत्किंचितही आडकाठी नसल्यामुळेंच जें शोभत होतें. ६ वीरवृत्तीस साजेल अशा रीतीनें. ७ कंसांतील शब्द अर्थजुळणीस घ्यावा. ८ प्रळयाच्या वेळीं. जग बुडण्याच्या वेळीं. ९ सांडून पसरलें.

हा कसा दळभार भासत पांडवाचा दाट ? गिरीवरदुर्ग नेणो चालताती थव थवे भवते. ॥ हा असा रणरंग रचिला बुद्धिचतुरे द्रुपदकुमरे. स्वामी तुमचा शीक्षला[1] जो सकल विद्येचा. ॥ ३ ॥

**अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि ।**
**युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ॥ ४ ॥**

अणिक येथ भलेभले, भीमार्जुनासमान क्षेत्रीं[2] जे असाधारण प्रवीण, आहेती बहु शूर, ॥ ते प्रसंगे स्वामीला सांगेन. जो युयुधान आला असे विराट महारथी आणि द्रुपदनृपवीरू ॥

**धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान् ।**
**पुरुजित्कुंतिभोजश्च शैब्यश्च नरपुंगवः ॥ ५ ॥**

धृष्टकेतुश्चेकितान तसाच काशीराजनामा वीर्यशौर्यबलाढय आले असती. अणी[3] कांही ॥ शैव्य कुंतीभोज पुरुजित् जो युधामन्यू म्हणोनी बहुत नृपवर थोर थोरही पातले असती ॥ ५ ॥

**युधामन्युश्च विक्रांत उत्तमौजाश्च वीर्यवान् ।**
**सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ॥ ६ ॥**

हा सुभद्राहृदयनंदन अर्जुनु अभिमन्यु आणि ही द्रुपदनृपवरपुत्र सकळही पातले असतीच, विक्रम क्षितीवरी न माते, असे विलोकुनी सैन्य, दुर्योधन म्हणे, द्रौपदीसही पाहे पाहे महावीर ॥ ६ ॥

**अस्माकं तु विशिष्टाये तान्निबोध द्विजोत्तम ।**
**नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते ॥ ७ ॥**

ऐक आतां आमुचा दळभार. येथील वीरनायक ते प्रसंगें[4] तुज मी

---

१ तुमच्याकडून शिकविलेला. सकल शास्त्रें तुमच्या जवळ पढून तयार झालेला. २ क्षत्रियांच्या विद्येमध्यें; युद्ध कलेमध्यें. ३ हा शब्द बहुधा याच रूपांत या ग्रंथांत दृष्टीस पडतो. आणि ४ वेळ आली म्हणून.

सांगेन. गा द्रोणा ! ॥ सहज मी उद्देशवीर एक दोघे निरोपीजेतिले[2]. आदीकरूनी मुख्य पै तुज सारीखे जे जे[3] ॥ ७ ॥

**भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिंजयः ।**
**अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ॥ ८ ॥**

तूं तसाही[4] भीष्म, गंगानंदनु तेजप्रतापीसूर्य वीर विकर्ण अश्वत्थामनामा तो. ॥ पैल समंतिजे तसा तो सोमदत्ती कृपा, जयांचा[5] प्रळय व्यांपारे[6] जगत्रये संहरे, ते हे. ॥ ८ ॥

**अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः ।**
**नाना शस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ॥ ९ ॥**

येथ जेंवी पतिवृता[7] पतिलागी सर्वही देतसे, तैसेच हे मजलागी प्राणे[8] तनुमने असती, ॥ अस्त्रविद्या पारंगत, अवतार, अप्रतिमल्ल[9] हे ज्या पासुनी शस्त्रास्त्रविद्या काय गणवंती[10] ते ॥ ९ ॥

**अपर्याप्तं तदास्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ।**
**पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥ १० ॥**

क्षेत्रिया जो श्रेष्ठ, भीष्मा, पाठ हा दळवेपणाचा[11], ज्याचिया शौर्यासि लोकत्रय दिसे थोडे, ॥ पांडवाचें सैन्य निपटेची[12] थोकडे[13], वरी भीमसेन नाथ, परि काय म्हणूनी हेळेसुनी[14] बोले, ॥ १० ॥

---

१ ठळक ठळक वीर पुरुष. २ सांगितले जातील. ३ (तुज) आदि करुनि जे जे तुज सारिखे मुख्य (ते ते) ४ त्याचप्रमाणें. ५ ज्याच्या. ६ प्रळयकाळाप्रमाणें संहाराचे कामानें. ७ पतिव्रता. ८ प्राणही खर्ची घालण्यासंबंधीं, ( त्याचप्रमाणें ) देह झिजविण्याच्या बाबतींत आणि मनानें. ९ ज्यांना तोंडीस तोड असा भिडूच नाहीं असे. १० मोजवती. ११ ज्यांना शस्त्रास्त्रांच्या बाबतींत काय काय येत आहे हें कसें मोजवेल. १२ निखालस. नक्की. उघड उघड. १३ तोकडें, अपुरें, कमी. १४ धिःकार करुन.

**अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः ।**
**भीष्ममेवाभिरक्षंतु भवंतः सर्व एव हि ॥ ११ ॥**

आपुलाले बाप हो ![1] दळभार हे सरिसे करा. जे जे जया अक्षोहिणी, ती तीच आवरिजे. ॥ मीच ऐसे मानुनी भीष्माचिया बोली असावे[2]. त्यासी रक्षा. तोचि आमुचे सर्व जीवितही ॥ ११ ॥

**तस्य संजनयन्हर्षं कुरुवृद्धः पितामहः ।**
**सिंहनादं विनद्योच्चैः शंखं दध्मौ प्रतापवान् ॥ १२ ॥**

ऐकुनी दुर्योधनोक्ती, बहुतसा तोषोनी, भीष्मे सिंहनादगर्जोनी, शंखासि अस्फूरिले, ॥ दोनी नादे मिळती, तै गडगडित अंबरनिधी, सकळ त्रैलोक्य बधिरीभूत, तेणें तुष्टला नृपती ॥ १२ ॥

**ततः शंखाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः ।**
**सहसैवाभ्यहन्यंत स शब्दस्तुमुलोऽभवत् ॥ १३ ॥**

मग उदंड वाजते भेरी, निशान, मृदांग, शंखही येक येक सरेचि गजरे, शब्द घनदाटे. ॥ तेथ प्राण गळेचै[3] उभौ[4] थर थर काप सुटे शुरा. तवँ[5] पांडवाकडे काय जाहाले ऐक ते राया ! ॥ १३ ॥

**ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यंदने स्थितौ ।**
**माधवः पांडवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः ॥ १४ ॥**

काय ते गरूडाचिया हय जावळीचे[6] च्यॉरी[7] तेजें[8] सूर्य बारा लोप-

---

१ "बाप हो !" अशी सैन्यास उद्देशून हांक. २ बोली असावें=हुकुमांत वागावें. ३ प्राण गळेच = जीव गळूनच पडतो. कमर खचते. ४ उभा=उभाउभीं तावडतोब एकदम. ५ त्यावेळीं. ६ काय ते हय ! ( काय त्या घोड्यांचें वर्णन करावें ! ) गरुडाचिया जावळीचे = गरुडाचे जुळे भाऊच जणुं काय ! ७ अर्जुनाच्या रथाला चार घोडे होते असें स्वामी म्हणतात च्यारी = सारेच. कदाचित् धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे जे मोक्षाला नेणारे चार पुरुषार्थ ते सर्वही असा स्वामींचा संकेत असेल. ८ तेजस्वीपणानें.

विती, कीं मेरू दिसींचे, ॥ जेथ सारथी देव आपण, त्यारथीं बैसूनि, नर नारायणेंहि[1] दिव्य शंख स्फोरिते[2] केले ॥ १४ ॥

**पांचजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनंजयः ।**
**पौंड्रं दध्मौ महाशंखं भीमकर्मा वृकोदरः ॥ १५ ॥**

पाठिसी घालुनी पाइक, अपण हरि राहुनि पुढा, मग पांचजन्य हृषिकनायक फार अस्फारी. ॥ देवदत्त धरि धनंजय, काळ जैसा खवळला, तो ते स्फुरवि भीम आपण पौंड्रशंखाते । १५ ॥

**अनंतविजयं राजा कुंतीपुत्रो युधिष्ठिरः ।**
**नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ॥ १६ ॥**

तेही मिनले शब्द, तव तो धर्मराजा, कुंतिकुमरू, अनंत विजये-ख्यात[3], शंख ध्वनविता[4] जाहाला ॥ नकुळ पुरींत[5] सुघोष, तसाच तो सहदेव मणी पुष्पाशि त्या घनदाट घोषें काळ गजबजिला॥ १६ ॥

**काश्यश्च परमेष्वासः शिखंडीच महारथः ।**
**धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ॥ १७ ॥**

जे धनुर्विद्या विशारद काश्य आणि शिखंडी, सात्यकी आणि धृष्ट-द्युम्न, तोही विराट नृपवीरू, ॥ पाहता प्रतिनाही[6] ज्यास्सी, करि पराभव कवण त्याप्रती ? आणिकही किती![7] म्हणुनी, [8]निवडू कवण कवणाते? १७

**द्रुपदोद्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते ।**
**सौभद्रश्च महाबाहुः शंखान्दध्मुः पृथक् पृथक् ॥ १८ ॥**

द्रुपद नृपवर, द्रौपदीसुत आणि सुभद्रातनय ते महाबाहु सकळही, आपुलाले शंख अस्फूरिती ॥ तो बहु ध्वनि, तरूण कल्लोळेंचि घोष अचाट, तेणें सकळ ब्रह्मकटाह हा शतकूट[9] हो पाहे ॥ १८ ॥

---

१ नर = अर्जुन; नारायण = कृष्ण. नर नारायणांनीं. २ नादयुक्त. ३ प्रसिद्ध. ४ वाजविता, फुंकिता. ५ पुरीत, स्फुरीत, स्फुरवीत = फुंकीत. ६ तोड. सारख्या पराक्रमाचा. ७ आणिक दुसरे किती तरी तेथें वीर होते. ८ या त्यांच्या असंख्यपणामुळें. ९ शंभर वेळां कुटलेला.

**स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्।**
**नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ॥ १९ ॥**

शेषकूर्मही त्या अंघाते जगती भोरचि सांडू पाहती, मेरूमांदारादि कांपती, सींधुजळ उसळे ॥

**श्रीराम जयराम जयजय राम ॥ श्रीरामसमर्थ ॥**

जसे सुर मुनी धाकु घे, तैव आवरी हरिप्रळय, तैन्ही, तो घोष सकळ कौरवाचे हृदय विध्वंशी ॥ १९ ॥

**अथव्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान्कपिध्वजः ।**
**प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पांडवः ॥ २० ॥**

तेथ तै धृतराष्ट्रनंदन वाण वर्षति जेवीं प्रळई जळधरावली, तेंवीं सेना सज्ज जो होयें ॥ तो संभवता देखुनि रणरंग, वहु संतोषुनि,हळु, सहजलीला, धनुष उचली पंडुनंदन तो. ॥ २० ॥

**हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते ।**
**अर्जुन उवाच ॥**
**सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ॥ २१ ॥**

धनुष उचलुनि, करूनि शरसंधान, अर्जुन, मग तदा, हरिसी पाहुनि काय बोले ? परियसी राया ॥ अच्युता ! जय कृष्णजी ! दळभार उभई कडकेडाडित दोन्ही सेनामध्यें रथ नेवूनि ठेवावा. ॥ २१ ॥

---

१ आघातें. दणदणाटानें. २ पृथ्वीचे ओझें मस्तकावर आणि पाठीवर असलेले. ३ त्यावेळीं. ४ तरी देखील. ५ मेघमाला. ढगांची रांग. ६ सेन तयार ( सज्ज ) होते न. होते तोंच. ७ मग तदा = मग. संस्कृत शब्द प्राकृताच्यावरोबर सांगण्याची लकब बहुतेक प्राकृत ग्रंथकारांत आढळून येते. मिल्टन, ब्राऊन वगैरे अभियुक्त इंग्रज ग्रंथकारही इंग्रजीच्या जोडीला त्याच अर्थाचे लॅटिन शब्द वापरतात. ८ दळभार उभई = उभय दळभारीं – विशेष्याला लावावयाचा प्रत्यय विशेषणाला लावल्यामुळें विशेष्य विशेषणांचा व्युत्क्रम झाला आहे. ९ खणखणाट चालू आहे तेथें.

**यावदेतान्निरीक्ष्येऽहं योद्‍धुकामानवस्थितान् ।**
**कैर्मया सह योद्धव्यमस्मिन्रणसमुद्यमे ॥ २२ ॥**

जव सकळिका सैन्येक[1] न्याहळीत, जे झुंजावया उचलूनि आले, असति धरूनी स्पर्धही मजेसी[2] ॥ या अपार रणांगणीं कवणानिसी[3] म्या झुंजीजें[4] ते वीर म्या पाहवेचि लागती,[5] म्हणुनि,गा कृष्णा ॥ २२ ॥

**योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः ।**
**धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ॥ २३ ॥**

सहज दुष्ट स्वभाव याचा, बहुति आंगिक से धरिती,[6] पण ॥ वाढिव विहाळ[7] बांधिती युद्धविषई हे दुष्टमति दुर्योधना प्रय[8] करिती, व युध्धीस्थीर नव्हती. तरी पाहुकां आले असति ?[9] जे येथें झुंजायाँ[10] ॥ २३ ॥

**संजय उवाच ॥**

**एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत**
**सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥ २४ ॥**

हे असे सांगुनि संजय, करूनिया धृतराष्ट्र सावध, काय बोले ? ऐक राया ! वर्तले मग काये[11] ॥ ऐकुनी अर्जून, जे बोलिले गोपाळराय, दोनी सैन्यामाजी नेउनी रथ उभा केला ॥ २४ ॥

---

१ सैन्येक = सेनेक = सेनेकडे. कडेबद्दल क, पाशीं बद्दल प अडाणी लोक वापरतात. २ माझ्याशीं देखील स्पर्धा करून आहेत. ३ कवणेन सह – कोणाबरोबर. ४ मीं लढावें. ५ म्या पाहावेचि लागती = मला पाहिलेच पाहिजेत. ६ बहुति ( फार ) आंगिक ( स्वाभाविक ) से ( स्मरण ) धरिती. ७ वाढिव विहाळ = वाढ वेळ = पुष्कळ वेळ. ८ प्रय = प्रिय. हस्तदोष दिसतो. ९ युद्धीं ( लढण्यामध्यें ) जे स्थिर ( नेटाचे ) नसती ( ते ) तरी ( तर मग ) पाहुं कां आले असती ? पाहावयास कां आले आहेत ? १० ( जे येथें झुंजाया ) "आले असती" असा वाक्यशेष अध्याहृत आहे. ११ काये = काय.

**भीष्मद्रोण प्रमुखतः सर्वेषांच महीक्षिताम्**
**उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिति ॥ २५ ॥**

अणिकही आले असति जे भूप, भीष्म द्रोण आदिकरूनी, सकलही जवळिके[1] सन्मूख आहेती ॥ स्थीर करूनियां[2] आपुला रथ, अर्जुना तूं पाहे पाहे, म्हणुनिया, सर्वज्ञनाथे पार्थ चेवविलों ॥ २५ ॥

**तत्रापश्यत्स्थितान्पार्थः पितॄनथपितामहान्**
**आचार्यान्मातुलान्भ्रातॄन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा ॥ २६ ॥**

स्वस्थ होउनी पाहता, तव गोत्रकुळ[3], ते सकळही गुरू पितर अणी पितामहादिक असति ते आले ॥ मावळे[4], आचार्य, बंधू, कुमर, शालक, ईष्टमैत्रही, पौत्र आदिकरूनि, अर्जुन देखता जाहला ॥ २६ ॥

**श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयो रुभयोरपि**
**तान्समीक्ष्य स कौंतेयः सर्वान्बधूनवस्थितान् ॥ २७ ॥**

सुहृद, ससेरे, सोइरे, जे आदि[5], दोहि दळांत पाहतां गोत्र जन हा जिकडे तिकडे पार्थ सांशकी[6]. ॥ तव तया कृष्णा मग मनी वाटला विस्मय. पुढिल ही जाणता ही. तथापि, राहे उगाचि ते वेळे. ॥ २७ ॥

**कृपया परया विष्टो विषीदन्निदमब्रवीत्**
**॥अर्जुन उवाच॥ दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितं॥२८॥**

जेवीं उन्मद कामिक निज युवति विसरूनि आँन सेवी विभ्रम, तैसाचि

---

१ जवळिके = सन्मुख, अर्थ एकच ! २ प्रवृत्त केला. हालवून जागा केला. ३ गोत्र = कुल. अर्थ एकच. शास्त्रीय द्विरुक्ति. ४ मावळा = आतेचा नवरा. ५ जे आदि = आदिकरून जे. ६ पार्थ साशंकी = अर्जुन संशययुक्त ( झाला ). आपण समरभूमीवर आहोंत कीं दुसरीकडे कोठें आहोंत. आपण अशा स्थितींत लढावें कीं न लढावें अशी शंका मनांत उत्पन्न झाल्यामुळें अर्जुनाची मुद्रा साशंकी ( शंकाकुलतेची व्यंजक ) होती. ७ दुसरी.

जाहला अर्जुना तेथें. ॥ चित्र करुणे हस्तकी[1] ! शिशूनि बोले[2] " कृष्णजी ! हा गोत्रवर्गचि देखिला युद्धासी आलासे. " ॥ २८ ॥

**सीदंति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति**
**वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥ २९ ॥**

हे सकळ संग्रामी उदित होउनी आहेति आले, परि, हरि ! अपणासी कैंसे उचित हे होये ? ॥ देख ! करणे[3] विकळ झाली ! मुखहि होते कोरडे ! तनु थरथरे ! उमळति कसे आंगावरी कांटे ! ॥ २९ ॥

**गांडीवं स्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते**
**न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः ॥ ३० ॥**

पाहा ! पाहा ! जे कठिण काष्ठही भेदुनिया भ्रमर जाय तान्हि कमळकळिकेतुनी स्नेहेचि निघवेना, ॥ तेंवी शिवही जींकिले[4], त्या पार्थकरिचे निष्टले धनू, मन भ्रमी, तॉपले, निघणे बरे येथूनी. ॥ ३० ॥

**निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव**
**न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ॥ ३१ ॥**

येथ देवा ! बहुत येपरी[6] पाहता स्वजनासी समरी झुंजता बहु वोखटे होईल. मज भासे. ॥ यावरी बहवे[7] तरी धर्मादिकाते नेघवे. म्हणूनि हे प्रत्ययासी नयेची महपापे. ॥ ३१ ॥

**न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च**
**किं नो राज्येन गोविंद किं भोगैर्जीवितेन वा ॥ ३२ ॥**

कृष्णाजी ! मज विजयप्राप्ती कदापि ईच्छा नाही. केवळ निंद्यता

---

१ करुणेच्या हातांतील बाहुलें. २ बाळकासारखा बोलूं लागला. ३ इंद्रियें, अंगें. ४ " भ्रमर भेदी कोडें " वगैरे ज्ञानेश्वरींतील सुप्रसिद्ध दृष्टांत व " तुवां संग्रामीं हर जिंकिला " ही पूर्व पराक्रमांची आठवण करून देणारें श्रीकृष्णांचें चेव आणणारें भाषण यांचा येथें अनुवाद स्पष्ट आहे. ५ याचा कर्ता मन. ६ या परी = या रीतीनें पाहिलें असतां. ७ ?

मज आलिया तव राज्यसुख कांई ॥ चुकाविता येथूनि बरवे. काय अम्हा लाभूचि जाण किति ? जिणे या राज्यभोगे काय मज लाभू ? ॥ ३२ ॥

**येषामर्थे कांक्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च**
**त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानिच ॥ ३३ ॥**

जे अम्ही दिग्पाळ जिंकुनी जीवितेसी[1] विक्रमे जोडिले ते या समस्तीं भोग भोगावे. ॥ जाणते हे प्राण, निज भांडार टाकूनि झुंजावया असती आले. स्वामि ही न झुंजा यावेगा ! ॥ ३३ ॥

**आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः**
**मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः संबंधिनस्तथा ॥३४॥**

कवण हे तूं नेणसी ? ते पैल भीष्मद्रोण ! ज्याचा परम हा उपकार आम्हा. बोलवेना ती ॥ पितर, मातुळ, पुत्र, ससरे, ते पितामह, शालवादित, सोयरे अपुलेचि, म्हणुनि दोष बहु ऑथी ॥ ३४ ॥

**एतान्न हंतुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन**
**अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते ॥ ३५ ॥**

हे सुखे जे करितु अथवा येथ मारूनि घेपणे. म्या घातु याचा मनिहि करावा. हा शब्द उपसाहे. ॥ राज्यपूर्ण त्रिलोकिचे जऱ्हि हस्तकी जोडेल तऱ्हि हे अनुचितपणे जीणे.[3] मला ते कवण कार्याचे ? ॥३५॥

**निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन**
**पापमेवाश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः ॥ ३६ ॥**

आततांई हे जऱ्ही म्या मारिले तऱ्ही काय आम्हा प्राप्त ? बर सांचेल बहुधा पातकचि पदरी. ॥ मग सहज तूं दूरि होसी. बहुपरी मज जोडलासी. जसे कर्दम सरोवरासी चकोरं आव्हेरी. ॥ ३६ ॥

---

१ प्राण वेंचून. २ आहे. ३ आयुष्य. जगणें. ४ कामाचें. ५. एरव्हीं चकोर शुद्ध सरोवराचा तरी स्वीकार कोठें करीत असतो. दृष्टांत लटका ठरतो !

**तस्मान्नार्हा वयं हंतुं धार्तराष्ट्रान्स्वबांधवान्**
**स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ॥ ३७ ॥**

यास्तवचि मी युद्ध न करी. शस्त्रही न धरी. तयावरी स्वजन मारूनी सहज व्हांवे पात्र दोषाचे. मग तुझसी अंतरूनि हृदय फुटोनि मरणे सुख कदापी नसेचि स्वप्नीं तुजविण जयजी रमारमणा ! ॥ ३७ ॥

**यद्यप्येते न पश्यंति लोभोपहतचेतसः**
**कुलक्षयं कृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ॥ ३८ ॥**

हे जरी परमाभिमाने, मदेचि झांकोळित[1] जरी युद्धासि येती, तरी स्वहित अम्ही पाहंवे लागे. ॥ गोत्रगुरुकुळघात, दोष, तसेचि मित्र-द्रोह पातक. विघ्न हे चुकता अम्हासी निके[2] नव्हे काये ? ॥ ३८ ॥

**कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम्**
**कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥ ३९ ॥**

कां[3], विलोकुनि अग्नी सन्मुख त्वरित न फिरू, तरि क्षणातचि जाळुनी जाईल. तेव्हां काय मग कीजे ? ॥ तेंवि हा कुळनाश दोषही मूर्तिमंत प्रगट जाणुनी येथुनी जनार्दना कां सांग न फिरावे ? ॥ ३९ ॥

**कुलक्षये प्रणश्यंति कुलधर्माः सनातनाः**
**धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ॥ ४० ॥**

जेंवी काष्टीं काष्ट मथिता अग्नी उमजुनि[4] काष्ट जाळी तेंवी कुळवध घडत तरी कुळधर्मगति नाशे ॥ विधिनिषेध तसेची सारासार शोध न राहिले कुळ नाश मूळि हा अधर्म कुळावरिच वाजे ॥ ४० ॥

**अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यंति कुलस्त्रियः**
**स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥ ४१ ॥**

---

१ झांकलेले, मलिन झालेले. २ योग्य. बरें. हिताचें. ३ अथवा. ४ उपजुनि.
" प " बद्दल " म " पडलेला दिसतो.

हा स्वधर्मचि जाय तेव्हां इंद्रिये सैरावती[1]. मग कुळवंती ह्या अंगना ह्या सहजचि व्यभिचरती. ॥ वर्णसंकर होय. ते महापातके सुकुळी प्रवेशती चोहटाच्या बळिसी[2] जैसी झोंबती काक ॥ ४१ ॥

**संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च**
**पतंति पितरो ह्येषां लुप्तपिंडोदकक्रियाः ॥ ४२ ॥**

अणिकही कुळघातका स्वकुळासी रौरव नर्क टाकिती. नित्यनैमित्यक क्रिया मग सर्वही राहती ॥ सकळ पितरही बुडति. तै मग कवण कवणा देती लोक सांग पां अब्रह्मकुल नरकांत अप्लविजे.[3] ॥ ४२ ॥

**दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः**
**उत्साद्यंते जातिधर्माःकुलधर्माश्च शाश्वताः ॥ ४३ ॥**

कुळविनाशक वर्णसंकर कारका दोषाच करितो सकळ याती कुळा. सहित तो धर्म विध्वंसे ॥ आपुल्या सदनासी वन्ही लागता आणिखी घर जाळित तैसा सकळ कुलसह घातु हा ठेला. ॥ ४३ ॥

**उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन**
**नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥ ४४ ॥**

वर्णधर्मः कुलप्रमादु भ्रष्ट जे या प्राणियास आखंड नरकी वास म्हणुनी ऐकतची आहों. ॥ तेथुनी कल्पांतवरी परि उकल नाहीं. शाश्वतचि हे या अतःपर दोष अणिक न दिसती पाहता[4] ॥ ४४ ॥

**अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम्**
**यद्राज्यसुखलोभेन हंतुं स्वजनमुद्यताः ॥ ४५ ॥**

ऐकतो हे प्रत्यवाय. अझुनी आम्हा त्रास नुपजे. हृदय वज्राचेचि घडले नेणवे आमुचे. ॥ राज्यलोभे स्वजनगोत्र वधावया सन्निध जाहलो. दोष हा प्रत्येक्ष दिसता न फिरू अद्यापी ! ॥ ४५ ॥

---

१ आपल्या मतें वागूं लागतात. स्वच्छंद वागतात. २ चव्हाटयावरच्या बळीला ( कावळे झोंबतात ). ३ बुडविलें जावें. ४ मुळें.

**यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः**
**धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ॥ ४६ ॥**

यावरी आता जियांवे[1] त्यापरिस पण हे बरे जे शस्त्र सांडुनि या साहांवे घाव तीखेंयाचे[2] ॥ येथ याच्या हस्तकी जे मरण तेही निकेचि. परि या घोर रूपा कल्मशाची चाड मज नाहीं. ॥ ४६ ॥

**संजय उवाच ॥**

**एवमुक्त्वार्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत्**
**विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ॥ ४७ ॥**

यापरी बोलूनि अर्जुन धनुशबाण त्यजोनि. समरी न. धरवे येताची गहिवँर[3] रथिहुनी पडला ॥ जेंवी राहुग्रस्त भास्कर होय. तो. मग. कांतीहीनुं[4]तसाची मोहे ग्रासीला तो पार्थ रणरंगी. ॥ ४७ ॥

या उपरी देखोनीं पार्थ सखेदु मग सर्वज्ञनायक कवण तो परमार्थ-बोध कसा निरोपिल कीं ॥ ते पुढा बरवे कथाकवतूक वाटे परिसता श्रीनाथपदरज वंदुनी शीवराम अनुवादे ॥ ४८ ॥

॥ हरि हिः ॐ तत्सदिति श्रीमन्महाभारते शत सहस्त्र संव्हितायां भीष्मपर्वणी श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादेऽर्जुनविषादयोगो नाम प्रथमोध्यायः

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ शुभमस्तु ॥

———

१ जगावे. २ तीख = तीक्ष्ग. ३ गहिवर येताची ४ तेजोहीन.

**श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरूभ्यो नमः ॥ श्रीमार्तंड प्रसन्न ॥**

**संजय उवाच ॥**

**तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम्**
**विषीदंतमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥ १ ॥**

मग नृपाप्रति काय संजय बोलिला परिशी नृपा! शोकाकुलित तो पार्थ तेथ रुदन करीतसे. ॥ लवण उदक झळंबले. त्यापरि विराले हृदय त्याचे. पाहुनी पार्थाप्रती मग काय हरि बोले. ॥१॥

**॥श्रीभगवानुवाच**

**कुतस्त्वा कश्मलमिदं विषमेसमुपस्थितम् ॥**
**अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥ २ ॥**

अर्जुना! तूं कवणा अहासी? काय हा करितोसि अक्रम? कायसा तुज खेदु येथें येवुनी ठेला? इहपरत्रिक सुखहारी[1] अणि त्या यशासी करि विनाश. म्हणुनि हे मूर्खपण आर्यजना नव्हे जोगे. ॥ २ ॥

**क्लैब्यं मास्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते**
**क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥ ३ ॥**

हे कदा तुजमाजि समरी कृपाळुपण नसिजेचि. येणे जोडिले नाशेल हेतु युद्ध काय. नवे ॥ क्षत्रियासी कुडे[2] हृदईचे काढिले. पण त्यजुनि ऊठ तपोधना. ऐसे परिसुनी पार्थ मग बोले ॥ ३ ॥

**अर्जुन उवाच ॥**

**कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन**
**इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥ ४ ॥**

तूंचि गा मधुसूदना! हा पाहे पाहे प्रमादु कीं संग्राम अमुचे पूज्य हे द्रोणभीष्मादी. ॥ वैर ज्यासी मनिहि न धरू. ते कसे प्रत्येक्ष बाणी विंधिजे? गुरू दक्षणाही? काय उतराई! ॥ ४ ॥

---

१ सुखाचा नाश करणारें. २ वांकडें. अयोग्य.

**गुरून हत्वा हि महानुभावान्श्रेयो भोक्तुंभैक्ष्यमपीह लोके**
**हत्वार्थकामांस्तु गुरूनिहैव भुंजीय भोगान् रुधिरप्रदिग्धान् ॥ ५ ॥**

जे महानुभव गुरुवर्यासि न मारूनि मागणे भिक्षा निके. परि न धरि च वरी शस्त्र मी आता. ॥ पाहे देवा ! मारुनि हे, याचिया रुधिरी बुडावे. भोग केंवी सेविजेती. यालागि अनुचित हे. ॥ ५ ॥

**कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः**
**यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्**

दृष्टिसी तम[1] आड येता मग समिप असते[2] दिसेना, तेंवि मोहे ग्रासिले हित अहित ते नुमजे ॥ तरी निके[3] ते जाणुनी आह्मासी सांगावे, तुह्मीं. अनन्यभावें शरण शिकवी. शिष्य मी अपुला. ॥ ६ ॥

**न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो यद्वा जयेमय दिवा नो जयेयुः ॥**
**यानेवहत्त्वागजि जीविषामस्तेवस्थिताःप्रमुखेधार्तराष्ट्राः ॥ ७ ॥**

ज्यासि वैरी मारिता प्राणूचि आह्मी सांडिजे संग्रामि. व्याज करूनि-या ते हे उभे असती. ॥ ऐशिया वँधने[4] वरे, कीं हे अव्हेरूनिया निघावे, यात कवण निकें[5] करावे ते आहीं नेणो ॥ ७ ॥

**न हि प्रपश्यामि ममापनुद्याद्यच्छोकमुच्छोषणमिंद्रियाणाम् ॥**
**अवाप्य भूमावसपत्नमृद्धं राज्यं सुराणामपि चाधिपत्यम ॥ ८ ॥**

येथ पृथ्वितळींहि अपुले जाहलिया आणि इंद्रपदवी पावल्याही शोक हा नव जाये मनसीचा ॥ तूझिया करुणेविना हें चित्त केंवि निवेल? जेंवी मृतासि अमृतावाचुनी वरकँड[6] नये कामा ! ॥ ८ ॥

**॥ संजयउवाच ॥**

**एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप**
**न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तूष्णीं बभूव ह ॥ ९ ॥**

काय मोहे काळ सर्पे ग्रासिला तो. धीर अर्जुन गिरिवरू कीं प्रळय

---

१ अंधार २ असलेले ३ निश्चित ४ मारणें ५ निश्चित ६ दुसरे तिसरे.

अनळे वणवेला, काये ॥ फेडिजे ? दृष्टीसंत्रे विषे गारुडी हरीजवळी मिरवे. काय. किं घननीळ अर्जुन गिरिसी नीववीला ॥ ९ ॥ कृष्णजी ! तूं जाण आता सर्वथैव न झुंजवे, मग यापरी बोलोनि अर्जुन उगवला. तेथे ॥ अर्जुनाचे बोलणे ऐकूनि विस्मय पावला हरि. काय तेथे वर्तले ते परियैशि राया ! ॥ ९ ॥

**तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत ।**
**सेनयोरुभयोर्मध्ये विषीदंतमिदं वचः ॥१०॥**

त्याचि दो सेनामधी खेदावलो जाणूनि अर्जुन त्यापरी उमजे, धरी धिर, त्यापरीच हरी ॥ बोलु आरंभील जेंवी असाध्य देखुनि रोग अमृतसारिखे तो देत औषध रोगिया वैद्यु. ॥ १० ॥

श्रीभगवानुवाच ॥

**अशोच्यानन्वशोचस्त्वंप्रज्ञावादांश्च भाषसे ।**
**गतासूनगतासूंश्च नानुशोचंति पंडिताः ॥ ११ ॥**

जाणता तूं म्हणविशी, पण नेणिवेशिनें संडिशी ! सिकवीत होसि अम्हासी बहुधा तूंचि नितीने ॥ तूंचि कर्त्ता काय सृष्टिसि भ्रमुनि रडशी आप नेणुनि होत जात अनादि जाणुनि संत शोचतीना ॥११ ॥

**नत्वेवाहं जातु नासं नत्वं नेमे जनाधिपाः ।**
**न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम् ॥ १२ ॥**

अर्जुना तूं, मी अणिक ही ज्येष्ट; अससे हे नृपाळ अशेच असति. नासती भ्रांतिविण काये. ॥ उपजतु आणि नासते मायामयचि हे. जाण येऱ्हवी वस्तुमात्रे तेथ गमनागमन हे कैंचे. ॥ १२ ॥

**देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।**
**तथा देहांतरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥ १३ ॥**

---

१ पेटला २ विष उतरविणारा मांत्रिक ३ ऐक ४ अज्ञान ५ शहाणपणानें.

जेंवि एक शरीर वयसां भेद बहुविध जाणशी कौमारतादिक येत जाता देहि[2] तो तैसाच ॥ तेंवि घडमोडे घडे चैतन्य ते निश्चल असे हे जाणत्याला मोह दुःख कदापि तव नाही. ॥ १३ ॥

**मात्रा स्पर्शास्तु कौंतेय शीतोष्ण सुख दुःखदाः ।**
**आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥ १४ ॥**

इंद्रिये द्वारेचि अंतःकर्ण, विषया सेवितां शीतोष्ण, हर्ष विशाद. तेणे सहज ऑकळिजे. ॥ मूळिच लटिकें हे. परी दिसताहि स्वप्नापरि, असे अनित्य. म्हणुनी तूं अव्हेरू याचा संग न करी गा ! ॥ १४ ॥

**यं हि न व्यथयंत्येते पुरुषं पुरुषर्षभ ।**
**समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥ १५ ॥**

हे जयाते विषय नॉकळति. तया पुरुषासी सुखदुःख न पवति गर्भ संभव या न पांचारी. ॥ नित्यरूप सुखैकघन तो बोलखावा. लोक सुखदुःख न जातुन लिंपते. श्रुति अर्थ हा पाहता. ॥ १५ ॥

**नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः**
**उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्वदर्शिभिः ॥ १६ ॥**

मूळचि हा नसता प्रपंच. ययाशी कैचि सत्यता ? असत्याचिदानंदासि कैचा नाश उपतिष्टे ? ॥ सतअसत् या दोहिचा निष्करूं पाहता तत्व उरले संत सेविती. जेंवी जळ पयमिश्र नृपहंसु. ॥ १६ ॥

**अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।**
**विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ १७ ॥**

हा त्रिजगदाकारू पै विस्तारू ज्याचा, जेथ रूप नामादि चिन्हें

---

१ वयोमानानें. २ आत्मा. ३ शीतोष्णा विषया सेविता. ४ ताब्यांत घेतला जातो. ५ अंकित करूं शकत नाहींत. ६ याला जन्म बोलवीत नाहीं. असा मनुष्य जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांदडत नाहीं. ७ विवेक ८ पक्ष्यांतील राजा.

नसति, ते तूं जाण अविनाशू. ॥ ज्या सदोदित सर्वगासी कदापि घातु नव्हेचि केल्या. एकमेवाद्वितियमिति हे श्रुतिहि अनुवादे ॥ १७ ॥

**अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।**
**अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥ १८ ॥**

नित्य हा अविनाश. पूर्ण प्रमाण ही न पवेचि. त्या पाहता. शरीर नाशवंतचि सहज दिसताती ॥ यास्तवचि तूं झुंज. सत्यज्ञान आत्मा अणि यद्दश्यं चेतन्नष्ट म्हणोनि वेद गर्जतसे. ॥ १८ ॥

**य एनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम् ।**
**उभौ तौ न विजानीतो नायं हंति न हन्यते ॥ १९ ॥**

मी ययाते मारिता, हे सकळ मरती. हा तंनू अभिमान धरूनि मानिती, ते दोघेहि वेडे ॥ जेंवि स्वप्नामाजि व्यापारू तवचि तो साच. मग कांहीच नाही विचारिता ! तो वधक वध्य नव्हे. ॥ १९ ॥

**न जायते म्रियते वा कदाचिन्नायंभूत्वा भविता वा न भूयः ।**
**अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ २० ॥**

उपजतु नाहिच, मौ मरणासी ठाव तयासी कैंचा जाहला. होणार अथवा हेहि त्या नाही. ॥ नाशता शरीरास तो अविनाश नेणुनि भुलत आहसी हाणिल्या न्छायेसि शस्त्रे तनु मरे कांही ? ॥२० ॥

**वेदाविनाशिनं नित्यं य एनमजयव्ययम् ।**
**कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हंति कम् ॥ २१ ॥**

जो सदा अविनाश, नित्य, पुराण, अव्यय अंतरात्मा जाणतु. तो घात करी कवणासि ? तूं मारी ॥ सर्वथा तूं हन्यहननारोप नारोप पाहे कीं. ॥ २१ ॥

**किमिछिनु कस्य काममिति श्रुति हे असता ॥ २१ ॥**
**वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृण्हाति नरोऽपराणि ।**
**तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यनि संयाति नवानि देही२२**

---

१ म्हणते. २ देहाचा. ३ मग.

जेंवि जीर्णे अंबरे जाणूनि, सांडुनिया, नवी अखिंच वस्त्रें वेढिजे लौकीक पुरुषांनी; तेंवि हा चैतन्य नाथे स्वीकरी देहांतरे. तेणेंचि पालट जाहला तो काय ? मज सांगे ! ॥२२॥

**नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।**
**न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः ॥ २३ ॥**

हा अनादीसिद्ध, निरूपाधीक, विशुध्द, शस्त्रें छेदु न घडे अग्नि दाहक दहून संभवतो ॥ नाप्लवे प्रळयोदकी अणि शोषुं न पवे मारुते हा दृष्टि मना अगोचर जाण महापुरुषु ॥ २३ ॥

**अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।**
**नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥ २४ ॥**

पाहे भीषास्मातु वातःपवत इति श्रुति बोलताही ॥ आमूर्त याते दाह शोषण कवण भूत करी ? ॥ म्हणुनि शाश्वत अचळु हा परिपूर्ण नित्य सदोदित अविकारभूत विकारता, तूं जाण महाबाहो ! ॥ २४ ॥

**अव्यक्तोऽयमचिंत्योऽयमविकार्योऽयमुच्यते ।**
**तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥ २५ ॥**

चक्षुरादिंद्रिय अगोचर म्हणुनिया अव्यक्त. मनसा न पविजे. म्हणुनी अचिंत्य, विकाररहितु तो. ॥ हा असे सकळात्मकू या परि विचारुनि जाणता हा शोक पूर्ण हरेल तुझा मोह सहमुळीं ॥ २५ ॥

**अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् ।**
**तथापि त्वं महाबाहो नैनं शोचितुमर्हसि ॥ २६ ॥**

जरि तनु सरिसाचि आत्मा उपजतु मरतु असे जरी मानसील; तथापि,

---

१ अगदीं. २ व्यवहारांत लोकांनीं. ३ बुडत. ४ वाऱ्याकडून वाळविला जात नाहीं. ५ पालट (देहादिकामध्यें) होतसतांत न पालटणारा. ६ सहमुळी. निःशेष. परिपूर्णतया. ७ बरोबर.

शोकाकारणचि नांही. ॥ जेंवि गंगावोघ मिळणें अर्णवी मिळतचिसे[1] तैसे अनादि परंपरा हे जन्ममरणाचा. ॥ २६ ॥

**जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।**
**तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥ २७ ॥**

उपजते ते नासते; जे नासते ते होत पुनरपी. जेविं घटिकायंत्र[2] तेंवि परिभ्रमे जग हे. ॥ म्हणुनि पाहे जन्ममरणपरंपरा, परिहार जाणुनि, शोक करणें अर्जुना ! तुज जाण उचित नोहे. ॥ २७ ॥

**अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।**
**अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥ २८ ॥**

जन्मल्यापूर्विंच असता हे अमूर्तचि जग असे. हे जेथ जाय लयासि ते अव्यक्तरूप असे ॥ मध्य जो प्रतिभासतो आकार मायामयाचि केवळ. जेंवि स्वप्नी निजलिया हा खेदु कां येथें ॥ २८ ॥

**आश्चर्यत्वपश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ।**
**आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥२९॥**

कोणी येक निजानुभव तो कौतुकापरि पाहती. कोणी जाणुनि आश्चर्य वदती. चित्त उपरति ते ॥ येक केवळ ऐकता संसार हा विसरूनि जाती. कितीक पुनरावृत्तिने भजति श्रवणमात्रे गा ! ॥ २९ ॥

**देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ।**
**तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥ ३० ॥**

ज्यासी सर्वहि देहे देही घातु करिता ही नसे पण घातु तो विश्वात्मकू चैतन्य तूं पाही. ॥ हे स्वभावे होत जात तथापि तुज नगमेचि कांही. व्यर्थ तूं अद्यापि शोक न सांडिशी पार्था ! ॥ ३० ॥

**स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि ।**
**धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥ ३१ ॥**

---

१ मिळतचिसे=मिळताचिअसे म्हणजे मिळतच राहिली आहे. मिळतचि+असे. पूर्वरूप संधि. २ राहाटगाडगें.

जरी तुझे हे चित्त सार्द्र, तथापि समरी अनुचित. चिंतु आपुलाचि स्वधर्म. पाहुनि होई सावध गा ! ॥ स्व स्वधर्म राहटता संग्राम वाचुनिया तुह्मा क्षेत्रियासी अणिक श्रयस्कर मार्ग दुजे नाहीं. ॥ ३१ ॥

**यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ।**
**सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभंते युद्धमीदृशम् ॥ ३२ ॥**

हा नव्हे संग्राम. नेणों मूर्तिमंतचि स्वर्ग तो. हा [1]रूप आला[2] असे हातासि आपणहुनी. ॥ बहुत कीजे पुण्यराशी तरिच ऐसे लाहति क्षत्रिय युद्ध जेंवी सहज हाता रत्न [3]आढाळिजे ॥ ३२ ॥

**अथ चेत्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ।**
**ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ॥ ३३ ॥**

रणीं तूं शस्त्रे सांडुनी न झुंजता बससील जरी. असतीच कीर्ति पैल पापा वरपडा होसी. ॥ जेंवि पुरुषेहीन वनिता उपहसी पात्रे. तशीच दशा तुला गवसी स्वधर्मेविण गा पार्था ! ॥ ३३ ॥

**अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यंति तेऽव्ययाम् ।**
**संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥ ३४ ॥**

होऊनि निर्मत्सरू तूं परतसी येथूनि तरि हेंच हुकडे कवळूनि घेतील बाण वरि तुजला ॥ मग बाहू वाजेल आंगीं अपयशचि कल्पांतवरी. ते वांचणे मरणाहुनी वोखटे पार्था ! ॥ ३४ ॥

**भयाद्रणादुपुरतं मंस्यंते त्वां महारथाः ।**
**येषां च त्वं बहुमतो भूत्वा यस्यासि लाघवम् ॥ ३५ ॥**

अणिक ते तूं नेणसी झुंजावया आलासि परतसी सकणवे ते काय याला प्रत्ययासिच ये ॥ ते म्हणती "अम्हा भेउनिया पळाला. पार्थ गेला." मग अपेशपात्र होउनी पावशील पुता ! ॥ ३५ ॥

---

१ हा शब्द देहलीदीपन्यायानें दोहींकडे घ्यावा २ तोहा स्वर्गरूप आला. ३ सापडावें.

**अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यंति तवाहिताः ।**
**निंदंतस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ॥ ३६ ॥**

पळतया तुज धरुनी करिती अवकळा. तुज देखता बोलू नये ते बोलतिल. नानापरी मर्म ।। मग हिये[1] फुटोनि मरणें. त्यापरिस यासी उठोनी झुंजु नये कां सन्मुखचि हे राज्य येतसता ।। ३६ ॥

**हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।**
**तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ॥ ३७ ॥**

जरी ययासी झुजता जीवे तनुसि तूं वेचासि, तरी स्वर्गसुख हाता चढे जाताचि अनकळिता ।। जिंकिसी तरि पूर्ण पृथ्वीतळिच सगळे भोगिसी. यालागि निश्चय करूनि ऊठ झुंजावया आता. ॥ ३७ ॥

**सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।**
**ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ ३८ ॥**

येथ होये विजय तै संतोष न धरिता, तरी हा देह जाय पडेल, तेणें दुःखही न करी ।। लाभ आणि अलाभ समता करूनियां तूं झुंजता. हा दोष न लगे सर्वथैव स्वधर्म अनुसरता. ।। ३८ ॥

**एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगेत्विमां शृणु ।**
**बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि ॥ ३९ ॥**

सांख्य सुस्थिति मुकुळिता हे बुद्धि तुज सांगितली. येथे तुला निजतत्व नकळे तरी पुढे ऐक ॥ कर्मयोगे बुद्धिचा विस्तार अवधारी. अता ह्या बुद्धिहीन असता नपसी[2] कर्मबंधाते. ॥ ३९ ॥

**नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।**
**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतोभयात् ॥ ४० ॥**

ज्याचियारंभीच निष्कळ पाहता नव्हेचि निषिध्ध तथापि मोक्ष तसाचि उरला वृत्ति चोखाळे. कर्म तरि करणेंतशी निजकर्मफळलेषासि यापरि अल्प धर्महि हा भयापासुनि सरंक्षी. ॥४०॥

---

१ हृदय. छाती. २ पसी=खसी. "व" चुकीनें मुळांत राहिला आहे. हस्तदोष.

**व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन ।**
**बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥ ४१ ॥**

जेंवी सानचि दीपकलिका परि बहू तेजासि प्रगटी, तेंवि हे सद्बुद्धि[1] येकचि आत्म अवधीची ॥ आत्मयासी विमुख बुद्धिशि कर्मगुणफळरूप फांटे बहु पसरली. सुखासि कारण मुख्य सद्बुध्धी ॥ ४१ ॥

**यामिमां पुष्पितां वाचं प्रवदंत्यविपश्चितः ।**
**वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥ ४२ ॥**

येर ते दुर्बुद्धि बहुधा विकरवी. जेथे मरती अविवेकि त्या स्वर्ग संसारीच[2] बहु आस्था. ॥ कर्मफळ आसाक्ति दाउनि कर्मचि प्रतिपादिती. श्रुति आश्रय बोलति अम्हा. यावीण दुजे नाही. ॥ ४२ ॥

**कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।**
**क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥ ४३ ॥**

ह्मणति जन्मुनि करुनिया यजनादिके, मग स्वर्गसुख ते अति मनोहर भोगणें याविण दुजे न रुचे. ॥ कामनापर होउनी जे जन्मकर्मफलादि देत क्रियाविशेष न लोपवुनि विधिधर्म आचरती ॥ ४३ ॥

**भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ।**
**व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ ४४ ॥**

वेदवचनि चित्त विकुनि पुण्य सायासे उपार्जुनी,[3] भोग ऐश्वर्याचेसाटी वेचती धर्मु. ॥ जाण हे दुर्बुद्धि केवळ ईश्वरी क्षण नव्हेचि स्थीर. जेंवि जाररतस्त्रिया[4] स्वपती नव्हे स्थिरता ॥ ४४ ॥

**त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।**
**निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ॥ ४५ ॥**

त्रिगुणी हे वेद अवृर्ते. त्यांत उपनिषदादि सात्विक. येर रजतम

---

१ सद्बुद्धि, अक्षर मुळांत राहून गेले आहे. २ त्यास स्वर्गरूप संसाराचीच फार गोडी. ३ मिळऊन. ४ आवरलेले.

स्वर्गसूचक कर्मनिरुपिजती. ।। ह्मणुनि यासी अव्हेरुनी होई गुणातित. द्वंद्वविरहित शुध्ध सात्विक होवुनी आपणासि न विसंबे. ॥ ४५ ॥

**यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ॥**
**तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥ ४६ ॥**

वेद जरी बहु बोलिला. तरी जाणते अपुले हित ते स्विकरती.सारांश मात्रचि. येर टाकुनिया ॥ जाहले जरी जलमय क्षिति घेइजे अपुलेचि पुरते. मार्ग बहु दिसता जऱ्ही सकळ चालिंजती ? ।। ४६ ॥

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥ ४७ ॥**

परी अम्हिही विचारिले तव हेची गमते निके. मना, जे तुज विहितकर्मी असे अधिकार. बहुउचित ॥ परी फळें धरिसी झणी तू आंश न करि कुळकर्म संगती सत्क्रिया पाहे आचरी, हेतूसि टाकुनिया.॥४७।।

**योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय ।**
**सिद्ध्यसिध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥ ४८ ॥**

होउनि तूं योगयुक्त, तसेचि फळसंगासि त्यजुनी, करि सुखे निजकर्म, तेथें चित्त देउनिया ॥ पावले सिद्धिशि दैवि किंनिमित्त भंगले मानुनी मध्येचि ते अविकारता या नाव योगगती ॥ ४८ ॥

**दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ।**
**बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥ ४९ ॥**

फळचि कर्मि ज्यासी ते तूं कृपण जाण. ह्मणोनि जेथें मनासि बुद्धिशि ऐक्यता ते सार योगाचे ।। दूरता पाहता परी या बुद्धि योगापरिस हित कर्म निपैटकनिष्ठ जेथें फळाश बहु आथी. ॥ ४९ ॥

---

१ मार्ग पुष्कळ दिसले म्हणून सर्व मार्गांचा अवलंब करितां येईल काय ? २ आशा. ३ उघड हलक्या दर्जाचे. ४ फळाची आशा. " आश " असें रूप मागेंही आलें आहे.

**बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।**
**तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥ ५० ॥**

बुद्धियोगे युक्त जो, तो आरुता हा कर्मभोग, असे विचारूनि सुकृत दुष्कृत दोहिशी टाकी. ॥ म्हणुनी कर्मे आचरी योगस्थिति. सहज घडे जे कर्म करणे हेतुविण कौशल्यता ते हे. ॥ ५० ॥

**कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ।**
**जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छंत्यनामयम् ॥ ५१ ॥**

बुद्धियोगं योजिले जे कर्मफळ टाकूनि पारंगतचि जाहले सांडिले ते पातकी पुण्यी. ॥ सकळ कर्मी वर्तती परि कर्मबंधनातळती अयात-यात[1] गिळोनि नित्य निजात्मपदि रमती ॥ ५१ ॥

**यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति ।**
**तदा गंतासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ॥ ५२ ॥**

तूं जेव्हां मोहासि सांडिसी. संचरेल विरक्ति चित्तीं. मग तुला अक-लंक होईल ज्ञान आपैसे. ॥ मन निजानंदी विरे, तै आणिक कांहीं साधनें मागील कांहीं स्मरण ते हे सकळ राहील[2]. ॥ ५२ ॥

**श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।**
**समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥ ५३ ॥**

जे तुझी हे बुद्धि इंद्रियसंगति चळ होतसे ते श्रवणमनने मागुती स्वरूपी स्थिरा ये. जे ॥ निज समाधि सुखीच केवळ निश्चळत्व राहता. तै पावसी योगस्थिति तूं मग निजात्मसुखे. ॥ ५३ ॥

**अर्जुन उवाच—**

**स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ॥**
**स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ॥ ५४॥**

मग अर्जुन म्हणे हरिप्रती स्वामिजी ! मज हा अभिप्रायोचि सांगावा.

---

१ आयातयात जाणें येणें. २ थांबेल.

पुसेन तुम्हासि मी निरुते. ॥ वोळखावे केंवि तो स्थितप्रज्ञ अणि स्थिरबुद्धि कैसा तो समाधिसुखासि अनुभव. केंवि विरहतुसे ॥ ५४ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

**प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।**
**आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥ ५५ ॥**

तव परब्रह्मावतरणु, षड्गुणाधिकरण बोलत ऐकते. स्थितप्रज्ञलक्षण सांगतो आधी. ॥ जो मनोगत सकळ काम त्यजी निजांतरी नित्य त्रुप्त स्वरूप सुखवन लाधला, मग तोच स्थितप्रज्ञ. ॥ ५५ ॥

**दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहाः ।**
**वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥ ५६ ॥**

दुःख नाना प्राप्त होता जो मनीं उद्वेग न धरी, सुखही घडतसंताही[2] तयाची नाही मनईच्छा, ॥ तेथ रागद्वेष कामक्रोध उगमचि नाहीं त्याचा. सर्वदा परिपूर्ण स्थितबुध्दि जाणावा. ॥ ५६ ॥

**यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।**
**नाभिनंदति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५७ ॥**

जेंवि पूर्णशशांक अधमोत्तम न म्हणतचि कांति पसरी. तेंवि करुणा भूतमात्रीं पालटचि नोहे ॥ गोमटयानें तोष न पवे, खेद न धरी वोखटयानें, आत्मबोधें भरित प्रज्ञावंत तो जाणे. ॥ ५७ ॥

**यदा संहरते चायं कूर्मोऽगानीव सर्वशः ।**
**इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५८ ॥**

अणिकही सांगेन कवतुक, जे तयाचे चिन्ह कैसे इंद्रिये विषयाहुनी फिरवीतसे नियमे. ॥ कूर्म सहज अवयवा पसरी पुन्हा इच्छा वसे अवरी तसा तो योगियां[3] तूं अर्जुनावलोके ! ॥ ५८ ॥

---

१ राहटतो. वागतो. २ घडत असतांही. ३ योगी.

**विषया विनिवर्तंते निराहारस्य देहिनः।**
**रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥ ५९ ॥**

हा सकळ विषयामूळ रसनारसचि. तेणें करण विचलती. तो ही निर्विषयात्मसुख अनुभउनिया परते ॥ मग तयाचि इंद्रिये विषयासि विसरती तेधवा सोहं[1]प्रतीती प्रगटलीच दिसे निरंतरगा ! ॥ ५९ ॥

**यततो ह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः।**
**इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः ॥ ६० ॥**

जर्‍हि विवेकी जाहला, यमनियम करुनी अं[2]टाटी इंद्रिये जिंकिताहि, चोढुनि मन विषयी बुडवित ते. ॥ मग तया विषयासी मन हे सहज सौख्यसुख विसरूनि इंद्रियाची सबळता ऐशीच बा आहे ! ॥ ६० ॥

**तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः।**
**वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६१ ॥**

म्हणुनि वरकड विषय सांडुनि, ईंद्रियें मत्पर करूनिया, अखंड हृदई कवळुनि मग जाहला सुखिया. ॥ आपणाचि मग इंद्रिये आपणासी होती वस्य. प्रज्ञांवंत तोची. येर्‍हवि विषय हे करतिलची घातु. ॥ ६१ ॥

**ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते।**
**संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥ ६२ ॥**

स्मरण विषयाचे जरी चिंत्तात जाहले हे तरी निःसंगसहि ये संगते अभिलाष तो उपजे. ॥ जेथ उपजे काम तेथें क्रोध आधी पातला. तेथे असे तो सेविला संमोह तू जाण. ॥ ६२ ॥

**क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः।**
**स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ६३ ॥**

ठेविला संमोह तेणे नाश पावे स्मरण. जैंसी चंडवाते जोत आहत

---

१ "सोहं" तोच, परमात्मा, मी. अशी प्रतीति. अनुभव. २ खटपट करून.

सहज अंधारू ! ॥ भ्रंष पात्रे स्मरण तेथे बुद्धि अपणाचि अवघडे. मग ज्ञान कैंचे खवळल्या ध्याना विषयाचे ? ॥ ६३ ॥

**रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन् ।**
**आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥ ६४ ॥**

म्हणुनि विषये मनिहुनी जरी सांडिजे, मग रागद्वेष कदापि नातळती तयाला. पूर्ण मग होये. ॥ द्वेषरागे रहित रमता विषई त्यासी कदापि बाधा नसे. प्रसादिक तोचि येक धनुर्धरा ! जाण. ॥ ६४ ॥

**प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।**
**प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥ ६५ ॥**

जेथ नित्य प्रसन्नता मग दुःख कैंचे त्या आसे ? ते आपणचि परमात्मरूपी बुद्धि स्थिर राहे. ॥ जेंवी हा निर्वातिचा दीप नेणें सर्वथा तो योगयुक्त स्वस्वरूपी थोकला[1] राहे ॥ ६५ ॥

**नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ।**
**न चाभावयतः शांतिरशांतस्य कुतः सुखम् ॥ ६६ ॥**

कडसणी[2] हे युक्तिची जेथे नसें तो कवळिला विषयो रंगी. स्थीरता नसेचि कदापि बुद्धिची. ॥ नाहीं निश्चल भावना. मग तेथें शांती कशि वसे. सुख घडेल अशात कैसा प्राणिया लागी ? ॥ ६६ ॥

**इंद्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते ।**
**तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवांभसि ॥ ६७ ॥**

इंद्रिये जे जे म्हणति ते ते तसे जे करिति ते तरलेच. न तरती विषय सिंधू दुर्मना योगे. ॥ जेंवी थडिये पावली ते नाव दुर्वाते बुडे, चुकला अनर्थ फिरूनी ठाके जरी पडे विषयी. ॥ ६७ ॥

**तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः ।**
**इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६८ ॥**

---

१ स्थित; थांबलेला. २. आकळ. बंधन.

म्हणुनि अपणचि आपुल्या आयासी येती इंद्रिये. अणिकही यापरती असे काय सार्थकता ? ॥ ह्मणतील ज्याचे ह्मणी येंकरति करणे आपुली त्याचीच प्रज्ञा पातली स्थितिपूर्ण पदवीते ॥ ६८ ॥

**या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।**
**यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ ६९ ॥**

आणिकही त्या योगियाचे चिन्ह मी सांगेन. जेथे भूतजात निजत याचे पाहाट ते, जाणे. ॥ प्राणसकळही जीव जगि ती तेथ तो निद्रीत सुखी तो एक निरूपाधीक सुस्थिर बुद्धिमुनीवर्यु. ॥ ६९ ॥

**आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रवशंति यद्वत् ।**
**तद्वत्कामायं प्रविशंति सर्वे स शांतिमाप्नोति न कामकामी ॥**

जेंवि सरिता सींधुते मीळता. आधीक होउनी मर्याद न सांडी, ग्रिष्म काळी परि नव्हे साना. ॥ तेंवी सिद्धीमीसे सकळही पावता अपणासी काम तथापि, शांतिसुखे सुखावत कॉमिकू नोहे. ॥ ७० ॥

**विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चराति निःस्पृहः ।**
**निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति ॥ ७१ ॥**

आत्मबोधे बोधिला, कीं निजसुखी तो पहुडला, बरवा स्थितःप्रज्ञ, ह्मणोनी तोचि वळखावा. ॥ जीणुनी अहंकार, सकलही कामना सांडूनि, विचरे सहज विश्वामाजि, विश्वचि होवुनी, खेळे. ॥ ७१ ॥

**एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।**
**स्थित्वास्यामंतकालेऽपि ब्रह्म निर्वाणमृच्छति ॥ ७२ ॥**

पूर्ण हे ब्रह्म स्थिती जे अनुभवाति, होउनि अकाम, ब्रह्मपद ते पावती मोहासि विसरूनिया. ॥ ज्या स्थिती मिळता तनू पतनांत होय. तथापि, व्याकुळ आड ठाको न सकती. हरि सांगतो ऐसे ॥ ७२ ॥

---

१ एककली होतात. २ मला. रूप लक्षणीय आहे. ३ प्रसन्न होत. ४ कामी विषयवासनांनीं लिप्त. ५ जिंकून.

ऐकुनी हे कृष्ण वचने, मनि म्हणे तो पार्थ,आमुच्या पूर्ण उपपत्तीसी आले कर्म निरशीले ।। सद्य अमुचे युद्ध चुकले. म्हणुनि हरिखुनि करिल प्रश्न. पुढिल सुंदर ते कथा शिवराम अनुवादे ॥ ७३ ॥

हरिहिः ॐ तत्सदिति श्रीमन्महाभारते शतसहस्रसंहितायां वैयाशिक्यां श्रीभीष्मपर्वणी श्रीमद्भगवद्गीतासुपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्ययोगोनाम द्वितीयोध्यायः

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

**श्रीविघ्नहराय नमः ॥ श्रीगुरूभ्यो नमः ।। श्रीजगदंब प्रसन्न ॥**

**॥ अर्जुन उवाच ॥**

**ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन ।**
**तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव ॥ १ ॥**

मग म्हणे तो पार्थ देवा ! तूंचि कर्म निराकरिसी. जै कर्म करिता करणे, जेथ नुरेचि जे कांही ॥ ते तुझी मोक्षोपकरणी बुद्धि, संमत तुज जरी, तरि मागुतिया घोर कर्मी घालिसी मज कां ? ॥ १ ॥

**व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ।**
**तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ॥ २ ॥**

कांहि कर्मरतवशि, कोठे ज्ञानिया बडिवारू वानिसी, यापरी वाखाणिता, निर्धार[१] कवण तो आहा ? ॥ सांग ऐसे काहि, कीं, निश्चय

१ निश्चय.

करूनि जे राहटंता, कैवल्य पद ते पाविजे करुणार्णवा, देवा ! ॥ २ ॥

**श्रीभगवानुवाच ॥**

**लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ॥**
**ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥ ३ ॥**

तरि बरे अवधारितो मां दोनि निष्ठा प्रकटिल्या त्या ज्ञानयोगु कर्मयोगु योगिया सांख्या ॥ सांख्य वळेखी सर्वांचि मोक्ष प्राप्ती, कर्मे हळुहळु पद चित्तशुद्धी सुखेचि साधक पावती जाण ॥ ३ ॥

**न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।**
**न च संन्यासनादेव सिद्धिं समाधिगच्छति ॥ ४ ॥**

नाहि कर्मारंभ मूळिच केंवि गा निष्कर्म पद ते पाहिजे ? परपारनावेवीणे के[४] पावे ॥ प्राप्त कर्म अव्हेरिता निजचित्त शुध्विवीण संन्यासु, तरि सिध्धिसी संन्यास योगक्षेम नव्हे जाण ॥ ४ ॥

**न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।**
**कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ ५ ॥**

जव प्रकृति हे गुण आसति तव चेष्टिते. अपआप होती विहित मग सांडीजती काये ? स्वभाव ते गेले ॥ इंद्रिवे व्यापारू सहजे होय. स्वभादीक घडता मग त्याग म्हणतात तया अग्रहोचि उरे ॥ ५ ॥

**कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।**
**इंद्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥ ६ ॥**

उचित कर्मे सांडुनि निष्कर्म हो पाहताति कर्मेंद्रिय प्रवृत्ति निरोधुनि मनि विषय आठविती ॥ अर्जुना या नाव कर्मत्यागु जाण नव्हेचि. मिथ्याचार विषयासक्त ते निभ्रांत तूं वळखे ॥ ६ ॥

---

१ केले म्हणजे. २ मग. ३ सांख्याशास्त्राची माहिती झाल्याबरोबर. ज्ञान झाल्याबरोबरच मोक्ष प्राप्ति होते. असा शास्त्राचा सिद्धांत. ४ के=कोठें; कधीं तरी.

**यस्त्विंद्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ।**
**कर्मेंद्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ७ ॥**

ऐक चिन्हे निराशता. जो अंतरी दृढ आत्मबोध, बाह्यकरणी, कर्मे करिता, प्राकृतु जैसा. ॥ तेथिल्या ऊर्मि कदा झांकोळजेना, जेंवि उदकिं बिंत्र हाहि रवी अलिप्त. तसाच तो योगी. ॥ ७ ॥

**नियतं कुरु कर्मत्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।**
**शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ।**

कर्म जे न करू म्हणसि. तरि शरीरयात्रा कोंवि तुज घडेल? अणिखी सांग निषध जाण आचरवे. म्हणुनि मज नियमोनि हेतुविण विहित कर्मे करी. कर्मोचि कर्मविमुक्त. वर्म[2] कदापि तुज न कळे. ॥ ८ ॥

**यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः ।**
**तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर ॥ ९ ॥**

हा स्वधर्मु नित्य विष्णु स्वरूप नेणुनि अन्य धर्मी रति घडे. तै कर्म बंध न या जना घडते. ॥ म्हणुनि, कर्तृत्वासि टाकुनी, " नित्य यज्ञोवैसु विष्णु " श्रुतिसी वळखुनीया' स्वकर्म करी सदा पार्था ! ॥ ९ ॥

**सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।**
**अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥ १० ॥**

येथ तुज इतिहास सांगो. पूर्व काळीं यज्ञसहित प्रजास नियमुनी त्याप्रती विधी बोलता जाहला. ॥ देवतातर, मंत्र तंत्र उपाधि टाकुनिया स्वधर्मची रहटिजे. हा पूर्ण तुमची कामना पुरवी ॥ १० ॥

**देवान्भावयतानेन ते देवा भावयंतु वः ।**
**परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ ११ ॥**

[stamp]

---

१ तेथिल्या उर्मि झांकोळिल्या बिंबें जेंवि रवि झांकोळिजेना. हाहि (योगीरूप) रवि अलिप्त. वाक्य सुघटित नाहीं. २ रहस्य; खुबी.

हो स्वधर्में पुज्य देवा भावने पुजाल जरि, ते देवही तुमचे मनोरथ पूर्ण करतील. ॥ देवता भजताहि तुम्हि ते देवही भजती तुम्हा. यापरी परस्परे भावनेनें परम सुख पावे. ॥ ११ ॥

**इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यंते यज्ञभाविताः ।**
**तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुंक्ते स्तेन एव सः ॥ १२ ॥**

देवते निजयाग यजेति भाविजे ती मुर्तिमंतची भोग संपाति देती.तेणे मातला विषई ! मग गुरु, द्विज अग्नी वदनी नार्पुनी जो आपणची सेवी तयाते चोर म्हणहूनि काळ बहु दंडी ॥ १२ ॥

**यज्ञशिष्टाशिनः संतो मुच्यंते सर्वकिल्बिषैः ।**
**भुंजते ते त्वघं पापा ये पचंत्यात्मकारणात् ॥ १३ ॥**

येथ गुरू, गौ, अग्नि, द्विजवर उचितसे शेषे तर्पिता मग यज्ञशेष कुटुंब सहजा सादरे–भूंजे ॥ तोचि सकळहि पातकी निर्मुक्त. आंतां जे रुंचते, देव द्विज चोरोनी खाता नरक तो सेवी ॥ १३ ॥

**अन्नाद्भवंति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः ।**
**यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥ १४ ॥**

जाण अन्नास्तव भुते होताति. मग हे वृष्टि अन्ना प्रसवते. सर्वत्र नाना जीवना लागी. । त्या महावृष्टीसि जनकु यज्ञ. त्या यज्ञासि प्रकटी कर्म, त्या कर्मासी जनकुं कोण म्हणसी ? ऐक ! ॥ १४ ॥

**कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।**
**तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥ १५ ॥**

कर्मजनकु देव तोही देव जाहला अक्षरापासुनी. पाहतां, यस्य निरचसितं श्रुति गर्जे. ॥ जग चराचर ब्रह्मरूपाचि सहज आहे. म्हणुनि यज्ञो ब्रह्म साक्षाद्वर्तते सत्कर्म ओंकारे. ॥ १५ ॥

---

१ यज्ञ. २ यज्ञ करणारानें. ३ तो विषयसुख सेवनानें मातलेला पुरुष. ४ लेखून. ५ तर्पिता शेषे असा अन्वय. ६ पापापासून. ७ तोंडाला येईल तें. ८ देवा ब्राह्मणांना चोरून(वगळून). ९ भोगील. १० बाप; कारण. ११ सत्कर्माच्या रूपानें.

**एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ।**
**अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥ १६ ॥**

यापरी, स्वधर्मशुद्ध परंपरा अनुवर्त्तले, जे विषयसंगे मानला, जरि यासी ना तुष्टी, ॥ तोचि उत्कट पातकाचाराशि भूमीस भार केवळ. काय जीणें ! धिक् स्वधर्मविहिन पुरुषाचे ! ॥ १६ ॥

**यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ।**
**आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥ १७ ॥**

आप आपणामाजि होतु नित्यतृप्त अखंड रमतु शरीरधर्मे रहटता कर्मेन लिंपे तो. ॥ अर्जुना ! हा बोध बरवा जव न भेटे या मना, तंय[1] साधनी भजनेचि लागे. निश्चये जाण. ॥ १७ ॥

**नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन ।**
**न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥ १८ ॥**

जेथ निरहंकार अफलाकांक्षता बरवी असे निजधर्म आचरता तयाला पुण्यवरि नाहीं. ॥ जरी सुखेन करी तथापि, पातक बाधू न शके. कां निजानंदेचि धाले. काय मग इच्छा ? ॥ १८ ॥

**तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ।**
**असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ॥ १९ ॥**

ह्मणुनी, तूं होऊनी नियते आणि कामनारहित स्वधर्म राहट, पार्था. नित्य नैमित्यक निरंतरही. ॥ जें स्वकर्म अनुसरती निष्कामता ते पावले, नित्याभिराम पदाप्रती. असताचि या देही. ॥ १९ ॥

**कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ।**
**लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि ॥ २० ॥**

देख. जे जनकादिकाही निजकर्मजात अशेष कांहीं न संडिताचि

---

१ तव. " तय " असा हस्त दोष दिसतो. तोंपर्यंत. श्लोकांत वर्णिलेली स्थिति होयीपर्यंत.

निजात्मसुख ते पावते जाहले. ॥ लोकसंग्रहकारणार्थ तरी धरी आस्था. स्वधर्म आणिक येकार्थासि हे येईल उपकारा. ॥ २० ॥

**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।**
**स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ २१ ॥**

पातले निष्कामता जे त्यासही उरलेचि हे कर्त्तृत्व लोकालागी. यास्तव रहटिजे पार्था. ॥ म्हणुनी वडिले करिति जे तेंचि इतर अनुष्ठिति. हे जैंवि अंधे चालिजे त्या डोळसामागें ॥ २१ ॥

**न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।**
**नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥ २२ ॥**

आणिकाचा पांडु येथें काय ? मी परिया स्वधर्मे वर्ततो ! मज ऐसे सांकडे आहे. ॥ पाहता, पुरता जगीं मज समान नसेची दुसरा. तथापि, स्वकर्म धर्मी वर्ततो कांक्षि का जैसा ! ॥२२॥

**यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः ।**
**मम वर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ २३ ॥**

येथें कारण येतुलेचि. जरि अम्हीं संपूर्ण कामस्वरूप स्थितिने, तृप्त होउनी कर्म आव्हेरू, ॥ भूतजात अह्याचि परि हे त्यजुनि सर्व स्वधर्म बरळे कैंवि मग या निस्तरेल भवाब्धिपूराते ? ॥ २३ ॥

**उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् ।**
**संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ॥ २४ ॥**

अणिक येक अघात मोठा अर्जुना. अवधारिजो जरी आत्मस्थितिनें वर्तता सत्कर्म न करू मी. ॥ तरी सकळ वर्णाश्रमाहूनि चेउनी मग नासती संकराची कर्त्ततॉ वाजेल अंगीं लोकहत्याची. ॥ २४ ॥

---

१ श्रेष्ठ पुरुष; ज्ञानवृद्ध २ गोष्ट, मातब्बरी. ३ याकांक्ष; इच्छा असलेला. ४ येथें शब्दाचें शुद्ध स्वरूप दृष्टीस पडतें. बहुधा "तृप्त" असें रूप आढळतें. "लोकहत्या" हा शब्द लक्षणीय आहे. ५ कर्तृत्वरूप लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

**सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत ।**
**कुर्याद्विद्वांस्तथासक्ताश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥ २५ ॥**

मुख्य जेवि फळाश धरूनी आचरी कर्मा. जसा स्वधर्मी भर असा- वा. त्या निराशाही. ॥ सकळ लोकपरंपरारक्षक स्वधर्म न संडीजे. लोकांत असता परी अलौकिक सांग कां व्हावें १ ॥ २५ ॥

**न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ।**
**जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥ २६ ॥**

ज्यासि कर्मचि योग्यता, त्यालागी हे नैष्कर्मता प्रगटिजे ? येणे तेथे सत्क्रियाचि लावी. ॥ जेंवि कां सायास शिशु जे स्तन्य सेवि त्या पक्वान्नाचि देतां अनुचितची कीं लौकिकी पाहता ॥ २६ ॥

**प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ।**
**अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ॥ २७ ॥**

जो असे तत्वज्ञ तेथें निपजत सत्ता कर्मजात. तथापि, गुणकर्मासि वळखुनि न धरि अभिमानू. ॥ नेणुनी हें कर्म केवळ मूर्ख तेंवी येथ कर्त्ता म्हणुनी अभिमानची वांया नाडले कैसे ॥ २७ ॥

**तत्वावित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः :**
**गुणा गुणेषु वर्तंत इति मत्वा न सज्जते ॥ २८ ॥**

गुण आणि कर्माहुनी मी वेगळा जाणूनी शरिरी वर्तता, त्या कर्मबंधे न पवती बाधू. ॥ जेंवि रवी उदयेचि भूतेंचेष्टतापण तो अलिप्तसाचि हा विषयेंद्रियेहुनी वेगळा. पार्था ! ॥ २८ ॥

**प्रकृतेर्गुणसंमूढाः सज्जंते गुणकर्मसु ।**
**तानकृत्स्नविदो मंदान्कृत्स्नविन्न विचालयेत् ॥ २९ ॥**

सहज होता प्रकृतिधर्मेंकर्म शुभ आणि अशुभ तेथ मूर्ख म्हणती

---

१ प्रमेयसमर्थन फार खुबीदार आहे. २ व्यवहारांत.

मीच कर्त्ता. विभ्रमे भ्रमलै ! ॥ या अहंतारूढ मूढा गूढ हा परमार्थ लेष कदापि प्रकटावाचिता : निश्चयेची हे मानी. ॥ २९ ॥

**मयि सर्वाणि कर्माणि संन्यास्याध्यात्मचेतसा ।**
**निराशीर्निर्ममो भूत्वा युद्धयस्व विगतज्वरः ॥ ३० ॥**

चित्तवृत्ति आत्मरूपी ठेउनिया, उचितकर्मे करूनियां, मजलागी अर्पाविंच हे अवघी. ॥ कामना सांडूनी, आशा दूर दवडुनिया, अहंता टाकुनी, निःशंक आतां ऊठ युद्धासी ॥ ३० ॥

**ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठंति मानवाः ।**
**श्रद्धावंतोऽनसूयंतो मुच्यंते तेऽपि कर्मभिः ॥ ३१ ॥**

म्हणुनी या अनुरोध मत हे शुत्ध माझे स्तिकरि-तैसे अनुष्ठिव भक्तिपूर्वक, टाकुनी असुयाते ॥ ईहेंकर्मी रहटता, पूर्ण कर्मांति तयास्तव सर्वथा करणी ईहेते धनुर्धरा, जाण. ॥ ३१ ॥

**ये त्वेतदभ्यसूयंतो नानुतिष्ठंति मे मतम् ।**
**सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः ॥ ३२ ॥**

प्रकृतिमंतचि होउनी, जे इंद्रिया देउनि लळे, मन्मत्त अव्हेरूनि, सांडिती सामान्य मानुनिया ॥ ते महामोहेचि भ्रमले, विषयसंगे घोरले. जेंवि विधुदय काक न सहति. त्यासी हे तैसे ॥ ३२ ॥

**सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।**
**प्रकृतिं यांति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥ ३३ ॥**

प्रकृत्ति संगे खेळता ज्ञाता तऱ्हि नाशेल प्रकृतिशी पावती भूते तेव्हां निग्रह करी काये! ॥ सहज अग्नी लागल्या मग उधळला नावरे जेंवी तसेचि प्रकृतिसि मान दिधल्या मग भले नोहे. ॥ ३३ ॥

---

१ हें वाक्य फार रमणीय व खोंचदार आहे. या वाक्यांतील ठकारानुप्रास मोठा सुंदर साधला आहे. ज्ञात्यांनीं हा निषेध लक्षांत ठेवण्यासारखा आहे. शब्दपांडित्य बाजारांत अंमल दुर्मिळ झालें तरी चिंता नाहीं. २ सर्व. ३ व्यवहारांत. लौकिक कार्यें करीत असतां. ४ चंद्राचा उदय. ५ नंतर. ६ वाढला; भडकला.

**इंद्रियस्येंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ ।**
**तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपंथिनौ ॥ ३४ ॥**

इंद्रियार्ता सारिखे मग विषय सकळहि पोषिता संतोष उपजे. येरव्ही तो क्रोध पै ठेला. ॥ म्हणुनी हे सवे चोर[1] देती दुःख परिणामी-विचारूनी यास्तवचि दोवांत आपण वश्यें[2] न व्हावे ।। ३४ ॥

**श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।**
**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ ३५ ॥**

जाण हा स्वधर्म अपुला कठिण तरी जाहला, तऱ्ही पण, तोचि सद्य अनुष्ठितातान्हि वहुनिके बापा ! ॥ येर आचरता बरा तन्हि टाकिजे, शूद्रान्न विप्रापरि. यैथे जिव वेंचला तरी मोक्ष ये ठाके ।। ३५ ॥

॥ **अर्जुन उवाच** ॥

**अथकेन प्रयुक्तोऽयं पापं चरति पुरुषः ।**
**अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥ ३६ ॥**

सुरशिरोमणी बोलिला ते परिसूनीया, पुसत अर्जुन, स्वामिजी ! तऱ्ही कां पाप आचरतु ? ॥ मानसी इच्छितचि नसता हा बलात्कारू दिसे कवण तयासी योजिले, तें काय सांगावे? ।। ३६ ॥

॥ **श्रीभगवानुवाच** ॥

**काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ।**
**महाशनो महापाप्मा विद्धेनमिह वैरिणम् ॥ ३७ ॥**

तव म्हणे भगवंत बापा ! ऐक. ते पापासी मूळ क्रोध काम. म्हणोनि केवळ काळरूपी हे. । हेरज्यांचे[3] जाहले जे विश्वनपुरे ग्रास याचा. पापमूर्ति जाण वैरी सकळ जीवाचे॥ ३७ ॥

---

१ बरोबर असलेले चोर. घरचे चोर. २ वश्य. ताब्यांत. स्वाधीन. ३ यथे= येथें. हस्तदोष दिसतो. ३ रजोगुणासून झालेले.

**धूमेनाव्रियते वह्निर्यथादर्शो मलेन च ।**
**यथोल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ॥ ३८ ॥**

जेंवि धुंम्रे वन्हि आचरिला, जसा दर्पणमुळे गर्भस्थ बाळा उल्बखोली आचरूनी राहे, ॥ तेंवि ईही क्रोधकामी ज्ञान आवरिलेचि. म्हणुनि, अगाध होउनि ठाकिले, हे थोर थोरासी. ॥ ३८ ॥

**आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ।**
**कामरूपेण कौंतेय दुष्पूरेणानलेन च ॥ ३९ ॥**

ज्ञानियाचे शुद्ध नित्याज्ञानयानें झांकिले, जो कोणी येक्या कामरिपुने फरम दुष्टानें[1] ॥ यासि जिणुनि साधि जेंवि ज्ञान जैसे काष्ट काष्टी ॥ जिंकिजे अग्नीस तव तो सर्वही जाळी ॥ ३९ ॥

**इंद्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते ।**
**एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥ ४० ॥**

जाण बापा ! पातकाला इंद्रिये मन बुद्धिचा रहिवास, दुर्ग करुनि बळकट, सैाळित[2] सकळासि ॥ या सहीत प्राणियाचे ज्ञान अवरूनि भुलवितु ॥ यास एक असे उपाव करिस वेगें तूं ॥ ४० ॥

**तस्मात्त्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ।**
**पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥ ४१ ॥**

तरि यया पहिलाचि कुरटा[3], इंद्रिये जेथूनि कर्मे प्रवृत्ति, आधी यासि नियमुनी, चित्त आवरिसी. ॥ मग रिपु हा ज्ञान नाशक अंतरीहुनि मेलिया ब्रह्म स्वराज्य न मार्घत[4], आपणाचि घर रिघेल सुखें ॥ ४१ ॥

**इंद्रियाणि पराण्याहुरिंद्रियेभ्यः परं मनः ।**
**मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तुसः ॥ ४२ ॥**

विषयग्राहक इंद्रिये देहाहुनी हे वेगळी, त्या इंद्रियाहुनि वेगळें मन

---

१ दुष्टानें. २ पीडा देतो. ३ उंबरा. ४ भागत.

बळकटचि होय. ॥ त्या मनाहुनी वेगळी ते बुद्धि· तिहुनी वेगळा जो भासकुस्वानंद आत्मा जाण तूं ऐसा. ॥ ४२ ॥

**एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना ।**
**जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥ ४३ ॥**

यापरी बुद्धि परता[1] वोळखूनि, गुरूमुखें मन करूनि उन्मन[2], बुद्धिसी बोधेचि पोखुनिया[3], ॥ याच अंतळ[4] पराक्रमें, रिपू दुष्टकाम जिवेचि मारी. ॥ सुखे विहर मग अर्जुना तूं स्वराज्य निजलाभे ! ॥ ४३ ॥

**ऐक राया ! मागुती हरिकाय अनुवादेल प्रश्न ।**
**पुढिल कथा बहु गोड कीं[7] शिवराम विज्ञापी ॥ ४४ ॥**

शिष्य गुरू संवादतो[5] चित् अचित् गांठि विरूनि जाये, अपूर्वतीच निरूपणे पार्थासी सांगितले[6]. ॥

हरिहिः ॐतत्सदिति श्रीमन्महाभारते शतसहस्र संहितायां भीष्मपर्वणि श्रीमद्भगद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगोनाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

१ बुद्धिस परता=बुद्धीच्या पलीकडे असलेला. २ अंतर्मुख. ३ पोपून. ४ अगाध. ५ तो=तों; त्या वेळीं. त्या गुरु शिष्यांच्या शंकासमाधानाच्या प्रसंगीं. ६ या क्रियापदाला कर्ताच नाहीं ! शिवरामस्वामींच्या गद्यांत वाक्यरचना फार ढिसूळ आहे. संदर्भबलानेंच स्वामींचा आशय समजून घेतला पाहिजे. ७ कीं=असें.

**श्रीगुरूभ्यो नमः ॥ श्रीरघुवीर समर्थ ॥**

पिकली श्रवणेंद्रिय क्षिती! स्वराज्य खरेचि कीजे! प्रतिपादी वक्ता स्वये हरि, पार्थ तो श्रोता. ॥ पाहता, कमळाजवळी दर्दुरी तिशीपरि हा लोभ! दुर्लभ मूर्त सगुणब्रह्म पार्थालागी अवतरले! ॥

**॥ श्रीभगवानुवाच ॥**

**इमं विवस्वते योगं प्रोक्तवान हमव्ययम् ॥**
**विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥ १ ॥**

मग म्हणे अर्जुना! हा योगराज विवस्वतासी आम्हीच कथिले. हे वेदंती बहुत दिवसाची. ॥ मग विवस्वत मनुसी हा निजयोग वदता जाहला तो. मनु इक्ष्वाकूसी बोधी संप्रदायेंसी ॥ १ ॥

**एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ॥**
**स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥ २ ॥**

हेची शुध्ध परंपरा मग राजऋषिही जाणती. परि, तेथुनी सांप्रत आतां नेणिजे कोण्ही. ॥ विषयसुख जयासि अवधी, जे विवेका नेणती, त्या मूर्ख लोका केंवि सुलभ राजयोगू हा? ॥ २ ॥

**स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः ।**
**भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ॥ ३ ॥**

तो तुज अज्ञान मूळ हरावया हा राजयोगू पुरातनचि सांगीतला म्या, भक्त तूं म्हणुनी. ॥ पूतळा प्रेमाचिया तूं मित्र केवळ आवडिसी मज, याचीलागी प्रगट केले गूज तुजसाटी. ॥ ३ ॥

---

१ बेडकी. २ कमळाजवळ बेडकी इतकी तफावत कृष्ण आणि अर्जुनामध्यें नव्हती, स्वामींचा दृष्टांत ह्य वाटत नाहीं. ३ गोष्ट. ४ गुरुशिष्यपरंपरेनें ५ सांप्रत=आतां. ६ कोणीं जाणली जात नाहीं. ७ जुनाच राजयोग. ८ प्रेमाच्या पुतळ्या! "पूतळा" हा शब्द संबोधनार्थीच घेतला पाहिजे. ९ अकारण–निर्निमित्त.

**अर्जुन उवाच ॥**

**अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः ।**
**कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति ॥ ४ ॥**

मी अता कांही पुसेन तुम्हाप्रती, जगजीवनाते, अशुभ हो शुभ होतें. याचा क्षोभ[1] न करावा. ॥ तो विवस्वत कवण, कैंचा[2], ठाउका कवणासी नाहीं; सांप्रतीचा तूं, तयाते कैंवी वदलासी ? ॥ ४ ॥

**॥ श्रीभगवानुवाच ॥**

**बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव । चार्जुन ।**
**तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥ ५ ॥**

अर्जुना तुझिया मनी हे गमत कीं आम्हिच नसो त्यावेळिचे ते रूप माझे नेणसी तूं गा ! ॥ मज अणी तुज बहुत जन्मे असत गेली. आपुली तूं नेणसी. मी सर्व जाणे, म्हणुनि सर्वज्ञ. ॥ ५ ॥

**अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।**
**प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥ ६ ॥**

दर्पणाधारे दुजे मुख जेंवि भासे तेंचि प्रकृति अधिष्ठुनि अवतरू अव्यक्त तेणेची. ॥ निर्गुणचि माया वसे अवतार धरिताही अजता विरक्तता माझी न नासे म्हणुनि भूतात्मा ॥ ६ ॥

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ॥**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ७ ॥**

सकळ धर कुळासी फार अधर्म येउनि जाचिता मी त्याचि वेळे पाउनी अवतार धरी तुझे ॥ जे अजत्व अमूर्तता हे सर्व ठेउनिया पऱ्हा मी अवतरतसे हा अनादीप्रवाह वा आहे ॥ ७ ॥

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ८ ॥**

---

१ असो. २ खळखळ; राग. ३ केव्हांचा कोणत्या काळीं होऊन गेलेला.

दुष्कृतद्रुम समुळ उपडी साधुवृंद कृपे न पाळी धर्म संस्थापन करी विजयध्वज स्थापी ॥ दैत्यकुळ नाशोनि मी गा अविवेक राती दवडुनी सुविवेक दिवस संवेचि उजळी संत हे वृंदे ॥ ८ ॥

**जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्वतः ॥**
**त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥ ९ ॥**

हे अजत्वचि जन्मणें माझे क्रियाती तत्व करण यापरी अविकारता जो जाणतो माझी ॥ तो महामुनि देहिचा देहासी नगवे मुक्त केवळ पावल्या पंचत्व तो मग मद्रुपीच मिळे ॥ ९ ॥

**वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः ।**
**बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥ १० ॥**

ज्ञान तप ते जे सदा चोखाळले जे ते निजांगे मीच घडले मज यासी कांही नसे भेदु. ॥ आत्म बोधे तुष्टले म्हणहुनि कामक्रोध सकळही ज्यासी देखुनिया दुन्हुनिच गळति बहु धाके ॥ १० ॥

**ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ।**
**मम वर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ ११ ॥**

येऱ्हवी तरि अर्जुना! मज जे जसे भजतील जरी मीही त्यासी तसेचि होउनि सादरेचि भजे. ॥ हे वचन विश्वासुनी तूं माझ्याचिठाइ भजसील, समग्र होउनि, लोक शोक त्यजोनि, सुखी असती. ॥११॥

**कांक्षंतः कर्मणां सिद्धिं यजंत इह देवताः ॥**
**क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥ १२ ॥**

बुद्धियोगे कल्पुनि अधमोत्तमे जे दैवते त्या दैवता प्रतिकर्मसिद्धि उपेक्षुनी यजती. ॥ जेथ जे जे वांछिति ते ते तसे ते पावती ! त्यासकळ भजना साक्षि मी धनुर्धरा जाण ! ॥ १२ ॥

**चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ।**
**तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तार मव्ययम् ॥ १३ ॥**

वर्ण चारी लोक तेथे सत्व मुख्य ब्राह्मणासी; शमादिसह रजसत्व मुख्य नृपासि शौर्यादी; ॥ रजतमोचि प्रधान कृषिकर्मादि वैश्य; तमप्रधान चतुर्थ शेवाकर्म सृजिता मी अकर्तृत्वपणे ॥ १३ ॥

**न मां कर्माणि लिंपंति न मे कर्मफले स्पृहा ।**
**इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते ॥ १४ ॥**

मजचि पासुनि जाहली परि मज कदा नातळती. याचि मज कदापि नसेच ईच्छा. सहज मी पूर्ण. ॥ त्यापरी साचची माते देखिले विवळूनि बरवे सूटला भयकर्म ज्याला पासुनि तोची. ॥ १४ ॥

**एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ।**
**कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥ १५ ॥**

प्रकृति आधार गुणव्यभिचारयोगे कर्म सहजची होतसे. मि येथ-कालत्रई नव्हे कर्ता ॥ हेचि वळखुनिया मुमुक्षु पुरातनीक कर्म तेचि मुक्तिशी. पाळे यालागि तूं सहज कर्माते. ॥ १५ ॥

**किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः ।**
**तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥ १६ ॥**

कर्म ह्मणीजे कवण, अथवा त्या अकर्मा काय लक्षण, नेणती शास्त्रज्ञ तेहि झांकविती मोहे. ॥ म्हणुनि कर्माकर्मलक्षण सादरे सांगेन. ज्यातें ऐकता, तूं सकळ दोषापासुनी सुटसी. ॥१६॥

**कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यंच विकर्मणः ।**
**अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ॥ १७ ॥**

भास विश्वाकार वर्णाश्रम उचितकर्मा वळखीजे. न करण ते कर्म कैसे, तेही वळखावे. ॥ मग निषिद्धस्वरूप तेही वळखतां गुंफेचिना मग कर्मगति हे दुर्गम असो एक प्रसुत हे. ॥ १७ ॥

**कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ।**
**स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥ १८ ॥**

फळ निराशा सकळ कर्मी वर्तता निष्कर्म देखे आणि दुजे न दिसे

जर कर्त्तव्यतेलागी ॥ तोचि युक्त. सद्वुद्धिमंत करि सकळ कर्मे अचुंबित कर्मलेपे येथ विचरत मीच होऊनिया. ॥ १८ ॥

**यस्य सर्वे समारंभाः कामसंकल्पवर्जिताः ।**
**ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पंडितं बुधाः ॥ १९ ॥**

कर्म हे मी करिन अथवा जाहले सिद्धिसी नेईन, हेहि विसरूनी कल्पना, करि सकळ आरंभ. ॥ ज्ञान अग्नि सुखे करूनि कर्महोम, सुखेचि विहरतु. तेच ब्रह्म मनुष्यवेशे खेळतो. कैसे ? ॥ १९ ॥

**त्यक्त्वा कर्मफलासंगं नित्यतृप्तो निराश्रयः ।**
**कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित्करोति सः ॥ २० ॥**

जो उदास तनूसि फळ भोगिता हे निराश सुखे सुखि असेनपि कुरवंडुनि सांडी अहंभावो. ॥ सकल कर्मी वर्तता कांहिच केले नाहि तेणे निच नवा आनंदु भोगी परमउल्हासे. ॥२०॥

**निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः ।**
**शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ २१ ॥**

अवसरे जे पाविजे तेणेंक्षि तो सुखिया जयाला. आपुले तेहे परावे नाठवे कांही. ॥ तो दिठि जे पाहतु, जे बोलतो, आणि चालतो ते आपणाचि होउनी आंगे डोलतो कैसा ? ॥ २१ ॥

**यदृच्छा लाभसंतुष्टो द्वंद्वातीतो विमत्सरः ।**
**समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबद्ध्यते ॥ २२ ॥**

आपणावांचूनि काही न पाहे. तेथ मत्सर मग ठाव कैंचा ? म्हणुनि द्वंद्वातीत जो जाणे ॥ सिद्धि आणि असिद्धिसी समरूप, तेंव्हा कवण कर्मी तयाप्रती येथूनि बाधी, सांग बा पार्था ? ॥२२॥

**गत संगस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः ।**
**यज्ञाया चरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥ २३ ॥**

शुद्ध सर्वापरि विमुक्त सकर्मपरि तो कर्मविहित कर्म—यज्ञनिमित्त करिता

कर्म न दिसेची ॥ हवन होता यज्ञभोक्ता मंत्र अवघे आत्मरूपचि पाहता जेथील तेथें कर्म लया जाये. ॥ २३ ॥

**ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।**
**ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ २४ ॥**

ब्रह्मरूपार्पण होमद्रव्य तेही ब्रम्हणाग्नि तोपरी ब्रम्हैव तेथे हवन ते ब्रह्म।। ब्रह्मतेची कर्म निश्चय आलिया बोधासि समता ब्रम्हमात्रचि तो अखंड धनुर्धरा जाण ! ।। २४ ॥

**दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते ।**
**ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोप जुव्हाति ॥ २५ ॥**

इंद्र आदिक अमर तेथें ब्रम्ह भाऊनिया जिती आणिक योगी कितीक केवळ ज्ञानयागीहि ब्रम्हरूप हुताशनांत ब्रम्ह अर्पण बुद्धियज्ञ हविति नैष्टिक ब्रम्हचर्यी यज्ञ तो कैसा ? ॥ २५ ॥

**श्रोत्रादीनींद्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुव्हाति ।**
**शब्दादीन्विषयानन्य इंद्रियाग्निषु जुव्हाति ॥ २६ ॥**

निग्रहाग्नीमाजी कोण्हि इंद्रिये द्रव्यासि हविती. कितिक इंद्रियाग्नि मज्वळनिस विवेके. ॥ तेथ आशा धूर सहज नाशला, मग वाक्य विधिने विषयहोमा द्रव्य हविति इंद्रियाग्निमाजी. ।। २६ ॥

**सर्वाणींद्रिय कर्माणि प्राणकर्माणि चापरे ।**
**आत्मसंयमयोगाग्नौ जुव्हाति ज्ञानदीपिते ॥ २७ ॥**

गुरू मुखे ह्रदयारणी मथिताचि प्रगटे ज्ञानहुतांशे वासने. धाधान इंद्रियकर्म ते द्रव्य, ॥ तेथ प्राणस्त्रुवेनशी पूर्णाहुति घालुनि, शेषही भक्षुनि, या स्नान करिती समरसेवृत्ती. ॥ २७ ॥

**द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथापरे ।**
**स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयःसंशितव्रताः ॥ २८ ॥**

येक यजति द्रव्ययज्ञ कितेक तपति तापसी आणि योगयज्ञहि यजति त्या अभ्यासविधिने गा ॥ शब्द तो शब्दचि यजिजे यापरी यजिता कुराडचि परि घडे जित ईंद्रियासिच हा सकळ यज्ञ. ॥ २८ ॥

**अपाने जुव्हति प्राणं प्राणेऽपानं तथापरे ।**
**प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥ २९ ॥**

त्या अपानाग्निमुखी हवितातित प्राणद्रव्य, अणिखे प्राण वन्हिमाजि, हविति त्या अपानाते. ॥ येक दोन्हि निरूंधती अभ्यासयज्ञे तेची प्राणायामिसे म्हणिपेति कितिक, धनुर्धरा जाण. ॥ २९ ॥

**अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुव्हति ।**
**सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ॥ ३० ॥**

वज्रयोगे क्रमें धरूनि कितेक अहरा नियमुनी, प्राणीच हविति प्राण, हे बहुतापरी ऐंसे ॥ जाण, ऐंसे मोक्षकाम समस्तही ते यजनशील. तयाच यज्ञमुखे सकल मल धुवुनिया बसले ॥ ३० ॥

**यज्ञशिष्टामृतभुजो यांति ब्रह्म सनातनम् ।**
**नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥ ३१ ॥**

जेथ अग्नी अणि होत्ता हवन कांही उरोचिना, तो ब्रह्मनिष्ट ब्रह्ममंत्र ब्रह्मयज्ञ करी. ॥ शेष सेवुनी, पूर्ण धाला ब्रह्म पाहुनि, अमर जाहला येन्ह विषयी जनाशि ईहपर सहज ॥ ३१ ॥

**एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ।**
**कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ॥ ३२ ॥**

यापरी ते यज्ञ बहुविध आहती विस्तारिले या वेदमुखिचे सांग ते कर्मेचि संभविले. ॥ येतुलेचि जाणता, तूं कर्मबंधाहूनि सुटसी. यास्तवचि, तो ज्ञानयज्ञ वरिष्ठ सकळासी. ॥ ३२ ॥

**श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ।**
**सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥ ३३ ॥**

द्रव्ययज्ञ अहति; परी या ज्ञानयज्ञा सरि न पवती; सकल कर्मप्रवृत्ति सहज जेथ लया पावे, ॥ जेथ करण विषय विसरति, जाणिजे मन मुकले, जन पाहला सहजचि भेटे आपआपणाते ॥ ३३ ॥

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।**
**उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ ३४ ॥**

जरि मनी ज्ञान नव्हे तरि तया संता भजावे टाकुनिया गर्वदास्य सदा करावे गा ! ॥ आपुल्या प्रश्नाचि उचितचि बोधति ते ज्ञान निर्मळ जे यथार्थ स्वरूप दाविति दिव्य दृष्टीचे. ॥ ३४ ॥

**यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पांडव ।**
**येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥ ३५ ॥**

मग अपेक्षित आपुले ते सांगितले, तेणेचि अंतःकरण, होईल बोध, न पवेचि संकल्पा ॥ तेचि वेळी आपणासह भूतजात पाहसी मज माजि. हा मोहांधकार हरील गुरूकरूणा. ॥ ३५ ॥

**अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ॥**
**सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥ ३६ ॥**

कल्मशाचा आगरू, जरि भ्रांतिचा तूं सागरू, आहेशि मोठा डोंगरू, व्यामोह ममतेचा ॥ परि तथापि ज्ञाननौका आश्रयोनि भवार्णवाते तरसिलचि. ज्ञानासमान दुजे नसे त्रिजगी ॥ ३६ ॥

**यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ।**
**ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥ ३७ ॥**

जेंवि पां ! जाज्वल्यमान हुताशनू हे काष्ट जाता प्रवेशुनि करि भस्म पूर्ण तयेचि घडिमाजी; ॥ तेंवि हा अद्वैत बोधे प्रज्वळत आत्मप्रकाश ज्ञानवन्हि अपार कर्ममूळ्या जाळुनी जाये. ॥ ३७ ॥

**नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।**
**तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विंदति ॥ ३८ ॥**

म्हणुनिया ज्ञानासी उपमा पुढत पुढति पाहता न दिसेची. जरी वर्तले तरि दोन्ही अहति काये ? ।। यास्तव ज्ञानासि उपमा येक तो ज्ञानीच आहे ! ॥ ते कसे हे पाहिजे अवधारि, वीरपती ! ।।३८॥

**श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः ।**
**ज्ञानं लब्ध्वा परां शांतिमचिरेणाधिगच्छति ॥ ३९ ॥**

आत्मसुखरस सेउनी विषयासि विटला, ईंद्रियाचा मान नाहीं, जाहला सुखिया सुविश्वासो. ।। तेथ गिवसित ज्ञान पावे, जेथ शांती असे अचुंबित, मग तयाचा बावरू शांती विना नाही. ।।३९॥

**अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ।**
**नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥ ४० ॥**

ज्यासि नाहीं प्रकटिले हे ज्ञान पढ जीणे तयाचें धिक् ! तयाहुनि मरण बरवे, परि नको मूर्ख ! ।। ज्ञान वांछा ही नसे तो संशई गेला वाहतो अहिक परत्रिक क्रिया सुखाहुनी चेवला. ॥ ४० ।।

**योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंच्छिन्नसंशयम् ।**
**आत्मवंतं न कर्माणि निबध्नंति धनंजय ॥ ४१ ॥**

माधवार्पणबुद्धियोग ईश्वरी अर्पूनि करिता आणि अकर्तेपणेची सकळा संशयातित होये. ॥ आपुला आपणाचि पूर्ण, तयासि कर्मे केंधि बाधु सकति, हस्ती स्वामींचा चैल्यासी बाधू ये ? ॥४१॥

**तस्मादज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः ।**
**छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥ ४२ ॥**

म्हणुनि देही न मायेसा संशयतरूवर वाढला, तरि यासी येक उपाव मनी धरी पार्था ! ॥ ज्ञानखड्गे समुळ तोडुनी टाकी हृद्गतनाशयद्रुम. उठीं वेगी भारता ! घे धनुषबाण करी. ।।४२।।

6934



**इति टीका समश्लोकी चतुर्थोध्याय दीपिका ।**
**श्रीपार्थसारथी कर्ता जो वामन मनोरथी ॥ ***

सकल कर्मन्यास अणिक योग हा ऐकूनि अर्जुन मागुती जगदीश-चरणालागी विनविले ॥ ते पुढिल कथारहस्य पदोपदी गहनार्थ लक्ष्मीनाथ वंदुनि चंद्रिका शिवराम वदवील ॥ ४३ ॥ हरिहिः ॐ तत्सदिति श्रीमन्महाभारते शतसहस्रसंहितायां वैयासिक्यां श्रीभीष्मपर्वणी श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानविज्ञानयोगोनाम चतुर्थोध्यायः श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ॥

**॥ श्रीमन्महागणाधिपतये नमः ॥ श्रीगुरूभ्यो नमः ॥**
**श्रीउमामहेश्वराये नमः ॥**

तव तया पूर्वापर विचारूनि मग कुमरू कैसा प्रश्न करिता होईल प्रस्तुत अवसरिचा ॥ तो पुढा परमार्थश्रवणी परिसताचि दुणाविजे सुख. संजयो धृतराष्ट्रराया सांगतो ऐसे. ॥

**॥ अर्जुन उवाच ॥**

**संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि ॥**
**यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥ १ ॥**

मग म्हणे अर्जुन हरिप्रती " कृष्णजी ! हा बोधु कैसा बोधिता ? मज अंतरी स्फुट उमज तव नोहे ! ॥ पूर्व कर्मसंन्यास कथिला. पुनरपि हा कर्मयोग प्रतिष्ठिता.म्या कवण थोर म्हणूनि मानवा ?" ॥१॥

* हा श्लोक मूळ पोथींत असा लिहिलेला आढळतो. शिवराम स्वामींनी वामनी ग्रंथाचा अभ्यास केला असावा असें या श्लोकसंग्रहावरून दिसतें.

॥ श्रीभगवानुवाच ॥

**संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ॥**
**तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥ २ ॥**

ऐक गा कुंतीसुता ! संन्यास आणि हा कर्मयोग विचारिता निज-मोक्षकर हे दोनिहि होती. ॥ पण, तरी हा कर्मयोग विशिष्ट हाचि हाचि तूं जाणें. महासंन्यासफळ लाहासी अनयासे. ॥ २ ॥

**ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति ॥**
**निर्द्वंद्वो हि महाबाहो सुखं बंधात्प्रमुच्यते ॥ ३ ॥**

गेलियाचे सेच न करी, न पवता न धरीच चाडही ठाय, हे विसरूनि ज्याचें चित्त मी माझे, ॥ कल्पना टाकूनि विचरत, बंध तो मुळिहूनि नेणत, तोच योगी जाणिजे. तो सहज संन्यासी. ॥ ३ ॥

**सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवंदति न पंडिताः ॥**
**एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विंदते फलम् ॥ ४ ॥**

ज्ञान आणिक ही कर्मसंस्था मूळीच नेणाति मूढ. ते दोन्हि म्हणति भिन्न भिन्ने सांख्य अणि योगू. ॥ अनुभवे जे तत्व जिही देखिले ते येक म्हणुनी जाणती, आचरति येके, उभय फळ लाहे. ॥४॥

**यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ॥**
**एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति ॥ ५ ॥**

सांख्यमार्गि पाविजे जै तेचि योगे लाहिजे, ऐशापरी संन्यासयोगा ऐक्य जो जाणे ॥ तोचि अपअपणासी देखे. पाहले जाहले तयासिच जाणविति भेदेविना हे योगसंन्यासू ॥५॥

**संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः ॥**
**योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाधिगच्छति ॥ ६ ॥**

युक्तिपंथे मोक्षपर्वतमस्तकीच दिजे सूखे ते सिध्ध योगस्थिति अव्हेरूनी मोक्ष जो मागे ॥ तो पदा न पवे. वृथा हव्यास वाहे जाये वाहू म्हणुनि योगयुक्त सत्वर तोचि पद पावे ॥६॥

**योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेंद्रियः ॥**
**सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥ ७ ॥**

भ्रांति पासूनि हिरूनिया, मन सद्गुरू वचनामृत चोखोनिया, आत्मरूपी घातले जेणे ॥ येकदेशी तो वसे तन्हि लोकत्रय भरला असे ॥ कर्मकरिता नाठवे तरि करी अकर्त्ता तो ॥ ७ ॥

**नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् ॥**
**पश्यन्शृण्वन्स्पृशन्जिघ्रन्नश्नगच्छन्स्वपन्श्वसन् ॥ ८ ॥**

मी असा आठवचि नाही तयासी हे कर्तृत्व कैंचे ? योगयुक्ती करि जनापरि सकळ व्यापारू. ॥ पाहतु अणि ऐकतु, स्पर्शासि जाणता, गंध सेवित, खात चालत, निजत बोलत, तेथिचा नोहे ॥ ८ ॥

**प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि ॥**
**इंद्रियाणींद्रियार्थेषु वर्तंत इति धारयन् ॥ ९ ॥**

श्वास उश्वासीत, हासत रडत, निमीषोन्निमिष याचा ठायी अवघे वर्तता करिताही तो नोहे ॥ भ्रांतिसेजे पहुडला स्वजभ्रमें तो भूलला मग ज्ञानोदयेसी पावला म्हणुनि अकर्त्ता तो ॥ ९ ॥

**ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः ॥**
**लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवांभसा ॥ १० ॥**

याच कार्या संगती आणीक करण वर्त्तती ॥ अपुल्याविषई स्वरूपेवीण तो नोहे ॥ तो करीता कर्मसकळही कर्मबंधे नातळे कही, जेंवि उदकी न लिंपिजे ते कमळदळ उदके ॥ १० ॥

**कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिंद्रियैरपि ॥**
**योगिनः कर्म कुर्वंति संगं त्यक्त्वात्मशुद्धये ॥ ११ ॥**

टाकुनि अहंभाव योगी बुद्धिधूर हाती कर्म करवि पाहता चोखाळते दाहा इंद्रिये द्वारी ॥ परि तया ईंद्रियविषय मन तिसी व्यवहार विदतची नाहि, जैसा स्वप्न पाहता तनु अचुंबित हे॥ ११ ॥

**युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिमाप्नोति नैष्ठिकीम् ॥**
**अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबद्ध्यते ॥ १२ ॥**

आत्मयोगे आथिला जो कर्मफलसंगासि विटला ॥ तोचि घर रिघोनि वरिला ॥ शांतिया लोकी येऱ्हवि अभिलाष कामी योग तो विसरूनि कर्मे करिती ते फळबंधखोडा घातले सहजे ॥ १२ ॥

**सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी ॥**
**नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥ १३ ॥**

सकळ कर्मफळे मनिहुनि ऐकुनी तो कर्म नवही द्वार करितो करितची नाहीं जाण करविहना ॥ जेउती तो वास पाहे तेउती सुखश्रृष्टि होये. तो म्हणे तेथेचि राहे हा महाबोधू ॥१६॥

**न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः ॥**
**न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥ १४ ॥**

हा जसा का ईश्वरू व्यवहाररहितु, पूर्ण पाहता आपणचि रचितु भुवनविस्तार, परि अलिप्तु. ॥ सहज जग हे होत जात, परि स्वये तो शुध्द त्या माया वसे, हे कर्मफळहि स्वभाव जगभोगी ॥ १४ ॥

**नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः ॥**
**अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः ॥ १५ ॥**

पाप पुण्य जवाळि असता न देखे, नेदीच कवणा साक्षीपणहि, नसाहे तेथे येरी गोष्टी काये? ॥ तो सृजी पाळी हारि हे बोलति ते लोक अज्ञानीच म्हणुनि अरोपिति मोहासी वरपडले ! ॥ १५ ॥

**ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः ॥**
**तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥ १६ ॥**

मग विवेके समुळ अज्ञानासि नाश करूनी पाहता ईश्वरूचि प्रकट होये वर्तता याला ॥ जेवी पूर्वदिशेसि उदयाचे सर्व दिशा प्रकाशती ज्ञानमात्र स्वरूपेचि होता दिसत जगमुक्त ॥ १६ ॥

**तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः ॥**
**गच्छंत्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः ॥ १७ ॥**

बुद्धि मन अणि ईद्रिंये व्यवहार मात्र करिति तितुका ब्रह्ममात्रचि करिति, होउनी ब्रह्म निज आंगे ॥ भूति भेदु कदापि नेणाति, भवपुरासी कदापि नयती,त्यास पुनरावंत इति श्रुती त्यासी वाखाणी ॥१७॥

**विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ॥**
**शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ॥ १८ ॥**

मग मस्यकू हा गज आणिजे श्वपच हा सुत पैल तो परी श्वान धेनु कदापिहि दुजे पाहाणे नाहीं ॥ मुळीच अहंता ते नसे,मां विषय कैंचे तेथ? यास्तव ब्रह्मपरूचि जाणते समदृष्टि हे त्याची ॥ १८ ॥

**इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ॥**
**निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ॥ १९ ॥**

विषयसंगु न संडिता अणि ईद्रिसी[1] दंडिता निःसंगु सुखे भोगीले कामेविना जी ही ॥ जे तयाचे नामरूप ब्रह्म मात्रचि, ते आहती जयाचिया मन समसमानचि जाहले बरवे ॥ १९ ॥

**न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् ॥**
**स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रह्मविद्ब्रह्मणि स्थितः ॥ २० ॥**

दृष्टी हे समत तयाची लक्षणें अवधारी, जैसा मृगजळाच्या महापुरे गिरी लोढवेना हो ॥ तेविच शुभअशुभी न विकरे ब्रह्मवेत्ता तो ह्मणू तरी ते दुजेचि नसे म्हणोनि ब्रह्ममात्राचि तो ॥५०॥

**बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विंदत्यात्मनि यत्सुखम् ॥**
**स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षय्यमश्नुते ॥ २१ ॥**

सहज सुखी सुखावला, निज अंतरी तो पहुडला म्हणुनि कदापि बाहिर

---

१ इंद्रिसी=इंद्रियासी. हस्तादोष.

पांय न घालि आपणाविण तो ॥ सहज विषई खेळता अक्षय सुखी तो पहुडला, विषयासि तेणे टाकिले हे सांगणे काये ? ॥ २१ ॥

**ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते ॥**
**आद्यंतवंतः कौंतेय न तेषु रमते बुधः ॥ २२ ॥**

विषयसुख हे भोगीता जरी सुखवती हे लोक, तरी हा ॥ खैर विंगळ सारणी सुखरूप निपज नये ॥ विषय हे दुःखासि बीज, म्हणुनि आदिअंति दुःखचि देती जाणुनिया असेन रामचि सज्ञानी. ॥ २२ ॥

**शक्नोतीहैंवयः सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात् ॥**
**कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥ २३ ॥**

वेगळेपण सांडुनी, अहंभाव गिरीवर लोटुनी, मग भोगिता भोगासी आपण आपणचि भोगी ॥ मनपणाचि मुळी नसे. या शरिर व्यवहारासी कैंचा ठाव ? शडैरिसी नाही युक्ती, सुखिया तो. ॥ २३ ॥

**योंऽतःसुखोंऽतरारामस्तस्थांतर्ज्योतिरेव यः ।**
**स योगी ब्रह्म निर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥ २४ ॥**

स्वात्मडोही पूर्ण येक सराजिही बुडि देउनी तळ घेतला. स्थिर तेथ होउनि तेची जे जाहले स्वप्रकाशे निर्मले चोखाळ. जग हे आपण होउनि पाहती ते ब्रह्ममूर्तचि का म्हणावेना ? ॥ २४ ॥

**लभंते ब्रह्म निर्वाणमृषयःक्षीणकल्मषाः ।**
**छिन्नद्वैधा यतात्मानःसर्वभूतहिते रताः ॥ २५ ॥**

सकळ भूतहितासी तत्तर जाहले, मग अमत ज्याचे द्वैत तरूवर छेदुनी समरूप जे जाहाले, ॥ कल्मषा मग ठाव कैचा ? मुक्त केवळ ब्रह्म ते ऋषि, ज्या अतःपर निज सुखेविण अधिक कांहिच नाही. ॥ २५ ॥

**कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् ।**
**अभितो ब्रह्म निर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥ २६ ॥**

सकळ विषयापासुनी हे चित्त हिरतुनि जींतुनी जेथ निजलें, तेथुनी

वृत्तिवरि उठतिना ते. ॥ तेची ते निर्वाण ब्रह्मची पुरुष निज अवतार देही ब्रह्म कैसे जाहले तरि तेही अवधारी. ॥ २६ ॥

**स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवांतरे भ्रुवोः ।**
**प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ ॥ २७ ॥**

तरि विरक्तीबळ विषय हे दवडुनी, बाहेरी मन हे येकवटता, ते पडे भ्रूपल्लवा गांठी.॥ पाठिमोर करूनि दाटिते वामदक्षण सांडुनी, मन करूनी प्राणापान मन नभगामिये करिती. ॥ २७ ॥

**यतेंद्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः ।**
**विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः ॥ २८ ॥**

ग्रासुनी ममतेचि दृष्टी सरसावला मनबुद्धिसी, मग वासना हे क्रोध याची सेच न करी तो ॥ अपणपे निर्लेप करूनी, मुक्त होउनि राहिला, अभ्याससागर क्रमुनिया तो पावला पार ॥ २८ ॥

**भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।**
**सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति ॥ २९ ॥**

मग सकळ लोकेश मी भूतांतरात्मा, यज्ञ तप भोक्तार माते जाणुनी, निजशांती वीराजे.॥ पहुड तूं अभ्यास कैसा.ऐकुनी साशंक पार्थ कळोनि, हरि बोलेल ते शिवराम वाखाणी ॥ २९ ॥

हरिहीः ॐ तत्सदिति श्रीमन्महाभारते शत सहस्त्र संहितायां भीष्म पर्वणी श्रीमद्भगवद्गीता सूपनिषत्सु ब्रह्म विद्यायां योग शास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे कर्मसंन्यास योगो नाम पंचमोध्यायः ॥ ५ ॥

**श्रीलक्ष्मीनृसिंव्ह भजेत् ॥ श्रीअंजनेयार्पणमस्तु ॥**

———

॥ श्रीगणाधिपतये नमः ॥ श्रीजगदंब प्रसन्न ॥

**॥ श्री भगवानुवाच**

**अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः।**
**स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ॥ १ ॥**

जाणुनी अर्जुनमनोरथ, आपणचि हरि योगरूपनिरोपण निरूपील करूणापूर्ण हृदय हो! ॥ ऐक गा धृतराष्ट्रराया ! करूनि सावध वदत संजय, जे कथा सर्वेंद्रिया निववीत, ते ऐका. ॥ १ ॥

अर्जुना परिशी मनाने मनिति संन्यासयोग गुढेचि, परि विवरूनि पाहता दोनि एकची. ॥ कर्मफळ नातळुनि उचितची कर्म करि. संन्यास-योगी तोचि. येऱ्हवी त्यजिता त्यागूचि तो नोहे. ॥१॥

**यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पांडव ।**
**न ह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन ॥ २ ॥**

जेधवा संन्यासिले सकंल्प हे तुटताचि ते क्षणीं योग भेटे. म्हणुनि जो सन्यास तो योगू. ॥ कल्पना न तुटे जयाची तो कसा होईल योगी ? ॥ जाणती संन्यास योगैक्यत्व अनुभवि ये. ॥२॥

**आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते ।**
**योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥ ३ ॥**

योगपर्वतमस्तकी चढिजे तरी सोपानकर्मचि जाणिजे येणेंचि मार्गे जाय वरुता गा ! ॥ मग तया योगारूढाप्रति कर्म उपरतीनेचि मागील पुढील स्मरणचि नोहे तो शम त्यासी कारण बा ! ॥३॥

**यदा हि नेंद्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते ॥**
**सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥ ४ ॥**

ज्याचिया इंद्रियगृहाप्रति विषय येवू नेणती, जो आत्मसुखवोवरा पहुडोनि निज सेवी, ॥ सकल संकल्पावरी रूसला, विषयाहि जवळी आल्या आश न धरी तोचि योगारूढ हो साजे. ॥४॥

**उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।।**
**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ।। ५ ।।**

म्हणसि हे स्थिती असासि, तरी येथ अद्वय कवण कवणा देईजे आणूनि आपण अपण तरि मारी. ॥ आपुला दुःस्वप्न अपणचि येउनी करि नाश, तैसा अपण अपणा बाध तनु अभिमान रिपु अपुला. ॥५॥

**बंधुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ॥**
**अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैवशत्रुवत् ॥ ६ ॥**

हा विचार त्यजोनि अपुला अन्यथापि धरूनि टाकत कल्पनेने बांधिला नळीक शुकन्याये ॥ तोचि अपुला अपण वैरी येऱ्हवि हा वाप अपुला बंधु कीजे. नाथिले नेघेचि निज आंगी. ॥ ६ ॥

**जितात्मनः प्रशांतस्य परमात्मा समाहितः ।**
**शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयो ॥ ७ ॥**

या मनोजय वीर्यवंता, विगतकाम अहंकृता पुरुषासी, आत्माजवळि अंतर्बाह्य भरलासे. ॥ मेघहुनि सुटताति, धारा जेंवि सिंधुसी नरूपती, शीतोष्ण मान महापमान तयासी कैबाधी ? ॥७॥

**ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेंद्रियः ।**
**युक्त इत्युच्यते योगी समलोष्ठाश्मकांचनः ॥ ८ ॥**

ज्ञान अणि विज्ञान सकलहि ठाव जेथे जाहला तो येक देशी, परि असे व्यापूनि दुजेवीण. ॥ इंद्रिये मग बोलिली यालागी युक्त जितेंद्रियु सोनमृदत अणि रत्न दगडसमान तो पाहे. ॥८॥

**सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबंधुषु ।**
**साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ॥ ९ ॥**

---

१ पोपट बैसावयाच्या छडीला स्वतःचे पाय चिकटवून पुनः आपले पाय छडीनें जखडिले अशी ओरड करितो. त्याप्रमाणें.

मीच अवघे विश्व हा निजबोध ज्याचा त्यासि मित्र रिपु उदास सुहृदपरावे आपुले कैंचे? ॥ पैल अधमु उत्तमु, तो हाहि भेद तयासी कैंचा? बुद्धि ज्याची समपुरुष वरूनि सूखि जाहला. ॥९॥

**योगी युंजीत सततमात्मानं रहसि स्थितः ।**
**एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ॥ १० ॥**

तो निरत तरि आप अपणासहि येकांत स्थळीं राहूनि अवघा येकला मन आपुल्या मोहरा ॥ करुनि आशापाश तोडुनि निज परिग्रहरक्ति टाकुनी योगपद पावे तयाची साधन ते ऐक ! ॥ १० ॥

**शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः ।**
**नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥ ११ ॥**

तो योग यावा अनुभवासी, म्हणुनि तोही देश पाहवा, जो नरहे त्या गहवी चेव विरक्तीचे ॥ तेथ स्वस्थासन करावे जे नव्हे कां उंच नीच ॥ तळी कुशांकुर, अजिन त्यावरी वस्त्र त्याहिवरी. ॥११॥

**तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेंद्रियक्रियः ।**
**उपविश्यासने युंज्याद्योगमात्मविशुद्धये ॥ १२ ॥**

मग तय स्थळी वसुनी एकांतःकर्ण करूनि गुरू स्मरता अहंतेविण अष्टही भावते स्फुरती ॥ मन सुखे हृदई वसे मग करणविषया विसरती सहजात्मशुद्धिलागि बोधे योग योजावा ॥ १२ ॥

**समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः ।**
**संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥ १३ ॥**

उरु जंघनेसी जडुनि चरणतळ अधार बूडवी सव्य चरण तळी तयावरी वाम ठेवावां ॥ याच वज्रासनिच बसता कंठ शिर समदृष्टि नासाग्रीच बैसे सहज रहत दिशावलोकन तो ॥१३॥

**प्रशांतात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः ।**
**मनःसंयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥ १४ ॥**

मग तया आसन जये अभ्यासिता हा कठिण योगसंत्रे पळभय सहज शांती परणती आली ।। करुनि योगारूढ मन मजकडे फिरउनि चित्त-युक्त ब्रह्मचर्येवृत्ति महासुख लूटितो कैसा ! ।।१४।।

**युंजन्नेवं सदात्मानं योगी नियतमानसः ।**
**शांतिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ॥ १५ ॥**

साधनचि केले शरीर जिहि त्यासि काय म्हणुनि वाणु पूर्ण योगी ब्रंह्म रस सेऊनि विदेहि कीं ॥ परम ते निर्वाण केवळ मीच जें का शांत-पद पाहुनी निर्विघ्न मजसरी तेचि ते झाले ॥१५॥

**नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकांतमनश्नतः ॥**
**न चाति स्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ॥ १६ ॥**

अंखिला रसनेंद्रियाचा, वीकला निद्रेसि जो, अवेवाहार मोडुनी कोंडी तहान भूकाते ।। पूर्ण निद्रा वाट मोडिया अनाधिकारी मन जयाचे मुदल शरीर चितव नव्हे मायांगु कवणाला ।।१६॥

**युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ॥**
**युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥ १७ ॥**

म्हणुनि अतिशय निरोध त्यजुनि युक्तिसि अपर निद्राविहर परमित इंद्रिये चेष्टा ॥ युक्तिमुद्रा पडत बाहेर आंत सुख वाटे तेंव्हा अभ्यासिता हा योग सिध्धी अनुभवें आली ॥१७॥

**यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते ॥**
**निःस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ॥ १८ ॥**

म्हणुनि युक्ती कडसणी ते ज्यासी दैवा पावली, तो मुक्ति राणि सर्वदा निष्कामता भोगी ।। योगयुक्ति प्रयागभूमी क्षेत्र सन्यासे जयाचे स्थीर जहाले मग तयाप्रती योग हा कथिला. ॥ १८ ॥

**यथा दीपो निवातस्थो नेंगते सोपमा स्मृता ।**
**योगिनो यतचित्तस्य युंजतो योगमात्मनः ॥ १९ ॥**

आत्मयोगे स्वस्थ ज्यांचे तै अचंचळ चित्त होये, जेंवि निवांत स्थ-

ळिची दीपकळिका, हे ॥ प्राप्तिचि तूं चाड न करिशि. परि यया अभ्यास न करिसी तरि तुझा चित्तावरोध होसके कैंवी? ॥१९॥

**यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ।**
**यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥ २० ॥**

इंद्रियाचा थकित वावर चित्त तेंव्हा फिरूनि पाहे आपणापे वोळखे मग तत्व मीच म्हणे ॥ सहज सांम्राज्यासनि बैसूनि, विरुनी चित्तपण ते मनोवाचा अगोचर अपण हो टाके ॥२०॥

**सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियम् ।**
**वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः ॥ २१ ॥**

नाही त्यापरते दुजे अत्यंत सुखसेजेसी पहुडे म्हणुनि न ढळे दुःख डोंगर आंगी आदळता. ॥ तो महत्त्वसुखे निजांगे घाडियला कींवा सतनुची विसरला भरला निजानंदेचि दुमदुमिती ॥२१॥

**यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ।**
**यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ॥ २२ ॥**

शस्त्रनेवरि तोडिला, वडवानळातचि पाडिला, जेथ सूतला तेथुनी चैंळाचि तो नोहे. ॥ परमयोगातिप्रय सुख लाधला, व्यावरी नसे सूख, तेचि राणिव भोगिती. त्या विघ्न मग कैंचे ? ॥ २२ ॥

**तं विद्यादुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम् ।**
**स निश्चयेन योक्तव्यो योगो निर्विण्णचेतसा ॥ २३ ॥**

सकळ दुर्घट दःखयोगा विसरूनी, निजसूखेचि विराजतो, तो योगीराज म्हणुनी मानावा. ॥ निजजिवी घालूनि योग, दुरिच आळस दवडुनी अभ्यासिता, येणेंचि मार्गे स्वपद आकाळिजे. ॥ २३ ॥

**संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः ।**
**मनसैवेंद्रियग्रामं विनियम्य समंततः ॥ २४ ॥**

निजविरक्ती–आनेंळे सकळ संकल्प–उद्भव-काम भाजुनी, धैर्य धव-

---

१ भ्रष्ट झाला; पतन पावला. २ स्थान; स्थिति. ३ अग्नीनें.

ळोरि बुद्धिसी नांदवी[2], स्वसुखे ॥ इंद्रिया समवेत मानस ठेउनीया आत्मभुवनी होय सुखिया-प्राप्तिचि हे कडसणी ऐशीं. ॥ २४ ॥

**शनैःशनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया ।**
**आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचिदपि चिंतयेत् ॥ २५ ॥**

धैर्य दुधगा[3] वांधुनी बुडत्यासमान सबुद्धिसूत्रे हळुहळु मायार्णवातुनि शीघ्र काढावे ॥ आत्मनगरी राहिल्यावरी, हे अनात्मिक पैल आत्मा दोनि ठेल्या, चिंतिजे मग कवण कवणाते ? ॥ २५ ॥

**यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम् ।**
**ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥ २६ ॥**

मोकळे मन जेथ जेथे जाय, तेथुनि तेथुनी, नियमेचे ठाया आणिवो स्थिरता. संवे लागे ॥ आत्मया आले जवळि जे द्वैत अद्वैत निशी हर्पोनि जाय. सुखैकघन तो बोधला जाये. ॥ २६ ॥

**प्रशांतमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ।**
**उपैति शांतरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥ २७ ॥**

त्या सुखासरिताचि त्या अतीत आले. ब्रह्म समरसल्या रजतमे कल्मपादिक केउतेजाये ? ॥ हे जरी तुज नागवे[4], अणिक ही सोपा उपावो तरि तुला सांगेन. जेणे ब्रह्म तूं होसी. ॥ २७ ॥

**युंजन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः ।**
**सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यंतं सुखमश्नुते ॥ २८ ॥**

जड पदार्थी धांवता, मन चेउनी, अपणासी पहाता, सहज अपुले चित्त अपणा वस्य मग जाहाले. ॥ कल्मशासी. उरि न उरे अपरोक्षपूर्ण प्रगट होये. महत्सुखी सुखमात्र होउनि विचरतो कैसा ? ॥२८॥

**सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।**
**ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥ २९ ॥**

---

१ मंदिरांत. २ राहवितो. ३ दुर्गा; किल्ला. 'दूधगा' उगडच लेखकाचा भ्रांतपाठ दिसतो. ४ झेपत नसेल.

सकल कल्मष टाकुनी समदृष्टिने चोखाळला मग पाहाता, भूत बहू-विध मजचि तो पाहे ॥ मजचि माजि भूतासी पहातो. शुध्द यापरि भावना अंतःकरण विषयामाजि विसरे, योगयुक्त तो. ॥२९॥

**यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।**
**तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥ ३० ॥**

मग पुरुष तो पैल माया, बोलणे हे दिसत वाया, ज्यासि मी प्रत्यक्ष मज तो गोचरू जहाला. ॥ हो जवे, पुष्पे, रसे, व्योमाचि त्या मानेची अवकाश, तसा माझेनि रूपे रूपसु तोची. ॥ ३० ॥

**सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः ।**
**सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ॥ ३१ ॥**

ऐक्यदृष्टी निरवधी सर्वत्र माते देखतुं, जैसा पटी हा तंतु येथे अळं" कृती सोने. ॥ तो तनूसी वर्तता मध्यापकत्व हिरूनि नेले, न म्हणता तो सहज आपण व्यापकू जहाला. ॥३१॥

**आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।**
**सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥ ३२ ॥**

पूर्ण अपणासारिखे जग पहातो.समजे चराचर सम विषय, सुख-दुःखादि मानस स्वधर्म जो नेणे. ॥ अपण जग हें ग्रासुनी सकलाचि घडला ब्रह्मरस तो. म्हणुनिया साम्या परौति प्राप्ति जगी नाही.॥ ३२ ॥

**॥ अर्जुन उवाच ॥**

**योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन ।**
**एतस्याहं न पश्यामि चंचलत्वात्स्थितिं स्थिरां ॥ ३३ ॥**

तव म्हणे अर्जुन"हरि ! हा योगसमतेचा तुम्हीं मज आपुल्या स्वहितास्तवचि साद्यंत सांगितला.बहुत चंचल मन तयाते स्थिति कसे समता वसे ? पण, येन्हवि रहटावया हा योग तव सोपा.॥३३॥

**चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।**
**तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥ ३४ ॥**

मर्कटासि समाधी न घडे, रहविल्या हा वायु न रहे, तेंवि मन हे आकलु तव हात मारूनि जाये! ॥ बुद्धिला सळते, विवेका भूलवी दिग्देश हिंडे. मन स्थिर होय, तै हे योग्यता घडु ये." ॥३४॥

**॥ श्रीभगवानुवाच ॥**

**असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम्।**
**अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ॥ ३५ ॥**

मग म्हणे श्रीकृष्ण "पार्था बोलसी ते साच. चंचलशील मन हे होये. स्वभावगुण याचा. ॥ देखिल्या ठायासी सोके. म्हणुनि, बा! वैराग्य धरणे. अभ्यासाचिया मोहरेचि करिता हे स्थिरावेल. ॥३५॥

**असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः।**
**वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ॥ ३६ ॥**

येऱ्हवी वैराग्यबळ ज्यासि अभ्यासी नसे रीघ त्या विषयपर प्राणिया योग हो काये? ॥ म्हणुनि मन हे वळुनि, विषयापासुनी अभ्यासिता हा योग केउते मन जाये मजवीण?" ॥३६॥

**॥ अर्जुन उवाच ॥**

**अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः।**
**अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥ ३७ ॥**

पार्थ बोले " कृष्णजी तेसाच. योगबळासी नतुके हे मनोबळ. परि, अम्हाला तूंते अनुसरणे. ॥ करूनि निग्रह न करवे श्रद्धे न करिता योग चवला योगसिध्दी न टाकुनी कवण गति पावे?" ॥३७॥

**कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति।**
**अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ॥ ३८ ॥**

जैंवी अवकाळी अभाळ वसेहीना, वर्षाहिना, तैसाचि हा नटके कदा न फिरे उजू जन्मा. ॥ मध्ये झाले अस्त अयुष्य प्राप्ति जरी नाहीच, जरी अप्राप्ति त्यासी ह्मणो, तरी श्रध्धा बरी होती. ॥३८॥

**एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः ।**
**त्वदन्यःसंशयस्यास्य छेत्ता न ह्युपपद्यते ॥ ३९ ॥**

त्वत्प्रसादे अग्रजन्मी योग नानापरिच हा अम्हा बरवा कळो सरला. कदाचित् आणिका विषयीं ॥ कृष्णजी ! या संशयाचा नाश तुजविण करिल कवणु ऐसा न देखो. यालागि करुणा करुनि सांगावे. ॥ ३९ ॥

**॥ श्रीभगवानुवाच ॥**

**पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।**
**नहि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥ ४० ॥**

तव ह्मणे श्रीकृष्ण ॥ "पार्था ! ज्यासि मोक्षी पूर्ण आस्था त्यासि यावाचोनि आणिखा गतीच तव नाहीं. ॥ परि घडे इतुलेचिमध्यें राहणें. तेही असो. सुखाडकीं देव नसे पाठींच मोक्ष तसा. ॥ ४० ॥

**प्राप्य पुण्यकृतांल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।**
**शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥ ४१ ॥**

जाणुनि स्वर्गादि लोका, तेथ भोगुनि उचित भोग, संवेचि मुनिवर भाग्यवंत ग्रहात जो जन्मे, ॥ जेथ सारासार विवरण उपनिषद् अर्थिविचार सुखाचिया माहेरि तो योगच्युतु क्रीडे. ॥ ४१ ॥

**अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।**
**एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥ ४२ ॥**

योगिराजकुळीच, अथवा नित्य सिद्धांतासनी बैसूनि, करिती राज्य, पावे जन्म तो तेथे. ॥ सकळ जन्मामाजि हा नरजन्म दुर्लभ, त्यापरीस या ब्रह्मकुळि अवतार बहुधा फार दुर्लभ गा ! ॥ ४२ ॥

**तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।**
**यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन ॥ ४३ ॥**

जव नव्हे तो काळ-उपरम, यौवन ग्रामा न पावता, बाळपणी सर्वज्ञता येऊनि, यासि वरी. ॥ तेथ पूर्वप्राप्त सर्वज्ञा बळें, शास्त्रार्थ अवगत, स्वपद सिद्धीलागि करता यत्न मग सोपा. ॥ ४३ ॥

**पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ।**
**जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥ ४४ ॥**

मागिलाचि सद्बुद्धि, न पुढति नवि, उजळेचि. तेव्हां अभ्याससपूर्ण-समाधि घर पुसताचि त्याप्रति ये. मग निघाला सिद्धिसी भांडारातुनि आइता ब्रह्मस्थितिचे राणीव जाऊनि तो बैसे. ॥ ४४ ॥

**प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।**
**अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥ ४५ ॥**

बहुविधा जन्मांतरिची लग्नघटिका ते बुडालि कीं. म्हणुनि निजरूपी संलग्न तो जहाला. ॥ तापसी हे योगि अणिक ज्ञानिये अपुल्या मतही न पवता शिणले, निजांगे तेचि तो घडिला[1] ॥ ४५ ॥

**तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ।**
**कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ॥ ४६ ॥**

म्हणुनि कर्मठ ज्यासि वंदिती, तापसी मानिति जयाते, ज्ञानियाचे ज्ञानगम्य स्वरूप तो जाणे. ॥ याचिलागी सिकवितो तुज अर्जुना ! अंतःकरण तूं होय योगी, जाणुनि हे योगमहिमान. ॥ ४६ ॥

**योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना ।**
**श्रद्धावान्भजते यो मां स मेयुक्ततमो मतः ॥ ४७ ॥**

मिळुनि मजसी मीच होउनी भक्तिसाधनअन्वये जो आपण जहाला योगियाचा तोचि योगिराजु. ॥ स्वामिया प्रेमासि उपमा पाहिजे तरि, येतुले मी देह आत्मा तोचि वावरी ! बोलणें काये ? ॥ ४७ ॥

फलश्रुति ॥ सत्कृपे होऊनि योगमार्ग निरोपिला अभ्यासपूर्वक ऐकतां तो पार्थ आंगे घडियला योगू. ॥ यापुढे श्रीनाथ भक्तालागि उपदेशील जे गीतार्थ—सौरसचंद्रिका शिवराम विस्तारी. ॥४८॥

---

१ झाला.

हरिहि ॐ तत्सदिति श्रीमन्महाभारते शतसहस्रसंहितायां मूवैयासिक्यां श्रीभीष्मपर्वणी श्रीमद्भगवद्गीतासुपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अभ्यासयोगोनामषष्ठोध्यायः ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ श्रीचंद्रशेखरार्पणमस्तु ॥

॥ श्री वक्रतुंडाय नमः ॥ श्री भाललोचनाय नमः ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

**मयासक्तमनाःपार्थ योगं युंजन्मदाश्रयः ॥**
**असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥ १ ॥**

मग म्हणे भगवंत पार्था ! योगयुक्ती भजसी ज्याते, तेचि माझे. स्वरूप-संविज्ञान ते ऐके. ॥ हातियारत्नापरी मज सर्वगाते जाणासे जे, ते विज्ञानाज्ञानतेसी तूज सांगेन. ॥ १ ॥

**ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ।**
**यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥ २ ॥**

सत्वधी अज्ञान अणि विज्ञान म्हणिजे हा प्रपंचु हरपती जाणिव विचारही तेथ ते ज्ञान. ॥ पै अतां अज्ञान विज्ञानासी हरपे ज्ञानमात्रचि सांगतो. परिसता उजु ऐकणेचि पुरे. ॥ २ ॥

**मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।**
**यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥ ३ ॥**

त्या मनुष्या शतसहस्रामाजि विरूळा ज्ञानासिद्धिसी यज्ञ करि ठेउनि आस्था प्राप्तीलागुनी. ॥ त्यांत मज ही तत्वता जगदात्मयाते जाणतो विरळा असे तरि ऐक हा विज्ञानविस्तारू. ॥ ३ ॥

**भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ।**
**अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ४ ॥**

भूमि, हे जळ, अनळ, अनिळाकाश, मानस, बुद्धि, सोहंकार, ऐशी मिळुनिया हे अष्टधा प्रकृती. ॥ नाव अपरा म्हणिति इष त्रिलोक उपजे याच मूळे. ऐक पूर्ण विवंचना येथील तूं आतां. ॥ ४ ॥

**अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ।**
**जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ ५ ॥**

या अष्टधाची साम्यतावस्था तियेसी परा अशि खूण जी सजीव म्हणोनि संज्ञा अर्जुना आहे. ॥ जे जडाते जीववी, मन चाळवी, मति जाणविजे, निज अहंकारची जग हे धरूनि वागविती. ॥ ५ ॥

**एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय ।**
**अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥ ६ ॥**

सूक्ष्म जे स्थूळाचिया आंगा घडे ते. त्याचि द्वारे या भुताचि टंकसाळ पडे ठसे चौदा. ॥ उमटति मग सृष्टी नाणें होती येते मज जवरीच अभास. म्हणउनि मी जगाचा आदि अणि अंतु. ॥ ६ ॥

**मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय ।**
**मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥ ७ ॥**

जेंवि गांठी अनंत मणी माझारि सूत्रचि आदि अंती तसेचि मजवरि भासते. येऱ्हवि असे मीच. ॥ मजविना सृष्टीसि कारण नाहि नाही दुजेचि. म्हणुनी तेचि सत्ता ऐक माझे कारणात्मक गा ! ॥ ७ ॥

**रसोऽहमप्सु कौंतेय प्रभास्मि शशिसूर्ययोः ।**
**प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ॥ ८ ॥**

म्हणउनी उदकी रसु, कां पवनिचा जो स्पर्शनासी, सूर्यप्रकाशु गगनिचा जो शब्द तोहि मी. ॥ या जनाच्या ठाईचा अहंभाव, तो पुरूषत्व मी. सकल वेदी प्रणव तो मी. विश्व हे अवघ. ॥ ८ ॥

**पुण्यो गंधः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ ।**
**जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ॥ ९ ॥**

पृथ्विचे ते गंध अणि अग्निचे निज तेज मी. या त्रिभुवनी अहति भुते अपुलालिया जिवन, ।। जे जिति जीणे तयाचे जीवन ते मीच. तप जे तापसीचे मी अभिन्न असे सकल ठाई. ॥ ९ ॥

**बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् ।**
**बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ॥ १० ॥**

जग दिसे ज्याचोनि, जेथे नासता कांही नव्हे, ते मीच म्हणवुनी सकळ भूता बीज मी जाणे. ॥ बुद्धिमंते बुद्धि ते तेजस्वी तयाचे तेज मी. यालागी मुळिच मी. सनातन रूप ते माझे. ॥ १० ॥

**बलं बलवतामस्मि कामरागविवर्जितम् ।**
**धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥ ११ ॥**

प्राप्तिची धरी चाड अणि अप्राप्तिचा अभिलाष उभया वेगळे सात्विक अणि बळ बळवंती. ।। स्व स्वधर्म वाढवी, निज मोक्ष तीर्था नहावि तो काम सृष्टीसी बीज मीच. धनुर्धरा ! जाण. ।। ११ ।।

**ये चैव सात्विका भावा राजसास्तामसाश्च ये ।**
**मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि ॥ १२ ॥**

एक एकी विविध हे सत्वरजतमभाव हे मजहुनि झालेसे जाण तुं. मजमाजि ते अहती. ॥ परि त्यांत मी नाहीच. जे विश्व पहुडुनि जाग्रती न बुडेचि हे. माजी तसे मी यात नाही गा ! ॥ १२ ॥

**त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत् ।**
**मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम् ॥ १३ ॥**

जेंवि उदकी बांबुरी[1] जहालि तया उदकासी झांकी, तेंवि गुणमय भाव-बुद्धि मजहुनी जहाली. ॥ मजचि ठेले आड, तेणे मोह पाहुनियां भुते यातुनी मी तव वेगळा. मज नेणती कीरे ! ।। १३ ।।

---

१ शेवाळ.

**दैवी ह्येश गुणमयी मम माया दुरत्यया ।**
**मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥ १४ ॥**

जैंवि वृत्ति निवृत्ति तटिणी मोह जळ जेणें अवर्तु कामें क्रोध आदि जळचर, लोट अहंतेचे, ॥ हे नदी तरणेचि दुर्घट. पण, असे सोपा उपाव मदंघ्रीकमळि भजति ते तरतीच हे माया. ॥ १४ ॥

**न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यंते नराधमाः ।**
**माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ॥ १५ ॥**

या अहंताभूतसंचोरेचि लोक पिसाटले, मज नेणुनिया, विषयपंथी वहातचि गेले ! ॥ रजतमात्मक हर्षशोकी मारिले ते सैयचि नाही ! ग्रस्तमायाराक्षसी ते लोक किंबहुना. ॥ १५ ॥

**चतुर्विधा भजंते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।**
**आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥ १६ ॥**

मूळिच माते चुकुनिया मज भजति जे भजने चतुर्विध, जे अर्थ जीज्ञासु अणि अर्थार्थी तो ज्ञानी. ॥ अर्त अर्त्तिच्या मिसे, जिज्ञासु तो जाणावया मज, अर्थसिद्धीस्तवचि अर्थार्थी तिघे भजती. ॥ १६ ॥

**तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।**
**प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ॥ १७ ॥**

जेथ कांही नाहि करणें, द्वैत फिटता, मीची झाला. तोचि चौथा ज्ञानिया मज परम पढियंता ॥ तो म्हणे मज अंतरात्मा. मिही त्यासि तसेंच म्हणतो. कांहि त्या मज माजि नाही वेगळिक, पार्था ! ॥१७॥

**उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ।**
**आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम् ॥ १८ ॥**

आपुल्याला स्वहितलोभे भक्त भजती, तरि तया ज्ञात्यासि मीहुनि

---

१ नदी. २ काम "का" हस्तदोष. ३ स्मरण. "से" असाही प्रयोग आढळतो. ४ आवडता; प्रिय.

वोलभे मजवीण तो नेणें. ।। जाणुनि मज मागुति संसार पाहो विसरला. तो ज्ञानिया मी म्हणुनि बोलुं फार करू काये ! ॥१८॥

**बहूनां जन्मनामंते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।**
**वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥ १९ ॥**

बहुत जन्मी वहात वहाता, सत्वबुद्धितिरासी येता, गुरूकृपेचि चाट फुटता, ज्ञान–धरणी ये. ।। जेंवि बळडोही बुडाला घडतसा मज-माजि त्यासी सबाह्य मी तो दुर्लभू ज्या सर्व सर्वात्मा. ।।१९॥

**कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यंतेऽन्यदेवताः ।**
**तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया ॥ २० ॥**

प्रकृतिचे पाईक आधी रंक, भोगाचि दुराशा दुष्ट तिमिरे दृष्टीही झांकोळली ज्याचे. ।। ज्ञानागळे म्हणुनि यासी चूकले मज, देवतांतर भजति मग, विविधोपचारी सबाह्य सिद्धीसाठीं. ।।२०॥

**यो यो यां यां तनुं भक्तःश्रद्धयार्चितुमिच्छति ।**
**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ २१ ॥**

भक्त जो जो ज्याचिया देवांतरासी जो भजे सरे, तेथील तेचि ते पूर्णश्रद्धा मीच ।। अंगीकारी. मग तयाची चाड जे जे सकळ ते पुर्वी-तसे मी म्हणुनि तेथिल मीच तोच अपराध नीवर्ते. ॥२१॥

**स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ।**
**लभते च ततः कामान्मयैव विहितान्हितान् ॥ २२ ॥**

तो तया श्रद्धे नियुक्त त्याच देवलागी भजता त्याजपासुनि सकळ काममनोरथ पावे. ॥ परि सुरातरंयामि, जो सकल कर्मफळासी देता, नेणुनी मज, कल्पनेमाजिच गडबडिले ! ।।२२।।

---

१ आवडते. २ भाषण. विस्तार. ३ बोध रूपी कांठाला. ४ चाकर. ५ ज्ञानाधळे. "ज्ञानागळे" हस्तदोष. ६ इच्छा. ७ देवतांतर भजनरूप अपराध परततो–नाहींसा होतो. ८ सुरांतर्यामी–देवतांच्या अंतःकरणांत. ९ घोटाळले. मग्न झाले.

**अंतवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् ।**
**देवान्देवयजो यांति मद्भक्ता यांति मामपि ॥ २३ ॥**

हे भजन संसारसाधन, येरझार चुकेचि नाहे बुद्धि ज्याची अल्प, त्याला फळहि अल्पचि ते. ।। देव भजता देव व्हावे. मजाचि भजता मीच व्हावे. अमृत सींधुमाजी बुडुनि कां मरावें गा ! ।। २३ ॥

**अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यंते मामबुद्धयः ।**
**परंभावमजानंतो ममाव्ययमनुत्तमम् ॥ २४ ॥**

अव्ययाजुत्तम महा महिमान माझे नेणुनी, अव्यक्त माते व्यक्त मानिती. सीणती मूर्ख. ।। अनुपमाते माप करणें, मानुनिया व्यक्त अव्यक्तासि, असता सिद्ध मी कां साधनी श्रमीजे ? ।।२४।।

**नाहं प्रकाशः सर्वस्य योगमाया समावृतः ।**
**मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥ २५ ॥**

योगमाया पडळमध्यें आलियां, जन आंधळे हे केंवि पहाति मज अव्यया मोहदृष्टीने ? ॥ येन्हवी, मी सुलभ सकळा सर्व तो सर्वत्र व्यापक. काय करू या मूढ लोका ? कदापी मज नेणे ! ।।२५।।

**वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन ॥**
**भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ॥ २६ ॥**

जि भुते नासोनि गेली, सांप्रति जे अहाती, आणि पुढे जे होणार, अवघे मीच मी आहे. ।। येन्हवी, हे बोलणेंचि कदा नव्हे, ना होयजाये, असे अनुत्स्युत जाण तूं मज कवणही नेणे. ॥ २६ ॥

**इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंदमोहेन भारत ।**
**सर्वभूतानि संमोहं सर्गे यांति परंतप ॥ २७ ॥**

जे तदा अहंकार तनुसी स्नेह पडिला, तेचि इच्छा जन्मता, द्वेषासी तेणें वरियले प्रिती ॥ द्वंद्वमोहो वाढला तेणे भुतेही व्यापिली. मग जन्म मरणा वरपडा जहाली पहा कैंसी. ॥२७॥

**येषां त्वंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।**
**ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजंते मां दृढव्रताः ॥ २८ ॥**

ऐसिया मोहासि भिउनि परतता, अघ सर्व सांडुनि, पुण्यमार्गे धांव घेउनी, मज जवळिके आले. ॥ द्वंद्वतेची सरुनी माझे भजनी सत्यव्रत जयाते, तेचि मद्रूपासी सरते सत्वरे होती. ॥२८॥

**जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतंति ये ।**
**ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम् ॥ २९ ॥**

ये जरामरणासी पै जिंकावया माझीच आश्रय करुनि, भजति पूर्णतेणें मज महेशाते. ॥ कर्म अणि व्यवहार त्याचा सकल ब्रह्मचि ठाय होउनी, तयासी हे आध्यात्म काय दुजे असे उरले ? ॥२९॥

**साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः ।**
**प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः ॥ ३० ॥**

पूर्ण अधिभूताधिदैवत आणिक अधियज्ञ सहित तो मम स्वरूपे जे जाणिती परिपूर्ण प्रितीनें. ॥ माझिया आंगे जडूनिच राहिले, मरणावसरही नेणती ! मद्योग युक्ते कीर्ति हे ऐसी. ॥ ३० ॥ फलश्रुति ॥

॥ श्रीकृष्ण–अबुंज–गर्जने परिसूनिया अर्जुन–मयूरे सुखेचि आंदोळित आपणातचि अपण डोले ! । येथ समाप्त पदार्थ. पुढिलाध्याय मंजुळ तो पुसेल रमापती. अनुसरूनि ते शिवराम विवरीला. ॥ ३१ ॥ हरिहिः ॐ तत्सदिति श्रीमन्महाभारते शतसहस्त्रसंहितायां वैयासिक्यां भीष्मपर्वणी श्रीमद्भगवद्गीता सुपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानविज्ञानयोगोनामसप्तमोध्यायः ॥ ७ ॥ श्रीष्कृणार्पणमस्तु ॥

॥ श्रीमंगलमूर्तयेनमः ॥ श्रीपांडुरंगायनमः ॥ श्रीगुरु ॥

॥ अर्जुन उवाच ॥

**किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम ।**
**अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ॥ १ ॥**

मग म्हणे अर्जुन, हरि ! मी तेचि पुसतो सांगिजे जी ब्रह्म कवण, ॥ कशास म्हणती कर्म ते कवण, काय ते अध्यात्म आणि अधिभूत ते कैसे, तथा अधिदैव म्हणिजे ते कसे ? हे उघड सांगावे. ॥ १ ॥

**अधियज्ञः कथंकोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन ।**
**प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः ॥ २ ॥**

कृष्णजी ! अधियज्ञ खुण ते कशे शरीरी जाणिजे, अंतःकरण नियमी प्रयाणी जाण हे कैसे ? ॥ ऐकुनी हे पाथवत्सा कृष्णगाय कशी दुभे, ते प्रश्नार्थसारांमृतसुखे तूं ऐक गा राया ! ॥ २ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

**अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ।**
**भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥ ३ ॥**

जे सदा अविनाश आणि अखंड तेंची ब्रह्म. सहज स्थिति तयाची नित्यता. अध्यात्म त्या नाव. ॥ मूळिच कर्ता हो दिसे. कारण हे शेखी नसे. मध्येच अव्यक्तीच हा आकार ते कर्म. ॥ ३ ॥

**अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ।**
**अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर ॥ ४ ॥**

जै भुताची घडणि ते अधिभूत म्हणति तेंची आधीदैवत, जयाला जीव म्हणुनी संत आळविती. ॥ याच अधिभूतादिकी जो वेष्टला, परि वेगळा, अज्ञानहवनी जो उरे, तो मीच अधियज्ञ. ॥ ४ ॥

**अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।**
**यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥ ५ ॥**

जेंवि सर्पत्वचेसी सांडी, कां उबारे नर वस्त्र फेडी, तरि तयाचा अवयवासी भंग हो काये ? ॥ या प्रतीतिसी मोकळी तनु जाणुनी अविनाश आपणातेची माते पाउनी होती निजांगें मी. ॥ ५ ॥

**यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यंते कलेवरम् ।**
**तं तमेवैति कौंतेय सदा तद्भावभावितः ॥ ६ ॥**

येऱ्हवी निपटचि उरावरी अदळलिया मरण, तै अंतःकरण जे जे स्फुरे ते तेची होवावे. ॥ जेंवी ज्याचा ध्यास पडता तोचि डोळा देखिजे तैसेची, जे जे भाविजे ते तेंचि ते प्राप्ती. ॥ ६ ॥

**तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्यच ।**
**मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम् ॥ ७ ॥**

म्हणुनि जे जे ऐकिजे आणि पहासी, बोलसी मनीं जे भाविशी, तो आंतबाहिर मीच करूं निघाली. ॥ जहाल्या ऐसी जरी तनु मेलियाही न मरिजे. ॥ यालागीं मद्भावेची मज पावोनिया झुंजे. ॥ ७ ॥

**अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ।**
**परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिंतयन् ॥ ८ ॥**

म्हणुनिया अभ्यासपंथे युक्ती चित्त उचलुनी, परमपुरुष भजता निजांगे तोची मज पावे. ॥ आत्मया मोहरेची लागे चित्त, ते शरीरादिकाचा विसर, सहज पडुनि ठाके होत जात संता. ॥ ८ ॥

**कविं पुराणमनुशासितारमणोरणीयांमनुस्मरेद्यः ।**
**सर्वस्यधातारमचिंत्यरूपमादित्यवर्णं तमसः परस्तात् ॥ ९ ॥**

जो जुना गगनाहुनी परमाणुहुनिसाने, जया सत्यानिहे जग चळत, विण आकार ज्या असणें, ॥ जोविये सकळासी, सर्वजियें जियानें, जो अचिंत्य तेणे निनाै नित्योदये जाणोनि जो स्मरतु. ॥ ९ ॥

---

१ असता २ जीव ३ ना ?

**प्रयाणकाले मनसाचलेन भक्त्या युक्तो योगबलेन चैव ।**
**भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक्स तं परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥ १० ॥**

तरि मनाचा स्थैर्य, तेणें योगयुक्त, सज्ज होउनी, भ्रूतटाप्रती प्राण आणुनि मध्यते मार्गे. ॥ झांकिला घटिचा दिवा तो केधवा कीं जाय जहाला. या रिती तनु ठेविता तो ब्रह्मपद पावे. ॥ १० ॥

**यदक्षरं वेदविदो वदंति विशंति यद्यतयो वीतरागाः ।**
**यदिच्छंतो ब्रह्मचर्यं चरंति तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये ॥ ११ ॥**

ज्ञान अज्ञान न विकरे[1] म्हणुनि अक्षर वेदवेत्ते वदति, जेथें जितेंद्रियाचा सर्वदा रिघ होये, ॥ धरूनि ज्याची आवडी हे ब्रह्मचर्यही अचरती. हे त्या पदाप्रती पावले. प्राप्ति–उपावही ऐके. ॥ ११ ॥

**सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ।**
**मूर्ध्न्याध्यायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ॥ १२ ॥**

संयमुनि सर्वेंद्रियाते, आंतबाहिर निर्विषय मन करूनि, ते हृदयीं बुडे ऐशीच करूनिया ॥ योगयुक्तीं, मूर्ध्निवरी आणुनी प्राणाचा प्रणव धरिल्या मिळे मग मन नभीं रविबिंब जव लोपे. ॥ १२ ॥

**ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।**
**यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥ १३ ॥**

तववरी तो वायु करूनी स्थिर जसें लक्षी हा ॐकार बिंबी विलसतु तैसेचि[2] हे येथें ॥ ओं असे स्मरताची तेथें प्राण पुरला, मग उरे ब्रह्मैव अक्षर, तोची पावे तनु अशी त्यजिता. ॥ १३ ॥

**अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।**
**तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥ १४ ॥**

म्हणसी कैंचे हे घडे त्या मरणकाळी ? ऐक ! सांगूं मजविना दुसरे

---

१ विकार पावत नाहीं. २ अशा स्थितीत.

न पाहे, नित्य मज भजतो– ।। योग मद्भजनींच त्युक्त तया सुलभ मी सर्वदा. मां मरणकाळीं नसे उभा, तरी कायसा मी देव ? ! ।। १४ ।।

**मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् ।**
**नाप्नुवंति महात्मानः संसिद्धी परमां गताः ॥ १५ ॥**

मी जया मागे पुढे तैसेचि ते मज भावते ऐसे परम सिद्धीसी ठाकुनी राहिले संत. ॥ त्यासी अस्थिर दुःख–आलय शरीर दृष्टीसि कां पडे, तो स्वप्निचा संसार जैसा जागता नेणो. ।। १५ ।।

**आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।**
**मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते ।। १६ ॥**

येऱ्हवी त्या ब्रह्मलोका पावल्या लोकासी पुना वृत्तिचे वेळसे न चुकती अर्जुना साच. ॥ यास्तवचि मज पावल्या पुनरपिहि जन्मा सेच न घडे. म्हणुनि धौत्मा ब्रह्मपणाचा मान तूं ऐके ! ।। १६ ॥

**सहस्रयुगपर्यंतमहर्यद्ब्रह्मणो विदुः ।**
**रात्रिं युगसहस्रां तां तेऽहोरात्रविदो जनाः ॥ १७ ॥**

जाय दशशत चौकडया तै ब्रह्मयाचा दिवस होये. तसेचि तितुक्या जाती रात्री तै होये. ॥ यापरी, अहोरात्र होता ब्रह्मयाचा दिन हरे. यापरी रात्रिसी वेत्ते जाणतिकं संख्या. ॥ १७ ॥

**अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवंत्यहरागमे ।**
**राज्यागमे प्रलीयंते तत्रैवाव्यक्तसंज्ञिके ॥ १८ ॥**

ब्रह्मयाचा चौप्रहर फिटताचि हा आकार–सींधु समग्र आटे. मागुती याला पहाट होता ॥ सकळ व्यक्ती त्याच व्यक्ताहुनी मग निघती. ऐसे उद्भवो जेथूनि होये भूतासी लय तेथें. ॥ १८ ॥

**भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते ।**
**राज्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥ १९ ॥**

---

१ पुनरावृत्तिचे = पुनर्जन्माचे. २ फेरे. ३ ? ४ ?

ब्रह्मदिन अधिभूत होताती. तयाचीं रात्र येता विश्व अव्यक्तीत जायेल यासी जे जैसे. ॥ म्हणुनि भूतग्राम हा तव होत जात जसे शरत्समइ विलोप अभ्र नभीं. उज्ञु ग्रीष्म ऋतुसी निघे. ॥ १९ ॥

**परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तो व्यक्तात्सनातनः ।**
**यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ॥ २० ॥**

व्यक्तता अव्यक्तता वसुनिया ठाईं वसे जै नामरूपासमुळ हरपे तोचि अव्यक्त. ॥ तेचि नामरूपासी येता, व्यक्त म्हणजे म्हणुनि भूते-नासता न नासेचि तोचि सनातनू पूर्ण. ॥ २० ॥

**अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् ।**
**यं प्राप्य न निवर्तंते तद्धाम परमं मम ॥ २१ ॥**

आलिया साकार ते न वचे निराकारत्व. आकाराचिया लौपि न विसरे नित्यता जो कां, ॥ तोचि मी अक्षर. असे जाणीतल्यावर मागुती फिरणेंचि नाही. तेचि माझे परमपद जाण. ॥ २१ ॥

**पुरुषः स पर पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया ।**
**यस्यांतःस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ॥ २२ ॥**

शरीर तो न करी न करवी प्रकृतिसंगे पुरुष म्हणिजेत, सकलभूते वसति, ज्या पासुनि जग होये, ॥ तो पहावा तरि अनन्य पुरि प्रवेशुनि, शुद्धभक्तीप्रेमयोगें हृदईचा हृदयस्थ हृदया ये. ॥ २२ ॥

**यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिनः ।**
**प्रयाता यांति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ॥ २३ ॥**

काळ शोधुनि ठेविती शरीर, स्वरुपचि होउनि ठाती, येरते संसार-चक्रीं मागुति फिरती. ॥ तेथ हे सायुज्य पुनरावृत्ति काळाधिन असती काळ तुजप्रती सांगतो. अवधारि वीरपती ! ॥ २३ ॥

**अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।**
**तत्र प्रयाता गच्छंति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥ २४ ॥**

जेथ अग्निर्ज्योति अंतरी; बाहिरे जो शुक्ल पक्षु दिवस, सा मासांत मासु उत्तरायण गा ! ॥ ऐसिया दिवसात, अर्चिरादि मार्ग योग साधुनी देह ठेवितो जे, तयाची उत्तरायण गा ! ॥ २४ ॥

**धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ॥**
**तत्र चांद्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥ २५ ॥**

बुद्धि अग्निबळेचि उजळे. तोचि अग्नी मंद जहाल्या धुरची अवघा आंत बाहिर शीतपक्षु रात्री ॥ आणि मासा दक्षणायन या अवघडी योगि हे निमाल्या तरि तया पुनरावृत्ति ते न चुके. ॥२५॥

**शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते ॥**
**एकया यात्यनावृत्तिमन्यया वर्तते पुनः ॥ २६ ॥**

हित अहित जाणावया ते दोनि मार्गचि जाण वेत्ति जे या जगा प्रसिध्ध शाश्वत प्रगट आहेती ॥ येक ब्रह्मत्त्वासी पाववी, येक पुनरावृत्ति दाखवी, परि देहांते दैवयोगे लाहिजती ते ते. ॥२६॥

**नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन ॥**
**तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ॥ २७ ॥**

जन्ममरणे तनुचि करिता हे मुळीच असत्य जाणुनी विश्व अवघे अपण होउनी विचरतो सुखिया ॥ त्यासी हे मोहोचि न सिवे जेंवि रात्रीं दिवाकरातें ॥ म्हणुनी पार्था सर्व काळीं योगयुक्त होये. ॥ २७ ॥

**वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् ॥**
**अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा योगी परं स्थानमुपैति चाद्यम् ॥२८॥**

वेद अध्ययनी तथा यज्ञादिकी तनु शोषणादिक तापसी सत्पात्रदानी सुकृत जै होये ॥ शीघ्र तो मग तोची होये जो मिया कथिला सकळ प्रश्नार्थनिर्णय जाणता मुळिचिच पद पावे ॥ २८ ॥ फलश्रुती ॥ ब्रह्म आदी प्रश्न आठ अपूर्व याचा निर्णयार्थ करुनि हरीनें दाविले सद्भक्त

---

१ सहा.

पार्थाते ॥ यापुढे भगवंत कांये कृपारसें तो वोरसेल रहस्य गोड निरू-
पणी शीव्रराम रीघ करी ।। २९ ।। हरिहिः ॐ तत्सदिति श्रीमन्महा-
भारते शतसहस्त्रसंहितायां वैयाशिक्यां श्री भीष्मपर्वणि श्रीमद्भगव-
द्गीता सुपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे अक्षरब्रह्म-
योगोनाम अष्टमोध्याय: ॥ ८ ॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ।। अभंग ॥
ऐसी अष्टग प्रसंगी ॥ गती नेमीतु सारंगी ॥ साधका सकळे आंगी ॥ सुख
ऐसे भोगाया ।। १ ।। आहो योगीश्रेष्ठ त्यांत ।। जो कां हरिरूपी
संतत ॥ त्याची वर्णियेली ख्यात ।। याच अष्टम अध्याई ।। पुढें नवम
ऐकावा ।। त्यांत देवो सापडावा ।। तुका म्हणे आम्हा बरवा ।। ज्या
वर्णनी आनंदु ।। ३ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीरघुवीर समर्थ ॥ श्रीगुरू प्र॥ ॥

" भक्तिने भगवंत सुलभ म्हणुनि मागा सांगुनी आता तया जगदी-
श्वराचे उत्कटैश्वर्यें ॥ स्वरूप अपुले अर्जुनाप्रती प्रगट नारायण करील."
म्हणुनी संजय गर्जला. धृतराष्ट्राय ऐके ॥ १ ॥

श्रीभगवानुवाच ॥

इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे ॥
ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥ १ ॥

अर्जुना तूं शहाणा भावीक, जेंवी बोलिलो तो नागवेसी. म्हणुनि
सांगो तूज हे जिविचे. ॥ क्षीरनीर हंसापरीच निवाड हे करीन ज्ञान-
विज्ञानद्व्याते, ऐकता जे सुटशी दोषाहुनी ॥ १ ॥

**राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ॥**
**प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥ २ ॥**

सकल विद्यामाजी राजा परम पावन श्रेष्ठ हे हाताशी आल्या नवं-चिजे, न सरेची अनुभविता. ॥ दृष्टीचे फळ आणी धर्मा अनुकुल स्थिति रम्य सोपा तरि जना न कळेचि. कां म्हणसी, तरी ऐक. ॥ २ ॥

**अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप ॥**
**अप्राप्य मां निवर्तंते मृत्युसंसारवर्त्मनि ॥ ३ ॥**

हृदईचा मी स्वधर्म सकळा सुख अराम आसता नेणुनी मज जन कसा विषयावरी पडला! ॥ दर्दुरा कमळासि एकचि ठाव परि तो चिखल सेवी. तेंवि मज न पवोनि संसारात गडबडिले ॥ ३ ॥

**मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ॥**
**मत्स्थानि सर्वभूतानि न चाहंतेष्ववस्थितः ॥ ४ ॥**

मुख मुखाप्रति, भानु तेंवी प्रगट, मी अव्यक्तता माझी न नासत म्याच हें जग आणिले व्यक्ती ॥ मजचिमाजी भूत सकळ, पण त्यांत नाहींच मी जैंसे जळ नसे फेसात, जाग्रतिमाजि तो स्वप्न. ॥ ४ ॥

**न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ॥**
**भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥ ५ ॥**

जव वरी संकल्प भासत, तवभूत भासति; जेव्हां संकल्प टाकुनि पाहता मग मीच मी आहे ॥ या मदाधारे भुते नसुनि दिसति मी भूतभावन यापरी भूतास्थे[1] भूते भर्ताहि नव्हे पाहता ॥ ५ ॥

**यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ॥**
**तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ॥ ६ ॥**

जेंवि गगनाएवढा हा वायु सर्वत्र हो वसे परि हलविलिया वेगळा. येऱ्हवी गगन ते तो. ॥ तेंवि मजमाजी भुते संकल्पमात्रे वेगळी दिसताति नो लोप तेव्हां मग मीचसे जाण. ॥ ६ ॥

---

१ " भूतस्थ " पाहिजे.

**सर्वभूतानि कौंतेय प्रकृतिं यांति मामिकाम् ॥**
**कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥ ७ ॥**

प्रळयअंती सकल भूते प्रकृति ते ऐक्यासी येती कथियले जे तूज मागे द्विविध म्हणवूनी. ।। या शरत्काळी जसे हे मेघ नभि गर्भीच अटती, तेंवि कल्पादि पुढति मी भूते सृजितो. ॥ ७ ।।

**प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः ।।**
**भूतग्रामामिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥ ८ ॥**

माझिये प्रकृती अधिष्ठाने पुढतपुढती दिसत हा जो सर्वभूतग्राम सृजितो मी तिच्या योगे ॥ म्हणुनि करणे प्रकृतिचेची. मला श्रम कांहिच नाहिसे. विधुदय सींधु भरती चंद्रमश्रम काये ? ।। ८ ॥

**न च मां तानि कर्माणि निबध्नंति धनंजय॥**
**उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ॥ ९ ॥**

निर्मणे अणि पालणे कर्म तियेचे एकही न बाधु सकाति तेंवि हे मज पूर्ण कामाते. ।। मी नव्हे असक्त अणी ते न करवी. नकरी जैंसा दीपकवत रहटत कवणिये[1] परि कांही तो नेणे ।। ९ ।।

**मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ॥**
**हेतुनानेन कौंतेय जगद्विपरिवर्तते ॥ १० ॥**

जेंवि या जगचेष्टनासी निमित्तमात्रचि रवि, तसा माझी प्रकृति सचराचरार्वित निमित्त ते मीची. ॥ जेथ जग होवावया प्रकृतीच कारण, योग हा निजगूढ, तूंते मुख्य योगू, उघड म्या कथिला. ॥ १० ॥

**अवजानंति मां मूढा मानुषीं तनुमाश्रिताम् ॥**
**परं भावमजानंतो मम भूतमहेश्वरम् ।। ११ ॥**

सकलभूतात्म मी हा, परम माझे भाव नेणुनी, मजवरी मनुजत्व अरोपिति, ते जाण महामूर्ख. ॥ जेंवि पीता फेस जळशेवन जहालेंसे नव्हे[2], तैसीच स्थूळमतीने पहाता जाणवे केंवी ? ॥ ११ ।।

---

१ कोणीही ( पुरुष ). २. हा उत्तरगर्भ प्रश्न आहे.

**मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः ॥**
**राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः ॥ १२ ॥**

रजतमात्मक मोहिनी जे राक्षस प्रकृतिचि या तोडी भूताडी[1] जहाले जे मजासि जन विमुख ॥ होउनीं, आशा विफल, त्याचीच कर्मे निष्फळ. तया जे चित्त मोहाधिष्ट जहाले ज्ञान मग कैंचे? ॥ १२ ॥

**महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ॥**
**भजंत्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥ १३ ॥**

सकल रूपही मीच जाणुनि वाढतेनें[2] प्रेमभावें भजत, याचा हृदयचा मी क्षेत्रसंख्यासी[3]. ॥ विश्व होउनी आघवे, विश्वंभरा मज कवळुनि, मी जहाला. दैवी प्रकृतिची काय ते वाणू? ॥ १३ ॥

**सततं कीर्तयंतो मां यतंतश्च दृढव्रताः ॥**
**नमस्यंतश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥ १४ ॥**

माझिया कीर्तने सुख विश्वचिहि दुखेचि नाही. करिति प्रत्याहार. सबळे करण आवरिती. ॥ वाटसान म्हणत. वस्तुमात्रे न मनिच. आवडिया भजनभावे नित्य युक्त पुनः पुना भजती. ॥ १४ ॥

**ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजंतो मामुपासते ॥**
**एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ॥ १५ ॥**

आणिकही उपासती मज ज्ञानयज्ञ करूनि भेदपशुसि होमुनि समरसाविरथीक मज्जुनिया ॥ येक बहुधा देखता विश्वाकृति नानातरी मज येकल्या ते येक संत. ईतरासी कळेना. ॥ १५ ॥

**अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम् ॥**
**मंत्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम् ॥ १६ ॥**

सकळ मुखि जे अर्पिजे ते मजचि ऐंसे जाणत्याचा वेदु मी त्या

---

१ जमीन बडविणारे. अर्थशून्य क्रिया करणारे. २ वाढत जाणाऱ्या. ३ संन्यासी. " संख्यासी " हस्तदोष.

श्रुतिचा प्राकृत मीच यज्ञु, ।। ते स्वधा स्वाहा हवी मी, विविधौषधिमंत्रही मी, आज्ये[1] अग्नीमाजि हविजे सकळ मीच मी. ॥ १६ ॥

**पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः ॥**
**वेद्यं पवित्रमोंकार ऋक्सामयजुरेव च ॥ १७ ॥**

माझिया ज्या अंगसंगे प्रकृति पावे जन्म तो मी जनक अणि जग प्रकृतिचा सृजे पितामह मी. ।। जाणत्याने जाणिजे म्हणुनि मी निर्दोष. वेद्य सुभूमिका ॐकार ऋग्यजु साम अक्षर मी. ।। १७ ॥

**गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ॥**
**प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् ।। १८ ॥**

प्रकृतिचा विश्रांति, गति मी भोगिता. गुणवंतिचा भ्रतर[2] मी, योमापैरी[3] मी साक्षी सकळाचा. ।। हे चळे सत्येनि माझ्या, सकळ भूता वास, रक्षक, सुहृद, आदिनिधान, बीजस्थान, अव्यय मी. ॥ १८ ।।

**तपाम्यहमहं वर्षं निगृण्हाम्युत्सृजामि च ।। १९ ॥**
**अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ॥ १९ ॥**

सूर्यवेशे[4] मी तपे तै शोषिता, पाठीच होउनी इंद्र मी वर्षे, अनुग्रहनिग्रहा कर्त्ता. ॥ मृत्युहि मी, अमृतहि मी, संत अणिक असंतहि मी. मीच आसता मी नव्हे ती, हे काय करूं यासी ? ॥ १९ ॥

**त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयंते ।।**
**ते पुण्यमासाद्य सुरेंद्रलोकमश्नंति दिव्यान्दिवि देवभोगान् ॥ २० ॥**

यज्ञस्वरूप स्वयेची असता टाकुनी, त्रिगुणात्मवेदी यजुनि, येउनी सोमसर्ग प्रार्थिती कैसें मज निजानंदासि विसरूनि ! तेचि पुण्य सिदोरि नेउनि ते सरे जो, तेथ भोगिती दिव्यभोगाते. ॥ २० ॥

**ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति ।।**
**एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभंते ।। २१ ॥**

---

१ तूप. आज्य. २ भ्रतार–हस्तदोष. ३ व्योमापरी; आकाशाप्रमाणें. ४ सूर्य होऊन.

पुण्य सरल्या मागुती अधोमुखे गर्भासी यांवे ? काय सांगू दीक्षिताचे निपट लाजिर्वाण ! ॥ हृद्गता मज सांडुनि, केवळ त्रयधर्मासी वरपडुन, कसे हे कामिकामिक येती अणि जाती ! ॥ २१ ॥

**अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ॥**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ २२ ॥**

वेदही मज नेणुनी वायाचि गेलासे विचारूनी, अन्य ठाकुनि वहवले जे माझिया भजनी. ॥ मग तिही जे जे करावे मजचि करणे ते घडे ऐसा तया मद्भजनयोगी क्षेमकर्त्ता मी. ॥ २२ ॥

**येऽप्यन्यदेवताभक्ता यजंते श्रद्धयान्विताः**
**तेऽपि मामेव कौंतेय यजंत्यविधिपूर्वकम् ॥ २३ ॥**

येऱ्हवी ईंद्रादि देवा यजत असता धरुनि श्रद्धा तेहि परि मज पावते पण विधिच नाही तेथे ॥ ग्रास कानी घालिता, नेत्रासि पुष्पें बांधिता, जैंसा विनोदू; तसाचि नेणुनि मज सुराय जाणे ! ॥ २३ ॥

**अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च ॥**
**न तु मामभिजानंति तत्त्वेनातश्च्यवंति ते ॥ २४ ॥**

अविधि यजनाचा सकळ यज्ञानासी भोक्ता ईश्वरू. मी येथ. मजवाचूनि दुसरा तव नसे कोण्ही. ॥ नेणुनी निजतत्व माझे, अन्य भाउनी देवता यजताति. यास्तव जन्ममरणमळात बुचुकुळती. ॥ २४ ॥

**यांति देवव्रता देवान् पितॄन्यांति पितृव्रताः**
**भूतानि यांति भूतेज्या यांति मद्याजिनोऽपि माम् ॥ २५ ॥**

देवांतर भजति ते तनु टाकिताचि सुरत्व पावती. पितरउपासक ते जीवितचि असति पितरत्वी. ॥ यजति भूतालागुनी प्रत्येक्ष भूते म्हणुनि मज सर्व भावे पूर्ण भजता मीच होती. ॥ २५ ॥

**पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ॥**
**तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ २६ ॥**

ती फुले आणि पत्र हो, फल उदक हो, अळुमळूं[1] मजकडे दावि-
ताचि अनंतकर पसरूनि ते सेवी. ॥ होत कां भलते तयाते आधी टाकि-
तसे मुखातची. मग तयाचा वोळगणा[2] मी होतसे पार्था ! ॥ २६ ॥

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ॥**
**यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ २७ ॥**

अर्जुना ! तुज सांगतो. पात्रात्रया मज सुलभ साधन जे करिसी,
व्यापार शेवी यजसी. जे कांही ॥ पात्र पाहुनि देसि, तपसी करूनि ते
मद्भावना. मोहरे मदर्पण करि सुखें. मग मत्पदा येशी. ॥ २७ ॥

**शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबंधनैः ॥**
**संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ॥ २८ ॥**

यापरी मज अर्पिता शुभ अशुभ फळ भोगी तुज बाधु न सकति
दग्धबीजन्याय ते होती ॥ युक्ति सोपारी[3] तुला संन्यास योगाचि दिल्ही
इनेचि चोखाळूनि पावसी मजचि कौंतेया ! ॥ २८ ॥

**समोहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ॥**
**ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥ २९ ॥**

मी समचि सर्वाभुति, मज द्वेषिया अणि मीत्र दोनी नसतिसे मज
जाणुनी, मी होउनी भजतु ॥ तो पुरुष देही दिसे, परि माझिया ठाई असे
अणि मीहि त्याचा हृदई ठेलाची असे जाण. ॥ २९ ॥

**अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ॥**
**साधुरेव स मंतव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥ ३० ॥**

वाढतेनि प्रेमभावे मद्गती हे सहज जीवित–आस्था मजचि लागीं
जयाचिये तो दुराचारी ॥ जाणतू तो मीच आहे. भगवद्दत्तार प्रसित्थ
सदा मजचि माजी रूळे त्या दुष्कृते कैंची ? ॥ ३० ॥

**क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छांतिं निगच्छति ॥**
**कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥ ३१ ॥**

---

१ थोडेसें. २ दास; आश्रित. ३ सोपी.

म्हणसी मज पावे अवसर हे गमेल तूझ्या मन, जव सूर्य उदया नाहीं आला तवचि ते रात्री. तेवि मद्भजनांत रिघताक्षणचि मी जहालो. सख्या अर्जुना ! मज पावल्या मग नाश कैंचे त्या ? ॥ ३१ ॥

**मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ॥**
**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम्॥ ३२ ॥**

ज्याचि त्या वाचेसी माझ्या हा अखंड आलाप आहे, दृष्टी मद्रूपचि जडली, मातेची तो ध्याये. ॥ होतु कांते पापयोनी, स्त्रीच हो का, वैश्य, शूद्र, तथापि तेही परम गती पावोनी उद्धरिले. ॥ ३२ ॥

**किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ॥**
**अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ॥ ३३ ॥**

जे सकळ धर्माभिराम तेचि मद्रूपी अभिन्न ब्रह्मवर्यही तरति. येथे कवण नवलांहो. ॥ म्हणुनि हे शत संधी जर्जर शरीर नौकेमाजि असता न बुडता स्वहिताचि साठी मज भजावे वा ! ॥ ३३ ॥

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ॥**
**मामेवैष्यासि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ॥ ३४ ॥**

यास्तवचि आम्ही तुला शिकवीत तैसे रहाट तूं सर्वदा. मन माझिया मोहरे करी पार्था ! ॥ मजप्रती तूं यजनही यज. पूर्ण माझा भक्त होये. मज नमी. या रीतिने मज पावसी सत्य. ॥ ३४ ॥

फलश्रुति मुख्य शब्दब्रह्मयोग धनंजयाप्रती देव वदता. कृष्णअर्जुनपण विरे कृष्णार्जुनामाजी. ॥ यापुढे विभूती-उत्सव आपुले महिमान प्रगटी. ते कथा बहु गोड कीं शिवराम विवरीतू. ॥ ३५ ॥

**हरिःहिः ॐ तत्सदितिश्रीमन्महा भारतेशतसहस्रसंहितायां वैयासिक्यां श्रीभीष्मपर्वणी श्रीमद्भगवद्गीतासुपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे राजविद्या राजगुह्य योगोनाम नवमोध्यायः ॥ श्रीकृष्णार्पण मस्तु ॥ श्रीसद्गुरुनाथार्पणमस्तु ।**

---

**1 कालेकरून.**

**श्रीगणेशायनमः ॥ श्रीलक्ष्मीनृसींव्हंभजेत् ॥**

अर्जुनाचा निर्विकल्प अकल्पतरु फळला, कसा संसार दैन्ये ध्वसुनी विभूतिफळ देतु ! ॥ इंद्रियेविण त्या फळाचा अति सुधारस सेविता तो पार्थ पक्षी लक्ष सुख लाभोनि सुखावे[1]. ॥ १ ॥

**श्रीभगवानुवाच**

**भूय एव महाबाहो शृणु मे परमं वचः॥**
**यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ॥ १ ॥**

काय पार्थाप्रति वदे हरि कथियले मागे तुला जो मागुती सांगो बरे ते ऐक महाबाहो ! ॥घट पाहात्रा घालुनी जळ न भरिजे पुनरपि भरीजे[2], तसे अवधान पाहुनी निरोपि तो पुढिये. ॥ १ ॥

**न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः ॥**
**अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः ॥ २ ॥**

माझिया महिमान जग निर्माणसामर्थ्यासि हे सर्वज्ञ महर्षि देवगण परि नेणती सहसा. ॥ तेथ कारण हेच की जे सकळ देव महर्षींचा मी आदिप्रभव अनादि मी जेथ परत ते वेदा. ॥ २ ॥

**यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम ॥**
**असंमूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते॥ ३ ॥**

जो विवेके अमळ डोळा, मी अनादि अजन्म सकळा, प्रकृतिचाळक भाव हा चोखाळला जाणे ॥ तो प्रकृति दोषाचिये मातुहि परि नेणिजे तो व्यवहारता सगळाचि पुतळा ज्ञानपियुषाचा ॥ ३ ॥

**बुद्धिर्ज्ञानमसंमोहः क्षमा सत्यं दमः शमः ॥**
**सुखं दुःखं भवो भावो भयं चाभयमेव च ॥ ४ ॥**

वेगळाला या भुती मत्प्रकृति सत्ता यापरी जे बुद्धि आत्मज्ञान नि-

---

१ सुखी होई. २ ज्ञानेश्वरींतील दृष्टांत.

मोह क्षमा चौथी ।। सत्य गोनिग्रहे[1] मन स्थिर जातसे सुखदुःख भया निर्भय तशी हे जन्ममरण अणिकही ऐके ! ।। ४ ॥

**अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः ॥**
**भवंति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः ॥ ५ ॥**

जे अहिंसा आणि समसंतोष तपसा पात्र दानहि कीर्ति अणि अपकीर्ति ऐसे भाव जे अहाती ॥ मजचिपासुनि होति भूताठाई वर्तती एक माते जाणति दैवेचि अपुल्या नेणती एक ।। ५ ॥

**महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा ॥**
**मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः ॥ ६ ॥**

अणिक माझे भाव अकरा तेहि ऐक धनुर्धरा जे कस्यपादिक सप्तऋषि मनुचारि चौदामाजी ॥ सृष्टीकारण रूप होते, मनिहुनी जन्मले होते, हीच केल्या लोक हे विस्तार माझा जाणे. ॥ ६ ॥

**एतां विभूतियोगं च मम यो वेत्ति तत्त्वतः ॥**
**सोऽविकंपेन योगेन युज्यते नात्र संशयः ।। ७ ॥**

भाव हे विभूति ऐश्वर्यत्व माझे तत्व जाणे त्यासी झाले चेईरे[2] अपज्ञानाचे[3] ॥ तो मनाचे मीच आंगे मीनलो. मग अचलयोगे सर्वथा नलगेचि कारण संशयो येथें. ॥ ७ ॥

**अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते ॥**
**इति मत्वा भजंते मां बुधा भावसमन्विताः॥ ८ ॥**

मीच सत्य निमित्य सकळा मजचिपासुनी हे प्रवर्त्तत यापरी जाणोनि माते भजति सद्भावे ॥ तेच केवळ मुगुटमणि सुज्ञानियाचे. अपण अपुले भव्य भक्तहि, जेंवि रविने रवीसी ऊजळीजे ! ।। ८ ॥

**मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयंतः परस्परम् ॥**
**कथयंतश्च मां नित्यं तुष्यंति च रमंति च ॥ ९ ॥**

---

१ इंद्रियनिग्रह. २ जागृति. ३ भ्रमाचें.

प्राणचित्तहि निरउनी मग शिष्य गुरुचे जे रहस्य परस्परे गर्जति सुखे सप्रेम उल्हासे. ॥ यापरी कथिता कथाविस्तार अपणामाजि विरती ! ते निराळेपणही ग्रासुनी विहरती स्वसुखे. ॥ ९ ॥

**तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ॥**
**ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ॥ १० ॥**

ते असे निजयोगयुक्ती प्रीतिपूर्वक भजति माते ते जयाकडे वास पहाती तेथ तेथे मी. ॥ काये देणें त्यासी उरले, सांग माझेपण तथापी तयासी ते मती जेउ देणे मीच ते होती ! ॥ १० ॥

**तेषामेवानुकंपार्थमहमज्ञानजं तमः ॥**
**नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ॥ ११ ॥**

येकु मी वाचूनि वावो करुनि, येर जिवी धरूनी मज भाविता, मग मी तयाचा होतसे दिवटा ॥ गडदरजतमराति नासुनीच नवा ज्ञानोदयो करितूं. तया मागे पुढे मी वोळगे पार्था ! ॥ ११ ॥

**॥ अर्जुन उवाच ॥**

**परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान् ।**
**पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभूम् ॥ १२ ॥**

विनविले मग अर्जुने " जी कृष्णजी ! परब्रह्म तूं विश्रामधाम यया भुतासी पवित्र तूं परम ॥ प्रकृतिहूनि वेगळा शाश्वत स्वये भासकही अदि-देव जन्मातीत व्यापक पूर्ण कळलासी. ॥ १२ ॥

**आहुस्त्वामृषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा ॥**
**असितो देवलो व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे ॥ १३ ॥**

येथ मागे सकळ ऋषिही देवऋषि तो नारदुही असित देवल बादरायण स्वरुप ते तूझे. ॥ सांगता तै कोनडे[1] आता तुम्हीही सांगता तुझिया कृपेने सकळ मज प्रतितीस आले जी ! ॥ १३ ॥

---

1 कठीण.

**सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव।**
**नहि ते भगवन् व्यक्तिं विदुर्देवा न दानवाः ॥ १४ ॥**

साच ते प्रतितीसी आले, जे नरा सुर दानवाचा युक्तीने तूं नाकळसी, मज मानले आता. ॥ जेंवि हाती रत्न येता नेणवे आंधार रवि उदयचि, साच तसी तुझी करुणा गमे मजला. ॥ १४ ॥

**स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम।**
**भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते ॥ १५ ॥**

आपुली थोरीव अपणची जाणसी हे नेणुनियावांयाचि या प्रज्ञाबळे वेद शिणताती ॥ भूतभावन ! भूतनाथा ! देव देव जगत्पते ! तुज येतुल्याते केंवि जाणू हेचि मज अर्त्त[२] ॥ १५ ॥

**वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः ॥**
**याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि ॥ १६ ॥**

गुरु असाति सर्वत्र परि कृष्ण अम्हाला तूंचि गति हे जी असे आता विभूती आपुल्या असती ॥ पै तिही हे सकळ लोका व्यापुनि आहेसी त्या त्या ब्रह्मरूप विभूति दिव्य प्रगट करुनि दावी. ॥ १६ ॥

**कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिंतयन्।**
**केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया ॥ १७ ॥**

येथ जाणावे कसे तुज काये ह्मणुनि चिंतिजे म्या भाव जे जे कथियले मग तुंवा मजलागी ॥ जेथ तुते चिंतिता मज न पडती आयास, अपुल्या त्या विभूति विवंचुनी मज दे दयासींधु ! ॥ १७ ॥

**विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन।**
**भूयः कथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम् ॥ १८ ॥**

येथ जाणावे कसे तुज काय म्हणुनी चिंतिजे म्या भाव जे कां कथियले आपुल्या जो योग ॥ अणिकही भूताप्रति विभूति अपुल्या सांगिजे,

---

१ वश होत नाहींस. २ दुःख.

आह्मासी घडी घडी विवरणे वा! तेचि ते काये बोलिजे? तरी जेंवि अमृत प्रासिता न पुरे म्हणे त्वद्वचन पियुषसेविता नोहेचि मज तृप्ती! ॥ १८ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

**हंत ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतयः ।**
**प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यंतो विस्तरस्य मे ॥ १९ ॥**

तव कृपाघन कृष्ण बोले, गर्जला सप्रेम, ऐके अर्जुना! ज्या मुख्य मुख्या विभूति ते माझ्या ॥ जाणितल्या, ज्या सकळ हे विश्व जाणवलेचि होये, जसे मुष्टितचि बीज येता तरूचि आकळिजे. ॥ १९ ॥

**अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ॥**
**अहमादिश्च मध्यं च भूतानामंत एव च ॥ २० ॥**

सावधान विसावया अवधारि पार्था! एकएका भूतमात्री अंतरात्मा मीच मी एकू ॥ मीच अंतःकर्ण, भूताबाहेरि मी, गवसणि मी, आदि-मध्य अंत सकळा प्राणियाचा मी. ॥ २० ॥

**आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान् ।**
**मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी ॥ ५१ ॥**

विष्णु मी आदित्यसमुदायांत अणिया ज्योतिर्मंतामाजी तो मी सूर्य रस्मीवंतु मी जाण. ॥ मी मरीचि मरूद्गणात तसाच हा आकाश गर्भी चंद्रतारामाजिनायक अर्जुनाते मी. ॥ २१ ॥

**वेदानां सामवेदोऽस्मि देवानामस्मि वासवः ॥**
**इंद्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना ॥ २२ ॥**

जाण वेदामाजि नायक सामवेदू, हरि ह्मणे, मी सकळ देवामाजि राजा इंद्र तोहि मी ॥ इंद्रियामाझारि अकरावे विराजित मनचि मी सकळ भूता चेष्ठवी ते चेतना मी गा! ॥ २२ ॥

**रुद्राणां शंकरश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम् ॥**
**वसूनां पावकश्चास्मि मेरुः शिखरिणामहम् ॥ २३ ॥**

रुद्र समुदायांत शंकर यक्षरक्षगणांत जो शशी मौळिचा वित्तेषमैत्र

कुबेर तो मी गा ॥ अष्टहीवसुमाजि तो मी पावक शिखरातिला सर्वा-
उपरि जो मेरू पर्वतराज तो मी जाण ॥ २३ ॥

**पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम् ॥**
**सेनानीनामहं स्कंदः सरसामस्मि सागरः ॥ २४ ॥**

श्रेष्ठ सकळ पुरोहितात बृहस्पती तो मी, तसाची त्रिभुवनीचा सैन्य-
प्रति तो स्कंद मी जाण. ॥ पृथ्वीमाजि सरोवरांत प्रसिद्ध सागरवर्य तो
मी, जो धरेते मेखळारुपे अलंकरितु ॥ २४ ॥

**महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम् ॥**
**यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः ॥ २५ ॥**

महर्षीमाझारि भृगु मी सकळ वाचामाजि नाटयरूपे विराजित सत्य
केवळ तेचि अक्षर मी ॥ सर्व यज्ञामाजि तो जपयज्ञ तो कर्मादि अंती
निपजत. स्थावरात हिमालये तो मी. ॥ २५ ॥

**अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः ॥**
**गंधर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः ॥ २६ ॥**

कल्पतरू अणि पारिजात तसाचि चंदन गुण विशिष्ट तथापि वृक्षा-
माजि तो अश्वत्थ मी जाण. ॥ देवऋषिमाझारि नारद चित्ररथ गंधर्व-
मेळामाजि कपिला महमुनि मी सकळ सिद्धामाजी ॥ २६ ॥

**उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम् ॥**
**ऐरावतं गजेन्द्राणां नराणां च नराधिपम् ॥ २७ ॥**

मग म्हणे वैकुंठिचा वेल्हाळे सकळतुरंगमाते सुधनिधीचा ज-
न्मला उच्चैश्रवा तो मी ॥ राजभूषण कुंजरू ऐरावतु मी या नरामाझारि
विभुतिचा विशेष प्रसिद्ध राजा मी. ॥ २७ ॥

**आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक् ॥**
**प्रजनश्चास्मि कंदर्पः सर्पाणामस्मि वासुकिः ॥ २८ ॥**

---

१ सुंदर.

या हत्यारामाजि वज्रायुधावरिष्ठ ह्मणोनि ते मी, धेनुमध्यें कामधेनु मी, म्हणे जगदीशु ॥ जन्मवित्यामाजि मदन, सकळ सर्पामाजि वासुकी थोर तो मी, जाण पार्था विभूति ते माझा. ॥ २८ ॥

**अनंतश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम् ॥**
**पितॄणामर्यमा चास्मि यमः संयमतामहम् ॥ २९ ॥**

जाण नागामाजि थोर अनंत मी, या जलप्रसादाचा नृप वरिष्ट विभूति तो गा वरुण मी आहे. ॥ पितृगणवर अर्यमा शुभ अशुभ नियमी त्यांत यम तो मी, असे जो सर्वसाक्षी म्हणुनि मी धर्मु. ॥ २९ ॥

**प्रल्हादश्चास्मि दैत्यानां कालः कलयतामहम् ॥**
**मृगाणां च मृगेंद्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम् ॥ ३० ॥**

दैत्यराजकुळांत जो प्रल्हाद मी, आकळ तयामाझारि वर तो काळ मी, गोपाळ तो वदला. ॥ श्वापदांतही सिंव्ह मी या पक्षिजातिमाजी मुख्य बहुत पढियंता[1] गरुढ मी जाण महाबाहो ॥ ३० ॥

**पवनः पवतामस्मि रामः शस्त्रभृतामहम् ॥**
**झषाणां मकरश्चास्मि स्रोतसामस्मि जान्हवी ॥ ३१ ॥**

वेग गतिवंतात पवनु मीच जाण म्हणे जनार्दन. शस्त्र अस्त्र धरात दशरथपुत्र तो मी राम॥ जळचरामाझारि मकरु मूर्तिमंतची, समस्ता वोघराशीमाजि केवळ जान्हवी तो मी. ॥ ३१ ॥

**सर्गाणामादिरंतश्च मध्यं चैवाहमर्जुन ॥**
**अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ॥ ३२ ॥**

एक एक किती म्हणुनी सांगो तुला, अगणीत या सृष्टिसी ! अदि मध्य अंती वोविलासे मी. ॥ त्या मला जाणावया विद्या ते अध्यात्मविद्या सकळ शास्त्रासंमतू तो वाद मी जाणे. ॥ ३२ ॥

---

१ आवडता.

**अक्षराणामकारोऽस्मि द्वंद्वः सामासिकस्य च ॥**
**अहमेवाक्षयः कालो धाताऽहं विश्वतोमुखः ॥ ३३ ॥**

अक्षरामाझारि तो अचि मि श्रुति आहे. अकारो वैहि सर्वा. प्राक्समासा माजि हे द्वंद्व. ॥ सर्वग्रासक काळ मी अक्षय. जगाचा जनक धाता मी. म्हणोनि धनंजया परि दावितो विभुति ॥ ३३ ॥

**मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम् ॥**
**कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा ॥ ३४ ॥**

सृजलियाते मीच धरि तो. जिवन मी सकळा जिवाचा. सर्व शेखी संहरितो मृत्यु तोही मी ॥ श्रीगणांमध्यें[1] विभूति सात तुज सांगेन कीर्ति-श्रुति वाक्य ती धैर्य क्षमा तो मी. ॥ ३४ ॥

**बृहत्साम तथा साम्नां गायत्री छंदसामहम् ॥**
**मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः ॥ ३५ ॥**

सकळ सामातची ब्रह्मत्सामाख्य ते माझे स्वरूप. तसेंचि छंदामाजि ते मी मुख्य गायत्री ॥ येनें मास आंत तो मी मार्गशीर्ष माजि विभुती. सहा ऋतुमाझारि मुख्य वसंत तो मी जाण. ॥ ३५ ॥

**द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ॥**
**जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम् ॥ ३६ ॥**

खेळणी स्थळ त्यांत मुख्य द्यूत मी ते जाण. सकळा मित्रभाव्यं[2]वसाय वृंदामाजि आकळ भू ॥ तेंवि तो व्यवसाव मी विजय स्वरूप विभूति-माजी. सत्व मी निजसत्वतामाजी, हरि बोले. ॥ ३६ ॥

**वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पांडवानां धनंजयः ॥**
**मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः ॥ ३७ ॥**

यादवामाझारि मी श्रीवासुदेव, तसाचि तूं या पांडवांत विभूति माझी, सत्य हे पार्था ! ॥ मुनिवराते व्यासदेवो मीच जाण. धनंजया कविराज-

---

१ स्त्रीगणामध्यें. २ ? ३ ?

यामाझारि भार्गव तोचि मी जाण ॥ ३७ ॥

**दंडो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् ॥**
**मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ॥ ३८ ॥**

पिपलिकादि ब्रह्मवरी मी त्यांत तो मी दंड आहे. धर्म जे तो माजि केवळ नीति मी पाही. ॥ सकलगुह्यामाजि ते मी मौन गा! या ज्ञान तत्वाज्ञान संवित्पर विभूति जाण ते माझी. ॥ ३८ ॥

**यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन ॥**
**न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ॥ ३९ ॥**

हे अता हे सांगता पारूचि न कळे! माझिया मजसरि तुळाया पांच सात विभूति सांगितल्या. ॥ भूतमात्रा बीज ते मी, म्हणुनि मजविण पहाता चर अचर सृष्टीमाजि उरले एकहि नाही ! ॥ ३९ ॥

**नांतोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप ॥**
**एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ॥ ४० ॥**

जेंवि पर्जन्याचिया धाराचि, कीं पृथ्विचियाही तृणांकुराचा, लेख करिता कधिंहि न पुरेचि ॥ तेंवि या माझ्या विभूतीसी पार नाहींच जाण! हे उपदेशमात्रें[1] कथियलो विस्तारूं हा हाच ॥ ४० ॥

**यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ॥**
**तत्तदेवावगच्छ त्वं ममतेजोंऽशसंभवम् ॥ ४१ ॥**

सर्वसाधारण तुला संक्षेप सांगू खूण. जे श्रीमंत अणि बळवंत करुणावंत जे चिन्ह ॥ जाण ते ते मीच. तेव्हां अंश कवणाचा कवण, मी होवूनि पाहाता, तया जगी मीचसे भासे. ॥ ४१ ॥

**अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन ।**
**विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥ ४२ ॥**

---

१ दिशा कळावयासाठींच केवळ.

वेगळालीही किती तूं ऐकिसी,किती म्हणुनि म्याही सांगणें, मथितार्थ इतुका जाण तू आता. ।। सकळ जग येक्याचि अंशे व्यापुनिया मीच आहे. म्हणुनि टाकुनि भेद समसाम्येच भज पार्था ! ॥ ४२ ॥

सकल हे जग हरिमयेची जाणूनि, अर्जुन बोलत पुढति ही तेचि, स्वरूप विश्वाकार ते पहाया ॥ धरूनि ईच्छा करिल प्रश्न अपूर्व गोड कथा पुढे श्रीनाथकरूणाभारती शिवराम मुखि गर्जे ।। ४३ ॥

हरिहिः ॐ तत्सदिति श्रीमन्महाभारते शतसहस्रसंहितायां वैयाशिक्यां भीष्मपर्वणी श्रीमद्भगवद्गीतासुपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे विभूतिविस्तारयोगो नाम दशमोध्यायः ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ १० ।।

**॥ श्रीलंबोदराय नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीदत्तात्रयायेनमः ॥**

यापरी एकादशी आहे कथा दोरहंसि[1]. जे भेट होईल पार्थ विश्वरूपेमसी आता ।। उत्कटैश्वर्य स्वरूप पहावया ईच्छीत अर्जुन आता काय विज्ञापील ? ते अवधारिजे संती. ।। १ ॥

**॥ अर्जुन उवाच ॥**

**मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम् ।**
**यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम ॥ १ ॥**

मग मनी अर्जुन म्हणे, "मी काय या सनकादिकाहुनी आगळा," मी जे पुसे ते सांगति हरि काये ? ॥ ऐकुनी संदेह हा, मग विनावितो " स्वामी कृपेस्तव जे मला कथिले तयाते जहालो निर्मोहा ॥ १ ॥

**भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया ।**
**त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्ययम् ॥ २ ॥**

---

१ दो ( न ) रसी. ' दोरहसि ' हस्तदोष दिसतो.

प्राणियाची उपजणे म्हणे[1] प्रकृतिपुरुषविवंचनेसी सांगुनि मज आपुले विश्रांति सुख दील्हे ।। आणि तुजपासाव निसिमे ऐकिले महिमान तूझे, अणीक राजिवलोचना ! तुज काहि पुसो म्हणतो ! ।। २ ।।

**एवमेतद्यथात्थत्वमात्मानं परमेश्वर ।**
**द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम ॥ ३ ॥**

म्हणसि जे संकल्पमात्रे भासलोकपरंपरा, जेथुनि द्विचतुर्भज सुवेष निघनिघो येती,।। ते तुझे जे विश्वरूप सुरा दुर्गम, अपार तेचि पहावया उतावळी चित्त हे माझे ।। ३ ।।

**मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो ।**
**योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम् ॥ ४ ॥**

ते तुझे निजविश्वरूप पहावया मज योग्यता हे असेल नसेल आपुले जाणसी तूची ।। पहावेल जरि तरीच महास्वरूप ते आपुले योगेश्वरा ! मज दावि अपुल्या अव्ययस्वरुप[3] ।। ४ ।।

**॥ श्रीभगवानुवाच ।।**

**पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः ।**
**नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ॥ ५ ॥**

जेथ उल्हासोनि श्रीहरि बोलिला, पार्था मदंगी पाहे ! म्हणुनि दाविलें विश्वरुपाते ॥ शतसहस्त्र रूप नगणविति बहुविधे बहुवर्ण नाना ॥ विधिविकार अनंत त्या ब्रह्मांड विस्फुरली ॥ ५ ॥

**पश्यादित्यान्वसून्रुद्रानश्विनौ मरुतस्तथा ।**
**बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत ॥ ६ ॥**

पाहे हे आदित्य वसु अणि रुद्र कोटी देव अश्विनी मरूत संख्या नाहि कोटी कोटिही गणिता ॥ जी कधी अवलोकिली नसतीच अश्चिर्ये भया संतोपकारक रूप मदंगी भारता पाहे ! ॥ ६ ।।

---

१ मरणें ? २ अपार. ३ अव्यय स्वरूपा. द्वितीया पाहिजे.

**इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम् ।**
**मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥ ७ ॥**

ऐक ऐक्या रोममूळि पाहे कोटी मूर्तिंच्या हे जगचि सचराचर तृणाकुंर गिरिवरी जैसे ॥ अणिकही जे जे विलोकू म्हणसि तेही पाहे म्हणुनी धनंजयाप्रति कोंडुनि उज्ञु काय हरि बोले ॥ ७ ॥

**न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ।**
**दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥ ८ ॥**

जरि तुला सामर्थ्य न पुरे विश्वरूप पहावया, जे पां विलोकू सकसि ते देईन निजदृष्टी ॥ दाविजे तरि विश्वरूप तयाहुनी पूर्विच दीजे दिव्य दृष्टी म्हणुनि दूरुनि उजविलो पार्थ ॥ ८ ॥

**॥ संजय उवाच ॥**
**एवमुक्त्वा ततो राजन् महायोगेश्वरो हरिः ।**
**दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम् ॥ ९ ॥**

ऐक राया ! मग तया पार्थासी देऊनि अभय, हरि योगेश्वरू निज विश्वरूप दाविता जहाला ॥ दिव्य चक्षु प्रगटता अज्ञान दृष्टीचे पळों, मग सकळ अवतार उमटते तेथ ते देखे ॥ ९ ॥

**अनेकवक्त्रनयनमनेकाद्भुतदर्शनम् ।**
**अनेकदिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम् ॥ १० ॥**

कांहि रमणी अणि भयासुर पाहे, पार्था अनेक वक्त्र नयनपंक्ति अपार पहाता विस्मयो वाटे ॥ दिव्य दिव्याभरणभूषित झळकती दिव्यास्त्र शस्त्र पार्थ जो जो पाहे तो तो अपरमित जहाला ! ॥ १० ॥

**दिव्यमाल्यांबरधरं दिव्यगंधानुलेपनम् ।**
**सर्वाश्चर्यमयं देवमनंतं विश्वतोमुखम् ॥ ११ ॥**

---

१ समर्थ केला. २ पळाले. "पळा" हस्तदोष. ३ प्रकट झालेले. ४ याचा कर्ता "कृष्ण" अध्याहृत आहे.

झळकताती दिव्य माळा विसृतं[1] वक्षस्थळी पीतांबर देखताचि जसे सुवर्णादिराशी ॥ कर्पुराचिये परि समस्तैश्वर्य करितो विश्ववदन अनंत देखियेला ॥ ११ ॥[2]

**दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता ।**
**यदि भाःसदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः ॥ १२ ॥**

प्रळयकाळीं जेवि गगनी द्वादशादित्येही पहा येक अवसर उठति अणि विद्युल्लता सकळा ॥ प्रळय दावाग्निचेनि कल्लोळ तन्हि मेळविजती तथापि त्या अंगप्रभेसी नयेचि ते उपमा ॥ १२ ॥

**तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा ।**
**अपश्यद्देवदेवस्य शरीरे पांडवस्तदा ॥ १३ ॥**

अणिकही त्या विश्वरूप जग सकळ एकीकडे बहुपरि विभागुनि तेथ रचल्या वेगळ्या रचना ॥ जेंवि मेरूवरि पहा परिमाणु नभी गंधर्वनगर, हरिशरीरी विश्व अवघे त्यापरी देखे ॥ १३ ॥

**ततः स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनंजयः ।**
**प्रणम्य शिरसा देवं कृतांजलिरभाषत ॥ १४ ॥**

मग परम पाऊनि विस्मय थकित जहाला पार्थ शरिरी पूर्णरोमहर्षही जहाला थरथरा कांपे ॥ उत्कटाच तदाचिये सप्रेम ऊर्मिबळ कृतांजली नमुनिया सांष्टांग अर्जुन काय मग बोले ॥ १४ ॥

**॥ अर्जुन उवाच ॥**

**पश्यामि देवांस्तव देव देहे सर्वांस्तथा भूतविशेषसंघान् ।**
**ब्रह्माणमीशं कमलासनस्थमृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान् ॥ १५ ॥**

नवल करूणा मजवरी केली दयाळा ! जे अधी प्राकृत देखो विश्वरूपे तुझे निजांगे जी! ॥ देवभूत विशेष पंक्ति अणिक पाहेजे विरंची पैल तो महदेव कस्यप प्रमुख ऋषि उरगा ॥ १५ ॥

---

१ विस्तृत. २ स्वामींनीं श्लोकांचा पदशः अर्थ दिला नाहीं.

**अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं पश्यामि त्वां सर्वतोऽनंतरूपम् ।**
**नांतं न मध्यं न पुनस्तवादिं पश्यामि विश्वेश्वर विश्वरूप ॥ १६ ॥**

याच दिव्य विलोचनीं पहाता अनेकचि बाहु, उदरे, वदनपंक्ति, अशि अनंत रूपे तुझी देखो ॥ प्रतिति येता सहस्रशीर्षापुरुष हे श्रुति पूर्ण. त्या तुज आदिमध्यहि अनंत दिसे पार विश्वेशा ! ॥ १६ ॥

**किरीटिनं गदिनं चक्रिणं च तेजोराशिं सर्वतो दीप्तिमंतम् ।**
**पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समंताद् दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम् ॥१७॥**

किरीट कुंडल कंकणें जे लेईलासि अपार करि तव देखतो कीं दिप्ती सर्व दिशा कशि कशि उजळीता ॥ चित्त हे निर्बूजले विस्मये तुज पहाता दैदिप्यमान रवि अनळ शतकूट हारपोहनि जाती ॥ १७ ॥

**त्वमक्षरं परमं वेदितव्यं त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।**
**त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता सनातनस्त्वं पुरुषो मतो मे ॥ १८ ॥**

औटमात्रातीत अक्षर तुजचि गिवसो पहातीया श्रुति सकळ विश्वाधार तूचि निधान देवेशा ! ॥ तू सनातन नाशरहित पुराण पुरुष स्वधर्मरक्षक तूचि तत्वातत्व ऐसे आज मज कळले. ॥ १८ ॥

**अनादिमध्यांतमनंतवीर्यमनंतबाहुं शशिसूर्यनेत्रम् ।**
**पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं स्वतेजसा विश्वमिदं तपंतम् ॥१९॥**

आदिमध्य अंत रहित अनंत दयाल व शषी सूर्य डोळां दावितोसि अनंतवीर्या कोपली तेणे ॥ पेटली प्रळयाग्नि तैसें वक्त्र देखतसो. तुझे त्या बहुविधा तनुदिप्तिते जग तपतसे गमते ॥ १९ ॥

**द्यावापृथिव्योरिदमंतरं हि व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः ।**
**दृष्ट्वाद्भुतं रूपमुग्रं तवेदं लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन् ॥ २० ॥**

व्यापिसि चतुर्दश लोकही पाताळ पृथ्वि अंतराळ दिशा सकळ येकूचि तूं कौतूक हे देखो ॥ परम अद्भुत रूप उग्र विलोकिता जग घाबरे होउनि विपाये वांचलोस गमत मज देवा ! ॥ २० ॥

**अमीहि त्वां सुरसंघा विशंति केचिद्भीताः प्रांजलयो गृणंति ।**
**स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसंघाः स्तुवंति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः**

या तुझ्या निज अंगतेजे कर्म बीजे जाळुनी तुजमाजि रिघति देव मानव भिउनी किती एक स्तवितातीं ॥ जोडुनिया हात अणिक महर्षिविद्याधरहि सिद्ध स्वस्ति म्हणुनि अपार तूते वाणिति स्तवनी ॥ २१ ॥

**रुद्रादित्या वसवो ये च साध्या विश्वेऽश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च ।**
**गंधर्वयक्षासुरसिद्धसंघा वीक्षंते त्वां विस्मिताश्चैव सर्वे ॥ २२ ॥**

रुद्र अणि आदित्य अष्टावसुचिये मेळे तसे ते पैल विश्वेदेव अश्विनि मरूते संघे ॥ पितरगण गंधर्व यक्षामरहि सिद्ध अपार तूते विस्मये देखोनि करिती जयजयकार ॥ २२ ॥

**रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं महाबाहो बहुबाहूरुपादम् ।**
**बहूदरं बहुदंष्ट्राकरालं दृष्ट्वा लोकाः प्रव्यथितास्तथाहम् ॥२३॥**

हे असे एकाचि परी विचित्रभ्यासुर तीं अनेकचि वक्त्रनेत्र पदे भुजा सायूध बहु उदरे ॥ दाटल्या दाढ़ास रुधिरा मातला नेणो प्रळयसा देखता त्रैलोक्य लोपे मीहि कांपिनलो ॥ २३ ॥

**नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णं व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रं ।**
**दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितांतरात्मा धृतिं न विंदामि शमं च विष्णो ॥**

गगन वा मस्तक पसरले वक्त्र दीप्त विशाळ ज्वाळा निघति नेत्रिहुनि मुखिहुनि बहुविधा वर्णी ॥ देखता मन बहुतही जाजावले काये थरथरा धैर्य न धरे उपशमेहि नाहीच गा विष्णो ॥ २४ ॥

**दंष्ट्राकरालानि च ते मुखानि दृष्ट्वैव कालानलसंनिभानि ।**
**दिशो न जाने न लभे च शर्म प्रसीद देवेश जगन्निवास ॥२५॥**

ज्याचिया दीप्तिसी राखोंडी करी त्रिजगा कराला मुखे ढानेणवे काळाग्नि खवळता कीं ॥ पहाता मज येथे कांही जहाला दिग्भ्रमितते सुखहारपे हे काय देवेन्निवास त्राहीं. ॥ २५ ॥

**अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः सर्वे सहैवावनिपालसंघैः ॥**
**भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ सहास्मदीयैरपि योधमुख्यैः ॥२६**

हे सकळ धृतराष्ट्र पुत्रै आपुल्या सैन्यासह भूपाळ सेनानाथसही तुझ्या मुखी रिघती ॥ भीष्म अणी द्रोण अमुचे दिग्गर्तीचे भूतग्रास बैसलासी अहा कसे हे विघ्न वोढवलें ॥ २६ ॥

**वक्त्राणि ते त्वरमणा विशंति दंष्ट्राकरालानि भयानकानि ॥**
**केचिद्विलग्ना दशनांतरेषु संदृश्यंते चूर्णितैरुत्तमांगैः ॥ २७ ॥**

साचले हें सैन्य वदनामाजि रिघते एक मोहरे परिशि झाले सह किरिटी होतिही पीठ ॥ पडति, जे दाढेंत जाउनि एकही, न सुटेचि ते कैसे कर्मरेख उत्तम गा देतसे रगडा ! ॥ २७ ॥

**यथा नदीनां बहवोंबुवेगाः समुद्रमेवाभिमुखा द्रवंति ॥**
**तथा तवामी नरलोकवीरा विशंति वक्त्राण्यभिविज्वलंति ॥२८॥**

जेंवि महानदि वोघ वेगळा किति सिंधूसि तैसे अवघेचिकडुनि-जग हे नर असुर वीर ॥ तूझिया वक्त्रांत खडतर अग्निचा ज्वाळांत जाउनि पडति सरले नेणवे आयुष्य भुवनाचे ॥ २८ ॥

**यथा प्रदीप्तं ज्वलनं पतंगा विशंति नाशाय समृद्धवेगाः ॥**
**तथैव नाशाय विशंति लोकास्तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः ॥**

जेंवि वडवानळ गिरी झांकावयां पडुनि पतंग येति तेथुनिया निघोनि. तसेचि हे लोक ॥ लागवेगे तुझिया वक्त्रि प्रवेशुनि निमति कैसे तप्त-लोह गिळी जसी जळबिंदुचि राशी ॥ २९ ॥

**लेलिह्यसे ग्रसमानः समंताल्लोकान्समग्रान्वदनैर्ज्वलद्भिः ॥**
**तेजोभिरापूर्य जगत्समग्रं भासस्तवोग्राः प्रतपंति विष्णो ॥ ३० ॥**

भडभडा जळ त्या मुखी जाज्वल्यमानजि भासति ही त्रैलोक्य सकळ हि चाठिशि रगडा करिसी दाढा ॥ आपुल्या तेजेचि जग हे व्यापुनी तुझें प्रकाश बहु उग्र भवते तपति ते दिसताती जय विष्णो ॥ ३० ॥

**आख्याहि मे को भवानुग्ररूपो नमोऽस्तु ते देववर प्रसीद ॥**
**विज्ञातुमिच्छामि भवंतमाद्यं न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम् ३१**

कृष्णजी ! हे काय न कळे अंतरात्मा तूं जगाचा,कां अम्हाला अंतक असा सांग वोढावलासी ? ॥ सांग तूझें स्वरुप ऐसे कवण कार्य प्रवर्तलासी नेणवे. प्रसन्न म्हणुनि विनविले आम्हीं ॥ ३१ ॥

**श्रीभगवानुवाच**

**कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो लोकान् समाहर्तुमिह प्रवृत्तः ॥**
**ऋतेऽपि त्वां न भविष्यंति सर्वे येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः**

मग म्हणे श्रीदेव पार्था ऐक पुसिले सर्व जे, तरी काळ मी जग संव्हराया वाढलो वक्त्री ॥ परि अणिक येथे असे जे तुजाविण करूनि सर्वही या प्रथम सेनाधिपाचा घोट मज भरणे ॥ ३२ ॥

**तस्मात्वमुत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून्भुंक्ष्व राज्यं समृद्धम्॥**
**मयैवैते निहताः पूर्वमेव निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥ ३३ ॥**

मोडिता हे सैन्य वेळु कदापि नलगे.म्हणुनिया उठउठि शहाणा होई! येश घे रिपुजयेचे तूं. ॥ रोकडे हे राजे जे हे म्या मारिले पूर्विच अहाती. तूं यशासि निमित्त मात्रचि अर्जुना होये ॥ ३३ ॥

**द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च कर्णं तथान्यानपि योधवीरान् ॥**
**मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा युद्ध्यस्व जेतासि रणे सपत्नान्**

द्रोण भीष्मा पाडुन करी कर्ण कैसा झुंज न म्हणे जयद्रथाचे भय न धरी अणिकही जे जे ॥ म्याचि यांहचे[1] शोषिले आयुष्य ऐसें जाणुनि तूं वूठ याते जिंकिता शिवधनु शरधारी ॥ ३४ ॥

**संजय उवाच**

**एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य कृतांजलिर्वेपमानः किरीटी ॥**
**नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं सगद्गदं भीतभीतः प्रणम्य ॥३५॥**

---

१ यांचे.

ऐक राया ! कृष्णमुखींचें वचन ऐकुनी पार्थ जोडुनी हात हरीशी वेळो वेळा करीं नमस्कारू ॥ थरथरा कंपायमान तसाच गद्गद भेणे भेणे हरीचरणी न्याहळीत कैसा काय मग बोले ॥ ३५ ॥

॥ अर्जुन उवाच ॥

**स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च ॥**
**रक्षांसि भीतानि दिशो द्रवंति सर्वे नमस्यंति च सिद्धसंघाः ॥**

स्थितिसमय हा नाशयाग्नि गमे म्हणुनी हरि सैन्य आंतु दाविल्या देखोनि अर्जुन काय विनवितू ॥ कृष्णजी ! हा कीर्तने जग हरिखते, अनुराग धरि ते दुष्ट ते. भेवोनि पळती. सिद्ध तुज नमिती. ॥ ३६ ॥

**कस्माच्च ते न नमेरन्महात्मन् गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे ॥**
**अनंत देवेश जगन्निवास त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ॥ ३७ ॥**

पहाता तूं आदिकर्त्ता ब्रह्मयाचा बाप तू कीं ।। कां पदी न लगति ? हे दुर्जन पळो पहाति ? ॥ स्वप्रकाश अनंत अक्षर तूंचि संत असंत त्याहुनि वेगळा निःशीम महिमा त्राहि ! बा त्राही ! ॥ ३७ ॥

**त्वमादिदेवः पुरुषः पुराणस्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।।**
**वेत्तासि वेद्यं च परं च धाम त्वया ततं विश्वमनंतरूप ।। ३८ ॥**

प्रकृति पुरुषा आदि तूं पूर्विल्या विश्वास जीवन भूतभव्य ज्ञान आहे तूझिया ठायीं ॥ भुवन अयनायतन तूं. म्हणुनि तूंचि अनंतरूपा कवण तुज जाणे ? जसा तैशासि तूज नमो ! ॥ ३८ ॥

**वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशांकः प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ॥**
**नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते॥३९॥**

वायु तूं यम तूं नियमता अग्नि तू तो वरूणही तूं चंद्र अणी सृष्टि स्रष्टीया पितामह ते ।। अणिकही जे रूप जे जे नाहि आहेसे तयापुढे तुज पुढत पुढति ॐनमोस्तु नमोस्तु तुज देवा ! ॥ ३९ ॥

**नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ॥**
**अनंतवीर्यामितविक्रमस्त्वं सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥४०॥**

पुढत पुढति पुढत शतसहस्त्रवरि करि पार्थ नमन. मागतुं म्हणत हरि तुज सन्मुखासी नमो. ॥ पाटिसी,सर्वाकडे तूं सर्व. तुज नमो अनंता अद्भुत पराक्रम व्यापका सर्वत्र सर्वाते ॥ ४० ॥

**सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण हे यादव हे सखेति ॥**
**अजानता महिमानं तवेदं मया प्रमादात्प्रणयेन वापि ॥ ४१ ॥**

कृष्णजी संमध धर्मी रहटता तुजसि सखा कृष्णा तुंते रे रे म्हणुनी बोभाइलासे. मी हे असाधारण तुझे महिमान नेणुनिया प्रमादसंगपूर्ण गात्राविलास हृदयस्थ तुज नेणो. ॥ ४१ ॥

**यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि विहारशय्यासनभोजनेषु ॥**
**एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ॥ ४२ ॥**

तुजसी आम्हीं करु रुळ्यासमंध्य सोयरीकेमिसे शय्यासनि अणि भोजनी लोंबि करु झोंबी ॥ जाण ऐसे बहुत अपराध भुवनि न समावती तैसे ही क्षमा करा ! अता हे धरियले पाये. ॥ ४२ ॥

**पितासि लोकस्य चराचरस्य त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ॥**
**नत्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभावः ।**

सकळ चर अचरादि लोका बाप तूं हरिहरप्रमुख अमरासि दैवत वेद पढवी मुख्य तूंचि गुरू ॥ तुज असा दुसरा न देखो म्हणुनी तूं अप्रतिम धाम त्रिभुवनी पहाता अहासी तुजसारिखा तूंची ॥ ४३ ॥

**तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ॥**
**पितेव पुत्रस्य सखेव सख्युः प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ४४**

सकळ विश्वा सोयरा तूं कवण धरु सोयरीक तुजसी सर्व अपराधाहुनि मज काढ विनवीतो ॥ जेंवि बाळ पित्यासि बोले, मित्र तो पढियेसी, कांता सलगीनें स्वपतिशी, ते म्यां विनविले तुमते ॥ ४४ ॥

**अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा भयेन च प्रव्यथितं मनो मे ॥**
**तदेव मे दर्शय देव रूपं प्रसीद देवेश जगन्निवास ॥ ४५ ॥**

जे श्रुतिसी अगम्य, जे ब्रह्मादिकही न पावती, तया तुज देखता आनंदलो, मनी भीतो ! ।। पण असे इतुकेचि जे म्या बोलिले कवळीन तुज ते रूप चतुर्भुज आवडे मज तेचि दावांवे ।। ४५ ।।

**किरीटिनं गदिनं चक्रहस्तमिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ॥**
**तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥ ४६ ॥**

किरीट कुंडल कंकणी त्या झळकति च्यान्हिभुजा शंखादि अयुधे चौभुजी ते रूप मज पहांवे ।। हेचि इच्छा बहु असे जे, विश्वमूर्ति सहस्रबाहो ! जे आम्ही माघत असो ते होऊनि प्रगटावे ॥ ४६ ॥

**॥ श्रीभगवानुवाच ॥**

**मया प्रसन्नेन तवार्जुनेदं रूपं परं दर्शितमात्मयोगात् ॥**
**तेजोमयं विश्वमनंतमाद्यं यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम् ॥ ४७ ॥**

विनवणी ऐकूनि त्याची बोलिला हरि " विश्वरूप अगा तुला जे दाविले रूप आत्मयोगाचे ॥ तुजचि चाड निजगुज प्रसन्न होउनि प्रकटिले हे तुजविन्हा तेजोमया मज कवण देखेल ? ॥ ४७ ॥

**न वेद यज्ञाध्ययनैर्न दानैर्न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः ॥**
**एवंरूपः शक्य अहं नृलोके द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर ॥ ४८ ॥**

वेदयज्ञध्ययनही अभ्यासिता हे नाकळे अणि शास्त्रिया दाने श्रमे बहु उग्र तप करिता ।। हे कदापि न संभवे तुजवेगळा कोणी समर्थ नव्हेचि हे भक्तीविन्हा अप्राप्त कुरूवीरा ।। ४८ ॥

**मा ते व्यथा मा च विमूढभावो दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदम्॥**
**व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं तदेव मे रूपमिदं प्रपश्य ॥४९॥**

देखुनि मद्रूप ऐसे गजबजशिल झणी न पवतूं मूढभावहि घोररूपी भय धरुचि नको ॥ बहुबरे संतोषरूपे सौम्य पुरविल रूप माझे तेचि पाहे म्हणुनि हरीने स्वरूप दावियले ॥ ४९ ॥

---

१ मागत. २ मान देऊन.

**॥ संजय उवाच ॥**

**इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा स्वकं रूपं दर्शयामास भूयः ॥**
**आश्वासयामास च भीतमेनं भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा ॥**

ऐक राया अर्जुनाप्रति बोलुनी हरि ते क्षणी तेचि अपणातचि अपुले अकर्षिले स्वरुपा ॥ होउनी देवो चतुर्भुज. अर्जुनाचे भय निवारूनी उठविला तो जेंवि स्वप्नी भ्रमित जागरता ॥ ५० ॥

**॥ अर्जुन उवाच ॥**

**दृष्ट्वेदं मानुषं रूपं तव सौम्यं जनार्दन ॥**
**इदानीमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः ॥ ५१ ॥**

देखुनि पूर्विल सुंदर रूप सौम्य चतुर्भुजाकृती मग म्हणे तो पार्थ आता देखतो हरि तूज ॥ बहुत सुखिया जहाला, चित्त बहु जहाले प्रसन्न, अपार तो आनंद हा मी काय वाखाणू ? ॥ ५१ ॥

**॥ श्रीभगवानुवाच ॥**

**सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम ॥**
**देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकांक्षिणः ॥ ५२ ॥**

मग म्हणे अर्जुना हे दाविले उघडे स्वरुप हे पहावया सुर शंकरादिक इच्छिती याते ॥ योगि यजन अष्टांगयोगा करुनि पाहो म्हणति तरि हे अप्राप्य सर्वोत्कृष्ट माझे स्वरूप हे जाण ! ॥ ५२ ॥

**नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया ॥**
**शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा ॥ ५३ ॥**

वेद तप आराधनी यज्ञादिकी यजना बहुविध पूर्ण विश्वाधार मी या साधनासि नये ॥ हे जसे कांही तुंवा सुखाड सुखही भोगिले येरासी हे दुर्लभचि जाण न सापडे कवणा ॥ ५३ ॥

**भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ॥**
**ज्ञातुं द्रष्टुं च तत्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥ ५४ ॥**

जेंवि जळ संपाति घेउनिया नदी सिंधूसी मिळती मिळतसे. तैसेचि जे जोडूनि मज गाती ॥ भजति जरी हे तरीच माझें सर्वगत स्वरूपासि पावती जाणति देखति प्रवेशती मजमाजी ते ॥ ५४ ॥

**मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः संगवर्जितः ॥**
**निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव ॥ ५५ ॥**

सकळ करिता कर्मफळ मी ज्यासि मी वांचूनि दुसरा नाहीं त्याला संगवार्ता कोठुनि येई गा.॥ भूत अणि भगवंत भाषाचि विसरुनि मीच जहाला येरे ग्रासुनि सर्वभूति मजचि तो पाहे ॥ ५५ ॥

विश्व अवघे अपणचि होऊनि दाउनि विश्वरूप उजु स्वये निजरूप त्याप्रति दाविले देवे ॥ यापुढे दोनी स्वरूपनिर्धार अर्जुन तो पुसेल पुढिल निरूपण गोड ते शिवराम विस्तारी ॥ ५६ ॥

॥ हरिहिः ॐ तत्सदिति श्रीमन्महाभारते शतसहस्रसंहितायां वैयाशिक्यां भीष्म पर्वणि श्रीमद्भगवद्गीतासुपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे विश्वरूपसंदर्शनयोगोनाम एकादशोध्याय ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

**श्रीविघ्नहराय नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीदत्तात्रयाय नमः ॥**

विश्वरूपी व्यक्त सगुणी भजनयोगे पाविजे अणि पूर्ण विश्वातीत अगुण व्यक्त सद्भजना ॥ दोनि वाटा पावमों तुज त्यांत मुख्य विवंचिजे म्हणवूनि पार्थ करील प्रश्न नृपोत्तमा, परिसे ! ॥ १ ॥

**॥ अर्जुन उवाच ॥**

**एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ॥**
**ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगमित्तमाः ॥ १ ॥**

---

१ मग.

मायबापा ! कृष्णजी ! तुज यापरी भजती स्वभक्त क्षणहि न विसंबिती जे प्राणेनशी तूते ॥ आणि प्रणवापैलीकडे वाचा मनोगोचर अगुण अव्यक्त तुज भजति याते श्रेष्ठ ते कवण ? ॥ १ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

**मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ॥**
**श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥ २ ॥**

सकळ ईंद्रियसहित मन मजमाजि वसुनि निशा दिवस न म्हणत सुख सप्रेम भावे भजति जे कांही ॥ जेंवि वर्शाकाळि सरिता हळुहळु दुणिजे तसे श्रद्धाळु होउनि तेच मी मानूनि निजयोगी ॥ २ ॥

**ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ॥**
**सर्वत्रगमचिंत्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥ ३ ॥**

येर तो अत्यंत सोहंभाव चढुनी झोंबती अक्षरपदासी, जयासि मन अणि बुद्धिही नपवे ॥ दाविता जे कां नये सर्वत्र सर्वपणे असे न ढळे चळेना नित्य जे घडमोडि होता ही ॥ ३ ॥

**संनियम्यैंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ॥**
**ते प्राप्नुवंति मामेव सर्वभूतहिते रताः ॥ ४ ॥**

आणि वैराग्याग्निमाजी विषयकुटजे जाळुनिया कोंडुनीया संयमी मग हृत्कपाटाते ॥ यापरी झोंबूनि सोहंभावहि जिंकोनि सर्व समानहि मति बहुति कही तोही मज पावे ॥ ४ ॥

**क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ॥**
**अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥**

पण तयाला योग कठिण करिति ना जे निरावलंबी रिघो पाहाताची बहुत विघ्न हे होती । क्लेशही होताति बहु देहाभिमानें क्रोधकामे द्वंद्व ठाकिती आडयास्तव दुःखदायक गा ॥ ५ ॥

---

१ यामध्यें.

**ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ॥**
**अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ॥ ६ ॥**

म्हणुनिया वेगळे जे स्वस्ववर्णानुसरणे कर्मेंद्रिय करिता स्वकर्मे अर्पून हे मजला ॥ मजविन्हा कायिक वाचिक मानसिक नेणतीच मजविना यापरि जे ध्याता मत्तर होउनी भजती ॥ ६ ॥

**तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ॥**
**भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥ ७ ॥**

ऐशिया भक्तासी मी या जन्ममर्ण भयार्णवाहुनी उद्धरु म्हणियेचि नलगे येथ कांहिही ! ॥ जै तयाचे फिरले मन मजकडे तेव्हांच याचा जहालों मी अंखिलो[1] वेळूचि मज न लगे ॥ ७ ॥

**मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ॥**
**निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥ ८ ॥**

म्हणहुनि मज माजि ते मन ठेवि बुद्धिही घालिजे मन बुद्धीचे वर करिसी माझ्या ठाई अवलंबू ॥ मग तुझे तूंपण उरे कोठूनि यास्तव करिसी ऐसे ॥ तरि निजांगे मीच होसी येथ संशयो कांही ? ॥ ८ ॥

**अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ॥**
**अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ॥ ९ ॥**

जरी अचूंबित मति मजमाजि ठेवो न सकसी तरि आठ प्रहरामाजि निमिषोनिमिष देतचि जाये ॥ निमिषही मज सेविता ते निमिष घटिका ते मुहूर्त असेचि अभ्यासे मला पावोनि मी होशी ॥ ९ ॥

**अभ्यासेऽप्यसमर्थोसि मत्कर्मपरमोऽभव ॥**
**मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यासि ॥ १० ॥**

तुं जरी सांगीतलिया सुलभेसि जे साधन समर्थ नव्हेसि तरि सोपा उपावो असे अणिक येक ॥ कर्म करिता ईंद्रिये काइक वाचिक

---

1 अंकित झालों.

मानसिक करिसी मदर्पण तूं जरी निजधाम पावसी तूं ॥ १० ॥

**अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ॥**
**सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ ११ ॥**

हेही तुज करिवेचिना तरी बुद्धि गर्भी ठेउनी मज सकळ कर्मफळे त्यजुनि निष्काम तू होई ॥ जेंवि पिकलीं निज फळे टाकीत वल्ली वृक्ष तैसे या फळे त्यागेचि मत्पद पावसी आता ॥ ११ ॥

**श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ॥**
**ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छांतिरनंतरम् ॥ १२ ॥**

याच अभ्यासा परिस हे ज्ञान थोर ज्ञान जे त्यापरिस पूर्ण ध्यान तैसे विशेष जाणावे ॥ निष्कळंक ध्याय मानस पश्यते श्रुति आश्रय याहून फळ त्यागून यास्तव शांति मग पावे ॥ १२ ॥

**अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ॥**
**निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥ १३ ॥**

नृप अनाथा जाण जैसा तेंवि भूतमात्र जयाला द्वेषमूळि नसे कृपाळु मैत्र भूताचा ॥ मी असे न म्हणेचि माझे हे कदा नेणेचि तो सुखदुःखादिकाचि सेच न करी तनुसि येत सता ॥ १३ ॥

**संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ॥**
**मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मे भक्तः स मे प्रियः ॥ १४ ॥**

पूर्ण लाभालाभ होता ज्याचिया हृदयासनी मन बुद्धि सोपाने चढूनि बैसला हेचि ॥ तोचि माझा भक्तियोगे युक्त तो दृढ निश्चये मज परम पढिये जाण जिविचा सव्यसाची तो ॥ १४ ॥

**यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।**
**हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥ १५ ॥**

लोकपीडा नेणिजे लोक जयाते पीडिता पीडाचि न मनी अंतरात्मा अपण सकळाचा ॥ सिंधु भीणे जळचरा जळचरे न भितिच सिंधुला

तैसाच हर्षामर्ष भय उद्वेग निर्मुक्त ॥ १५ ॥

**अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।**
**सर्वारंभपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ १६ ॥**

मोक्ष देता करिसि परि अनपेक्ष अंतर्बाह्य शुद्ध उदासिन संसार दुःख कदापि जो नेणे ॥ दक्ष कर्मी वर्तता अभिमानलेश न धरीचना तो ऐशासी माझे चित्त आसन करूनि मी घाली ॥ १६ ॥

**यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति ।**
**शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः ॥ १७ ॥**

ज्यापरी अधिकचि नसे तो जहाला आपणचि निजांगे म्हणुनि हर्ष द्वेष कांक्षा शोच या नाही ॥ रात्रि दिन रवि जेंवि नेणे तेंवि शुभ अशुभासी नेणत भजनशील अखंड त्यावरी तोचि मत्प्रिय गा ॥ १७ ॥

**समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।**
**शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः ॥ १८ ॥**

ज्याचिया ठाई विषमता मुळीच नाही तेथ वैरी मित्र कैचे मान अपमानासी जो नेणे ॥ तनुचि नाहीं शीत उष्णे केउती नसता मनाची सुखदुःख ते कवणासी मान विवर्जिला सांगे ॥ १८ ॥

**तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येनकेनचित् ।**
**अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥ १९ ॥**

निंद्य जे निंदेसी स्तवन श्लाघ्य जे ना साच लटिके टाकुनि मित भाष बोले, येऱ्हवी मौनी ॥ जेधवा जे मिळत तेणे तुष्ट जग हे घरचि अपुले करुनि खेळे भक्त जो मज परम पढियंता ॥ १९ ॥

**ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ।**
**श्रद्धाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥ २० ॥**

जो तुला सांगीतलो हे भक्तियोगरहस्य याचा थारला हृदई ययापरी

जे उपासति गा ॥ करूनिया श्रद्धादरेचि अनुष्ठिती ते भक्त केवळ मीच ते मजला तयाची फार उत्कंठा ॥ २० ॥

हा रहस्य सुभक्तियोगे कृपाळु कृष्ण निरोपिता तेणेंचि अर्जुन लाधला आनंदकूपिकेते ॥ यापुढे होईल करिता प्रश्न अद्भुत ते कथा अति गोड पूर्णानंद हा शिवराम विनवीतु ॥ २१ ॥ हरिहिः ॐतत्सदिति श्रीन्महाभारते शतसहस्त्र संहितायां वैयाशिक्यां भीष्मपर्वणि श्रीमद्भगवद्गीतासुपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगोनामद्वादशोध्यायः ॥ १२ ॥

**॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ श्रीजगदेवार्पणमस्तु ॥**

**श्रीगजकर्णाय नमः । श्रीजगदंबायनमः । श्रीरामप्र० ॥**

सकल संसाराहुनी भक्तासि तत्वज्ञान देऊनि तारु म्हणुनि बोलिला जो द्वादशाध्याई ॥ तेंचि तत्वज्ञान आता पूसता त्या अर्जुनाप्रती करि निरूपण साह्य लक्ष्मीनाथ देवेंद्र ॥ १ ॥

**॥ अर्जुन उवाच ॥**

**प्रकृतिं पुरुषं चैव क्षेत्रं क्षेत्रज्ञमेव च ॥**
**एतद्वेदितुमिच्छामि ज्ञानं ज्ञेयं च केशव ॥ १ ॥**

तेथ अर्जुन सादरे वंदूनि काय पुढे जे प्रकृति म्हाणिजे काय अणिक पुरुष तो कवणू ॥ क्षेत्र ते कवणासि म्हणिजे कवण तो क्षेत्रज्ञु कैसा कोणते अणि ज्ञान कैंसे ज्ञेय सांगावे ॥ १ ॥

**श्रीभगवानुवाच—**

**इदं शरीरं कौंतेय क्षेत्रमित्यभिधीयते ।**
**एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ॥ २ ॥**

मग म्हणे लक्ष्मीनिवास, परियसी गा अर्जुना, हे शरीर संसारभूमी, क्षेत्र म्हणती यासी ।। यासी बरवे जाणता क्षेत्रज्ञ ऐंसे नांव त्याला ठेविले आहे महंती हे विचारुनिया ।। २ ।।

**क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ।**
**क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥ ३ ॥**

म्हणसी तो कवणू असे ? परि सकळ क्षेत्रामाजिहि तो क्षेत्रज्ञ मीच धनुर्धरा तू जाण सद्भावे ॥ क्षेत्र अणि क्षेत्रज्ञ याचे जाणणे सविशुद्ध निरुते ज्ञान ते मानू अह्मी जेणे हरे भव हा ।। ३ ॥

**तत्क्षेत्रं यच्च यादृक्च यद्विकारि यतश्च यत् ॥**
**स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे शृणु ॥ ४ ॥**

क्षेत्र हे कां म्हणिजते, कैसे उपजते, कवण कवणीये विकारी वाहिजे, केवढे, कसे, केउते, । यासि जो जाणे, तयाचे प्रभावहि सांगेन· ते तू ऐक ते सांगेन निःसंशयहि वीरेशा ।। ४ ।।

**ऋषिभिर्बहुधा गीतं छंदोभिर्विविधैः पृथक् ॥**
**ब्रह्मसूत्र पदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः ॥ ५ ॥**

हे वशिष्टादिक ऋषी नानाप्रकारे बोलिजे वेदिये[1] तो वाचा तटस्थ लक्षणे कांही ।। अणिक " सत्यज्ञान मिति " हा " सदैव सौम्यदमितिकः प्राण्याच ऐंसे हे व आनंद येति " या युक्ती ।। ५ ।।

**महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेवच ॥**
**इंद्रियाणि दशैकं च पंच चेंद्रियगोचराः ।। ६ ।।**

क्षेत्र आधी ऐक बापा ! पंचभूत ययासी कारण अहंकारू तशी ते बुद्धि अणि मूळ प्रकृति तेही ॥ ईंद्रिये दाहा मने साहंकरण गोचर विषयपंचक यापरी चौविसतत्वगुण विकार ऐके ॥ ६ ।।

---

१ वेदांनीं.

**इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः ॥**
**एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥ ७ ॥**

विषय सेऊ स्फुर्ण इच्छा न मिळति जरी द्वेषु तोचि जयासी भजता कांही नाठवे तेचि सुख जाणे ।। हेचि न जोडे तेचि दुःखहि तनुचि हे संघात सत्ता चेतना धैर्य मिळोनि हे क्षेत्र सविकारी ।।७॥

**अमानित्वमदंभित्वमाहिंसा क्षांतिरार्जवम् ॥**
**आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥ ८ ॥**

ज्ञान आता परियसी बहु मान नलगे आपणा न प्रकटि सुकृत ते न बोले निजधर्म जो केला ॥ त्रिकरणी हे शम्री अंधु आवडे सकळासि गुरु सेवक शुचित्व सबाह्य स्थिरता फिरवणे मन हे ॥ ८ ॥

**इंद्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च ॥**
**जन्ममृत्यजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम् ॥ ९ ॥**

वमन न गमे कवण ही तेंविच ईहपरसुख विरक्ती सर्वधर्मी रहंटता मी आठवचि नाही जन्ममृत्युजरा व्यथा ! ॥ दुःखादि दोष विलोकुनी हे मागुति नाढळति अैसे करि उपायाते ॥ ९ ॥

**असक्तिरनभिष्वंगः पुत्रदार गृहादिषु ॥**
**नित्यंच समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ॥ १० ॥**

पुत्रदारग्रहादिकी अप्रिति त्याला दुःखसुख होताहि तादात्म नसे, नैश्वर म्हणोनिया ।। गोमटे अणि वोखटे येथ अनावड आवडींविण नित्य समता ज्या प्रियावरु आली अपणहुनी ।। १० ॥

**मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ॥**
**विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ ११ ॥**

आणि मी वाचूनि त्याला गोमटेचि नसेचि तेथ प्रसन्नता हे मन विसांवे देश जो पहाता ॥ जन जनपद आळविल्या तरि नयेच तया सहज

एकांत देशी वासु ज्याला नित्य आवडतू ।। ११ ।।

**अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्वज्ञानार्थ दर्शनम् ॥**
**एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥ १२ ॥**

परि तया ज्ञानास्तवचि निजरूप होय प्रगट तेथे देहबुद्दि तत्वार्थ ज्याचा खेळ तो हातीं ॥ वाचउक्त सुलक्षणी सवादयुक्त तेंचि ज्ञानमूर्ति ययासि जे प्रतिकूल ते अज्ञान जाणावे ॥ १२ ॥

**ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते ॥**
**अनादि मत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥ १३ ॥**

ज्ञेयतेया नाव जै ज्ञानेविना कवण्या उपाये न पविजेचि बरें विवरिता प्रीति मोक्षाची ।। नाहीं आदिचि:ज्यासी, ज्याहुनि थोर नाहि दुजे असे, तरी दिसत नाहीं नसे म्हणो तरी तेचि ते आहे ॥ १३ ॥

**सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ॥**
**सर्वतःश्रुति मल्लोके सर्व मावृत्य तिष्ठति ॥ १४ ॥**

सर्व सर्वपणे करी सर्वि समस्तपणेचि जाये सकळ देखे सर्वतो मुखी भोगितो सकळा ॥ सर्व ज्ञान शिरे सकळ ज्या सर्वव्यापुने जे असे जे “ विश्वतःश्चक्षुरिति ” म्हणुनि श्रुतिहि प्रतिपादी ।। १४ ।।

**सर्वेंद्रिय गुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितम् ॥**
**असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥ १५ ॥**

सर्व करण गुणास भासक यस्यभासर्वमदामिदामिति सकल करणातित येथे अपाणिपाद श्रुति ॥ जग सकळ धरी परि असक्त नोहे कोठेहि निर्गुणगुणाचे भोक्तेपणे अरोप मात्रचि जेथे ॥ १५ ॥

**बहिरंतश्च भूतानामचरं चरमेव च ॥**
**सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चांतिकेच तत् ॥ १६ ॥**

जे चराचर या भूतात अखंड आपण स्थिर अणिक चरक्षम[1] सूक्ष्म म्हणुनि नाकळेच कदा अनूरणियान् ॥ नेणता जरि दूरी जाणो वैसता ते आपणचि ते ज्ञेय तदरेतदातिके श्रुति हे सांगे ॥ १६ ॥

**अविभक्तंच भूतेषु विभक्तमिव च स्थितम् ॥**
**भूत भर्तृच तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च ॥ १७ ॥**

या उपाधि वसे पृथक् पृथगा परिच विभागिता ही तथापि अपुले एकपण मोडेचिना ज्याचे सृष्टिचे कारण धरी अणि पाळी संहारि गुणाऱ्या पूर्ण परतंत्रेचि आपण खोमणे[2] नाहीं ॥ १७ ॥

**ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते ॥**
**ज्ञानंज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य धिष्ठितम् ॥ १८ ॥**

या प्रकाशाचे प्रकाशक " एन सूर्य स्तविति " हे श्रुति रजतमाहुनि वेगळे तमसः परस्तात् ॥ ज्ञानवृत्ति जाणिजे म्हणूनि ज्ञेय ज्ञान मात्रचि ते जना हृदई वसे आत्मागुहायां ॥ १८ ॥

**इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः ॥**
**मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ॥ १९ ॥**

अर्जुना सादंत तुझे प्रश्न तुज सांगीतले,जे क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ कथिले ज्ञान ते,राया ! ॥ हे अगत्य जीवी धरुनि जे घालिति मद्भक्त जे संसारात असता मीच जहाले सांगणे नलगे ॥ १९ ॥

**प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि ॥**
**विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥ २० ॥**

ऐक आता प्रकृतिपुरुषविवेचना सांगेन. पुरूषु हा अनादि जसा तसीच अनादि ते प्रकृति ॥ जेवणी कणकणी काढे, तसीच अता दोंदुनी[3] बुद्धि गुणवैकारिके ही प्रकृतिचि जहाली ॥ २० ॥

---

१ हस्तदोष. २ कोमेजणें; म्लान होणें. ३ पुष्ट होऊन.

**कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ।**
**पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ॥ २१ ॥**

देह ईंद्रिय कर्तृता, येथ प्रकृति ते मुख्य कारण. येथिल सुखदुःखादि भोगी पुरूष कारण गा ! ॥ येथ सत्तासत्त कर्मे प्रकृतियोगे. दुःखसुखही तोचि भोक्ता पुरुष म्हणुनी सांख्य बोलति गा !॥ २१ ॥

**पुरुषः प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान्गुणान् ॥**
**कारणं गुणसंगोऽस्य सदसद्योनिजन्मसु ॥ २२ ॥**

तोचि तिते धरुनिया तादात्मतिसी न सांडिता तीपासुनी जे जहाले सुखदुःख ते भोगी ॥ येऱ्हवी आपण असंग सुखी स्वये सुखमात्रता वरि स्नेह करिता सत् असत् इनसी[1] तो पावे ॥ २२ ॥

**उपद्रष्टानुमंता च भर्ता भोक्ता महेश्वरः ॥**
**परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ॥ २३ ॥**

करण काया देखता, मनबुद्धिचाहि जाणता, साक्ष हीचे रूप कवळुनि गुण इति श्रुति हे ॥ आत्मसत्तेन धरिता तोचि असंगपणेचि भोक्ता देह असुनि अतित देहा परमपरमात्मा ॥ २३ ॥

**य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह ॥**
**सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते ॥ २४ ॥**

प्रकृति म्हणिजे देह,त्याहुनि वेगळा अदृश्य पुरुष, गुण कर्म अवघे प्रकृतिचे, हे जो बरा वळखे तो शरीरि वर्त्तता शरीरास मूळिच न देखे. मां[2] देह अंती जन्म मृत्युसि केंवि ये सांगे ! ॥ २४ ॥

**ध्यानेनात्मनि पश्यंति केचिदात्मानमात्मना ॥**
**अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ॥ २५ ॥**

परि प्रकृतिपुरूषविवेक प्रत्यगावृत्तिबळे[3] ध्यानेचि पहाति आपणा ते आपणामाजी ॥ येथ ते कितीएक सांख्ये विवरुनी पहातातीं.

---

१ योनि; जन्म. २ मग; असें असल्यावर. ३ अंतर्मुख होऊन.

अणिखे[1] कर्मयोगे चित्तशुद्धिनेची पहाताती. ॥ २५ ॥

**अन्ये त्वेवमजानंतः श्रुत्वान्येभ्य उपासते ॥**
**तेऽपि चातितरंत्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥ २६ ॥**

अन्य ते आणिखेहि नेणती सांख्यादिकाचे कडसणिसी[2], महंतापासूनि ऐकुनी भावे अत्मया भजती ॥ त्या वचनविश्वास ठेउनि ईश्वरा भजता तऱ्हि ते मृत्युरूपे भवार्णवा तरताती सुश्रवणें ॥ २६ ॥

**यावत्संजायते किंचित्सत्वं स्थावरजंगमम् ॥**
**क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ ॥ २७ ॥**

ऐक तूं फळितार्थ आता वस्तुमात्र चराचरे जे क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ योगे होत व्यवहारू ॥ जेंवि तेजा आणि उखैरा[3] भेट जहाल्या मृगजळाचे रूप होय तसेचि दोघापासुनि हा खेळू ॥ २७ ॥

**समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं परमेश्वरम् ॥**
**विनश्यत्स्वविनश्यंतं यः पश्यति स पश्यति ॥ २८ ॥**

सकळ भूताठाई या भूतात्मया समरूप वसने होत जात भूतजात महेष अविनाषु ॥ यापरी मज आपणा जो पहाता तो एक आत्मा डोळख्याचाॅ[4] डोळसू आत्माचि तो अमुचा ॥ २८ ॥

**समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ॥**
**न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ॥ २९ ॥**

सम्य सकळामाजि मी या समरूप भरलो हे असे मज पाहुनिया आप आपणा जहाला सुखिया ॥ आपणासि कदा न चोरी आत्मयाते देखणे गतिच्या गतीसी वरुनि खेळे ब्रह्म तो सदनी ॥ २९ ॥

**प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः ॥**
**यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ॥ ३० ॥**

---

१ दुसरें, साधक. २ मोडणी; रीति. ३ मुरबाड जमीन; माळ. ४ डोळसाचा. "ख्या" हस्तदोष.

अणि मनो मति प्रमुख कर्म अशेखाहि प्रकृतीच करिते. आपुल्या सत्तेन आपण तो अकर्त्ताचि ॥ रहटति वरची घरीं वर ते उगे! तैसेचि अपणा देखिले जेणे तयाचे पहाट फुटले गा ! ॥ ३० ॥

**यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति ॥**
**तत एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा ॥ ३१ ॥**

जेधवा हा भूतगोळा पृथक् पृथक् भाव तेथे प्रकृतीत पावे विलय तेथूनीच विस्तारू ॥ येथ होणे आणि जाणे प्रकृतिचेचि विवंचिता तेव्हा चि साक्षी ब्रह्म आंगे आपणाचि होये ॥ ३१ ॥

**अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः ॥**
**शरीरस्थोऽपि कौंतेय न करोति न लिप्यते ॥ ३२ ॥**

शरीरगुण याहूनि पूर्विल म्हणुनि देव अनादि आत्मा शरीर असताही तऱ्ही न करी न लिंपे तो. सूर्य उदकाहूनि पूर्विल काय त्या पाण्यांत बिंबू न शिंपिला तैसाचि तो तरी कांहि हे नेणे ॥ ३२ ॥

**यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते ॥**
**सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ॥ ३२ ॥**

हा अगा आकाश जैसे कोंदले सर्वा स्थळी. परि कासया नाही कदा गा देचिना कोठे ॥ तेंवि हा सर्वत्र सर्वा ठांयी पूर्णपणेचि असतां संगदोषे लिप्तो क्षेत्रज्ञ नोहे बा !॥ ३३ ॥

**यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः ॥**
**क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ॥ ३४ ॥**

अर्जुना गा हे असो. आकाशिचा रवि स्वप्रकाश भासवी पण नाव नावे वूठवि काये ? ॥ तेंवि सकळा क्षेत्रजाता एक तो क्षेत्रज्ञ सत्ता भासवि पण तेथिचा तो कांहि हो नेणे ॥ ३४ ॥

**क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमंतरं ज्ञानचक्षुषा ॥**
**भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यांति ते परम् ॥ ३५ ॥**

वंदुनी सद्गुरु कृपाजन दृष्टि सूनि क्षेत्र अणि क्षेत्रज्ञ दोघाचा निवाडा करिती सविवेके ॥ भूतप्रकृतिहूनि सुटका जाणति आसूनि जाणिवतेची परमपदीच करिती राज्य निजलाभे ॥ ३५ ॥

प्रकृतिपुरुषविवंचना करिता उभयहि हारपे सहजामृत प्राशूनि अर्जुन डोलतो कैसा ! ॥ मागुति सप्रेम पार्था थापटुनि करि निरूपण अति सुरस शिवराम गीताचंद्रिका प्रगटी ॥ ३६ ॥ हरिहिः ॐ तत्स-दिति श्रीमन्महाभारते शतसहस्रासंहितायां वैयाशिवयां भीष्मपर्वणि श्रीमद्भगवद्गीतासुपनित्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगोनाम त्रयोदशोध्यायः ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

॥ श्रीविकटाय नमः ॥ श्रीलक्ष्मीनृसिंव्हंभजेत् ॥ श्रीगुरू मागिला-ध्यायांत क्षेत्रक्षेत्रवंतासंगमे जग होय आत्मा होतसे गुणसंग कथियेले ॥ आता पूढे कैसा असंगास गुणगुण कैंचे तया बाधिति गुणाहुनि वेग-ळा जाणिजे कैसा ॥ १ ॥

**श्रीभगवानुवाच**

**परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् ॥**
**यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः ॥ १ ॥**

तेचि आता सांगतो तुज अर्जुना ! सकळावरिष्ठ ज्ञान, जे अभ्यासुनी पौरातनिक मुनि ते ॥ याच उत्तम रूप पूर्ण ज्ञानमार्गे परम सिध्धी पावले; प्रस्तुत ऐके, म्हणुनि हरि बोले ॥ १ ॥

**इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ॥**
**सर्गेऽपि नोपजायंते प्रलये न व्यथंति च ॥२॥**

हेच पूर्णज्ञान आश्रय करुनिया मी जेवढा जैसा तसे तेवढे तैसेच

मी जहालो ॥ सृष्टि होता ते नव्हे प्रलयकाळी त्यासि कैसे मी म्हणे या लागी ते तूं सद्य अवधारी ॥ २ ॥

**ममयोनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् ॥**
**संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥३॥**

क्षेत्र ऐसे जाणते महदादिका विश्राम थोर प्रसवण्याचि द्वार गर्भाधानिचा ठावो ॥ याचिदाभासाख्यगर्भा मी धरितसे तेथे मग हे सकल भूतोत्पत्ति तेथुनि होय वीरेशा ॥ ३ ॥

**सर्वयोनिषु कौंतेय मूर्तयः संभवंति याः ॥**
**तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥४॥**

या मनुष्यादीक सकळा योनिचिया ठाई बहुविध मूर्ति ज्या ज्या होति अपुल्या कर्म अनुसारे । जाण त्या त्या प्रसवती ते माय प्रकृति आणि बीज प्रदापिता मी पुत्र जग हे अचर चररूपा ॥ ४ ॥

**सत्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः ॥**
**निबध्नंति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥५॥**

मम तियेची संतति हे सत्व रज तम प्रकृतीचे जहाले पदुल जे थोर हे तीचेनि बळवंत । आपुलाल्या दुःख सुख मोहादि फांसा घालुनी क्षेत्रज्ञ वेढुनि बांधिती क्षेत्रीच अव्ययमते ॥ ५ ॥

**तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयं ॥**
**सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चानघ ॥६॥**

तेथ होता सत्त्व उत्तम शुध्द विषय ज्ञान तेथील सुख दृढ दोरे कसा तो बांधिला देही । ज्ञानमात्रे स्वये विसरुनी ज्ञान गर्वासंग खोडा घातला मग तेथुनी सुटला कधिची नोहे ॥ ६ ॥

**रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवम् ॥**
**तन्निबध्नाति कौंतेय कर्मसंगेन देहिनम् ॥७॥**

मध्यमू तो हा रजोगुण रंजवी जीवासी कैसा कामतृष्णेच्या कुसंगे प्रगटला खवळे ! । इहपरत्री विषयभोगसुखे कसा क्षेत्रज्ञ राया बांधुनि त्या घालितु संसारवनचक्री ! ॥ ७ ॥

**तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् ॥**
**प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥ ८ ॥**

धाकुटा जो प्रकृतिचा सुत मोहवीत विखारला अज्ञान दुर्विष सेउनी सकळासी भूलवितु । अळस निद्रा दुःप्रमादु ईहे गुणी आवरुनि त्याते बांधिले कीं तोचि घडिला केवळ ज्ञाने ॥ ८ ॥

**सत्त्वं सुखे संजयति रजः कर्मणि भारत ॥**
**ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे संजयत्युत ॥ ९ ॥**

सत्व गुण तो शोकमोहादिकहि आकळता तथापी सुखीच मी म्हण-हुनि विषयसुखाभिमुख होये । तव रजोगुण हर्षशोकी कर्ममार्ग प्रवर्त्त-वितो येउनी तम ज्ञान झांकुनी उठी प्रमादासी ॥ ९ ॥

**रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत ॥**
**रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा ॥१०॥**

रजतमा हरऊनि जै हा सत्व सिरवी तै सुखाचा फुंज तमसत्वासि लपउनि जै उठी मग हा । कर्मरति वाढे रजसत्वासि लपउनि तम पुढारे तै प्रमादु चढे शिरी न सुचेचि संतासंत ॥ १० ॥

**सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते ॥**
**ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत ॥ ११ ॥**

श्रोत्रआदि ईंद्रिये शद्बादि विषयज्ञान हे सविवेक जेंव्हा फाकले सदसद्विचारेशी । तेधवा हा सत्वगुण तेथे बरा वाढीनलासे जाणिजे सुख फुंज फुंज सत्त्ववृत्तिचे ॥ ११ ॥

**लोभः प्रवृत्तिरारंभः कर्मणामशमःस्पृहा ॥**
**रजस्येतानि जायंते विवृद्धे भरतर्षभ ॥ १२ ॥**

तव तम सत्वासि दडपुनि मोहरा रज बैसला तै इहपरत्र सुखासि झोंवे कर्म करी तैसे । चित्तउपरतिला नव्हे कै विषय जो जो लाभतो वाढला इच्छातरूवर नभचि ग्रासो जाये ! ॥ १२ ॥

**अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च ॥**
**तमस्येतानि जायंते विवृद्धे कुरुनंदन ॥ १३ ॥**

सत्वरज व्यापूनि जेंव्हा तम सकळ करणी स्फुरे तेंव्हा विवेक हरासयुक्त करावया न गमे । जे निसिद्ध करूचि वैसे,सत्त तेथ असत्त कैचा? हरपुनि जाये विचारू. हितार्थ नुगवेची. ॥ १३ ॥

**यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् ॥**
**तदोत्तमविदां लोकानमलान्प्रतिपद्यते ॥ १४ ॥**

जेधवा हो सत्वगुण हा वाढल्या तितुक्याची जरी सोडिला हा देहे प्रारब्धाचि गा सरिगा । तेधवाचि हिरण्यगर्भउपासकाचा लोक पाउनी तेथ त्याचा प्रलय, मागुती देव तो होये ॥१४॥

**रजसि प्रलयं गत्वा कर्मसंगिषु जायते ॥**
**तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ॥१५॥**

हा रजोगुण वृद्धिकाळी त्यागीतू जरि देह, तरि त्या कर्मठाच आलई नरदेह घेउनिया । तामसा अभिवृद्धिकाळी लीन होये तरी जडे अणि मूढ पशुपक्ष्यादि योनी उपज उपजुनि ये ॥ १५ ॥

**कर्मणः सुकृतस्याहुः सात्विकं निर्मलं फलम् ॥**
**रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम् ॥१६॥**

म्हणुनी वारे अर्जुना सात्विक कर्म आचरती त्यापासाव फळ लाहे सुखे ज्ञानासी अनुकूल । कर्म करिता राजसे दुःखाशि पावति ते अता तामसी कर्म करितया अज्ञान फळ होये ॥ १६ ॥

**सत्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च ॥**
**प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ॥१७॥**

सत्वगुण आचरतयाला ज्ञान होतअसे अपैसे[1] म्हणुनिया ज्ञानासि कारण सत्वगुण जाण । राजसे लोभ प्रमादु तामसे तो मोह अज्ञानचि दुष्ट तिर्यग्योनीचे[2] सुखादे ॥ १७ ॥

**ऊर्ध्वं गच्छंति सत्त्वस्था मध्ये तिष्ठंति राजसाः ॥**
**जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छंति तामसाः ॥१८॥**

सत्वगुण वृत्तिचिया धर्मे पावति ऊर्ध्वलोका आणि रजोवृत्तिने मध्य मनुष्य देहा येती । त्या तमोवृत्ति वळे नरकादि थारा पावती पण वस्तु वस्तुचे असे संसृति अहंकाराशी ॥

**नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति ॥**
**गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ॥१९॥**

गुण गुणातचि खेळता आपुल्या स्वस्तेनेचि आपणाविण गुणा चाळक न पाहे पूर्ण दृष्टीने । हा गुणाचा खेळु होता या गुणाहुनी वेगळा मी गुज हे जो जाणतू तो मीच हे जाण ॥ १९ ॥

**गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान् ॥**
**जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ॥२०॥**

यापरी गा जाणता हे ती गुणी गुण व्यवहार तनुचे याहुनी मी वेगळा होतोचि निश्चय हा । जन्ममृत्युजरादि दुःखगिरि उलंघुनिया उमैटो[3] नित्य परमानंद सुखसाम्राज्यपद पावे ॥ २० ॥

**अर्जुनउवाच**

**कैर्लिङ्गैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो ॥**
**किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते ॥ २१ ॥**

कृष्णजी ! मज सांगिजे कवण्या सुचिन्हे हा गुणाहुनी वेगळा होउनि गुण उलंघुनी जाये ? । कवण तो आचार त्याचा ? याच त्रिगुणातीत कैसा होतसे ? ते सर्व विवरूनि दाविजे देवा ! ॥ २१ ॥

---

१ आपोआप; अनायास. २ पशुयोनि, तिर्यग्योनि. ३ उदय पावे; उगवे.

**श्रीभगवानुवाच ॥**

**प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पांडव ॥**
**न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि कांक्षति ॥ २२ ॥**

ऐक बापा अर्जुना त्या त्रिगुण रहिताचे सुलक्षण सत्वरज अणि तामसे अपुल्या प्रवृत्तिने । आपणाप्रति पावता त्याचा कदा न करीत द्वेषु, गेलियाची सेच न करी, तोचि गुणातीत गा ! ॥ २२ ॥

**उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते ॥**
**गुणावर्तंत इत्येव योऽवतिष्ठति नेंगते ॥ २३ ॥**

जेंवि मृगजळ पूर्ण वोधे मेरू कांहि डळमळीना, तेवि गुण आदळति तन्हिही नोहेचि चंचल तो । पै उदासीनापरी असे गुणगुणि खेळता असे जाण तूं हालेचिना तो प्रकृतिसंयोगे ।। २३ ॥

**समदुःखसुखःस्वस्थः समलोष्टाश्मकांचनः ॥**
**तुल्यप्रियाप्रियोधीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुतिः ॥ २४ ॥**

सुख अणिक दुःखे सहज गुणधर्मयोगे होत असता हर्ष अणि विशाद विशमे मेळला नवजाये । लोह कांचन, अप्रियाप्रिय स्तवननिंदा द्वंद्व ऐंसी ज्याचिया सम आत्मरूपी नेणिजे कांही ॥ २४ ॥

**मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ॥**
**सर्वारंभपरित्यागी गुणातीतः स उच्यते ॥ २५ ॥**

मान अणि अपमान अणिक मित्र हे ते पैल शत्रु कांहि याचा उगम लेषही जेथ नोहेची ! करण कर्मारंभ होता नेणतो तेथील अहंता तोचि जाण गुणातित स्वानंदनिजमूर्ति ।। २५ ॥

**मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ॥**
**स गुणान्समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते ॥ २६ ॥**

म्हणसी कैंसा होय ऐंसा तरि मला निजभाव नेणे अन्य टाकुनि कामना जो सादरू भजतो । तोचि माझा सुप्रसादे बळेचि ऊलंघुनि

गुणा तो ब्रह्म होउनिया निजांगे विचरतु मजमाजी ॥ २६ ॥

**ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च ॥**
**शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकांतिकस्य च ॥ २७ ॥**

ब्रह्ममात्राचि मी प्रतिष्ठा मीच तेथे मोक्षसुख जे नाशरहिताद्वय सुखाचे मीच कारण गा ! । स्वस्वधर्माचरण एकांतिकः सुखाचे सुखस्व मी सकळ प्रतिष्ठिता मी ईंद्र प्रतिष्ठिता वेद ॥ २७ ॥

गुणविभागविवंचिता सुकृतिहुनि हरि वेगळा तो आपणचि या रीतिने हरि येथ सांगुनिया ॥ भवतरूवर उन्मळुनि अर्जुन सुखी करिता पुढें श्रीनाथ काय वदेल ते शिवराम आरंभी ॥ २८ ॥ हरिहिः ॐ तत्सादिति श्रीमन्महाभारते शतसहस्रसंहितायां वैयाशिक्यां भीष्मपर्वणी श्रीमद्भगवद्गीतासुपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणत्रयविभागयोगोनामचतुर्दशोध्यायः ॥ १४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

**श्रीमन्महा गणाधिपतयनमः ।। श्रीजगदंब प्रसन्न ।। श्रीरामसमर्थ ।।**
**॥ श्रीमन्महागणाधिपतयेनमः ॥ श्रीजगदंबा प्रसन्न ॥ श्रीसमर्थ ॥**

**॥ श्रीभगवानुवाच ॥**

**ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययं ॥**
**छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥ १ ॥**

कथन पूर्वाध्याईचे मद्भक्ति करिता मत्प्रसादे मत्स्वरूपी ज्ञान होये म्हणुनी सांगितले ॥ त्या मम ज्ञानास वैराग्य प्रधान म्हणुनी हा संसार तरूवररूप दाउनी काय हरि बोले ॥ १ ॥

ऐक पार्था भवतरुविस्तार हा उलठा कसा हा मूळ जे क्षर अक्षरासी

अतीत ते वर्तते ॥ तळवटि विस्तारल्या शाखा, निगमपर्णावळी, अव्यय-
भवाश्वत्थासी जाणे वेदवेत्ता तो ॥ १ ॥

**अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः ॥**
**अधश्च मूलान्यनुसंततानि कर्मानुबंधीनि मनुष्यलोके ॥ २ ॥**

जीव सकळ हिरण्यगर्भादिक अधम उत्तम तळीवरि वाढल्या शाखा,
गुणोदकी विषयपल्लव तेथे ॥ मूळ ते एकचि तयापासाव गुणमय
वासना त्या कर्म पारंब्या पसरल्या याच नरलोकी ॥ २ ॥

**नरूपमस्येह तथोपलभ्यते नांतो नचादिर्न च संप्रतिष्ठा ॥**
**अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसंगशस्त्रेण दृढेन छित्वा ॥ ३ ॥**

रूप याचे कायसे आदीच नाही, अनादि येथ नसेचि, अंत, म्हणूनि
दिसताही असे मिथ्या ॥ या विशाळ अनादि अश्वत्थासि तीक्षण विवेक-
शस्त्रे छेदुनी निर्मूळ करूनी स्वपद शोधावे ॥ ३ ॥

**ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तंति भूयः ॥**
**तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥ ४ ॥**

जेथुनी ते हेचि प्रवृत्ति पुरातनी विस्तारिली त्या आदि पुरुषाते भजू
हे धरुनि जिज्ञासू ॥ तेचि पद शोधूनि पहावे जेथ जाउनि संत फिरती
या भवासि न येती, आनंदी मिळाले ते. ॥ ४ ॥

**निर्मानमोहा जितसंगदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः॥**
**द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैर्गच्छंत्यमूढाः पदमव्ययं तत् ॥ ५॥**

मान आपमानासि ग्रासुनी, संगदोषा जिंकुनी, वृत्ति करुनि तद्रूप,
कामा दूर दवडुनिया ॥ दुःखसुख हे द्वंद्व निरसुनि, यापरी दवडुनि
अविद्या, मनि तदा अव्यय पदाप्रति संत ते चढती. ॥ ५ ॥

**न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः ॥**
**यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम ॥ ६ ॥**

जो सकळ तेजास भासक, स्वप्रकाश त्यासी कवणू भास दियाला—

गि, रविशशी त्या न भासविती । अग्नि तोही जडचि. जेथ विसावल्या फिरणेचि जेथुनी नाहि ते निजधाम माझे नीचें नव्हे पार्था ! ॥ ६ ॥

**ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ॥**
**मनः षष्ठानींद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥ ७ ॥**

निजविवेके पहाता मी मत्र आहति येन्हवी होताति । ज्या अंश देहोहमिति अभ्यासे । होऊनि आरुढ मनआश्वावरी सकलेंद्रियद्वार विषय भोगि प्रकृति ते जीवतापाये ॥ ७ ॥

**शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ॥**
**गृहीत्वैतानि संयाति वायुर्गंधानिवाशयात् ॥ ८ ॥**

कर्तृत्वा भोग्तृत्व आपण पात्र तूं जिव होउनी त्या शरीरालागि अथवा अन्य तनु घेता । तेथिले मन करण दैवत घेऊनीया जाय जैसा वायु पुष्पाहूनि परिमळ घेउनी जाये ॥ ८ ॥

**श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च ॥**
**अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ॥ ९ ॥**

येथ होगा स्वर्गादिलोकी हे मनाधिष्ठान इंद्रिय दशक आश्रय करुनि भोगी सकल विषयासी । म्हणसी ऐंसा जरि असे तरि सकळ कां नेणाति तया तरि येथ कारण येतुला सांगेन तुज ऐके ॥ ९ ॥

**उत्क्रामंतं स्थितं वापि भुंजानं वा गुणान्वितम् ॥**
**विमूढा नानुपश्यंति पश्यंति ज्ञानचक्षुषः ॥ १० ॥**

येथ मी माझे यया अज्ञान–पडदा आड राहुनि देहे असता, देहे त्यजिता, भोगितो विषयासी ।। गुणगुणाहुनि रहटता मी वेगळा आत्मा म्हणूनि मूढ ते नेणाति, विवेकी पहाति स्वानुभवे ॥ १० ॥

**यतंतो योगिनश्चैनं पश्यंत्यात्मन्यवस्थितम् ॥**
**यतंतोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यंत्यचेतसः ॥ ११ ॥**

---

१ नित्य.

राजयोगविशारद मनी मनातित आत्मयाते तनुकरण चळता अचळ म्हणुनी जाणती याते। येऱ्हवि या चितशुध्दिवीण विषई वाहवता, शास्त्रिये कवेळं[1] वित्पत्तिने नेणिजे भगवानु ॥ ११ ॥

**यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ॥**
**यच्चंद्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धिमामकम् ॥ १२ ॥**

व्यापकू मी भूतजाति ऐक जे रवि भासऊनि जग शोषवी ते तेज माझे जाण गा पार्था ! । मागुती उल्हास पुरवित चंद्रिका, ते जाण माझी पचनसिद्धि, तेजवृद्धि अग्निचेहि मी. ॥ १२ ॥

**गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा ॥**
**पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः ॥ १३ ॥**

भूतळांत प्रवेशुनि स्वपराक्रे[2] सचराचराते म्या अधिष्ठानिच धरिले प्राणिमात्राते । मीच होउनि चंद्रमा सर्वौषधि शोषित अनंतमुखें जिवाळे[3] देतसे सुरसात्मकु मी जाण ॥ १३ ॥

**अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ॥**
**प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥ १४ ॥**

प्राणिमात्राच्या शरीरि अग्नि मी होऊनि राहुनी जठरगार्भि आगिटा[4] प्रज्वळित धगधगितू । हे अपान प्राण भाती फुंकिता तेणे चतुर्विध स्निग्ध शुष्क सुपक्व विदग्ध धान्य मी पचवी ॥ १४ ॥

**सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो मतः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ॥**
**वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदांतकृद्वेदविदेव चाहम् ॥ १५ ॥**

ह्मणुनि सकळाचा हृदयगत मीच आहे. म्हणुनी मजपासाव आठव विसर विषयज्ञान उद्भवती । उपनिषद्भागादिकी मज जाणिजे. वेदांत कर्त्ता वेदवेता ज्ञानमात्रचि मी स्वसंवेद्यु ॥ १५ ॥

---

१ केवळ. हस्तदोष. २ स्वपराक्रमे. ३ जीवाला. ४ शेकोटी.

**द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ॥**
**क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥ १६ ॥**

पहाता चैतन्य एकचि ते द्विधा जाहले. कसे ? क्षर आणि अक्षर हेचि नाम प्रसिध्ध या लोकी । देहद्वयव्यवहार तितुका जाण हा क्षर भाग अंतर्बाह्य जो कूठस्थ कारण तोचि अक्षर गा ! ॥ १६ ॥

**उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ॥**
**यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥ १७ ॥**

ज्ञान बुडते तनुद्वयाचे मावळे अज्ञान; कारण मग उरे तूर्याख्यं जो तो पुरुष उत्तम गा ! । जो निजात्मा आत्मयाचा व्यापुनी लोकत्रयाशी जसा असे तैंसाच ईश्वर नाशरहित तूं ॥ १७ ॥

**यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ॥**
**अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥ १८ ॥**

कां क्षराक्षर वाट टाकुनि निर्विकारपणेचि असता म्हणुनि लोकी पुरुषोत्तम मला म्हणती । येऱ्हवी मी शुद्ध पुरुषोत्तमु हे नाम ऐका, तरि सकळ पुरि असणे म्हणुनी पुरुषोत्तमू तो मी ॥ १८ ॥

**यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम् ॥**
**स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ॥ १९ ॥**

अक्षराक्षर करुनि याचा ग्रास, मग मी पुरुषोत्तम, मज विवेके जाण तूं जाणीव घोटुनिया । तोचि सर्वाकार,सर्वहि जाणता,सर्वात्मरूप मलाचि भजुनी सर्वभावे मीच होउनि ठाये[1] ॥ १९ ॥

**इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ॥**
**एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ॥ २० ॥**

निज बिजाचे बीज गुह्यागमकुळाचे गुह्य तुज जे अर्जुना तूं दोष-रहित म्हणूनि सांगितलो । हे जिवी धरुनी बरे बुद्धिसि बोधुनि जे

---

1 राहे.

विरहतू तोचि बुद्धिसि परि निजांगे मीच हो ठाके ॥ २० ॥

योग हा पुरुषोत्तमू संसारतरुवर दाउनी सविवेक वैराग्येचि याचे करुनि उन्मळूं[1] । परमसुखसाम्राज्य पट्टी करूनिया अभिषेक पार्था यापुढे बोलेल हरि ते कथितसे शिवराम ॥ २१ ॥ इति श्रीभगवद्गीतायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे पुरुषोत्तमयोगोनाम पंचदशोऽध्यायः ॥१५॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

**श्रीगजानन प्रसन्न । श्रीलक्ष्मीकांत प्रसन्न ॥**

परम पुरुष ज्ञान जे अधिकारि जे हो जाणती अनाधिकारी नेणतीसे सुचवि अध्याय सोळावा ॥ अनाधिकारे असुर संपत्तिशि टाकुनी दैवि संपत्याश्रये पावति म्हणुनि हरि बोले ॥ १ ॥

**श्रीभगवानुवाच ॥**

**अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ॥**
**दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥ १ ॥**

तेथ आधि येक दैवि संपदा तूं अर्जुना निर्भय सुसत्व प्रसन्नता ज्ञानात्मता रहणे ॥ देखुनी सत्पात्र दान निग्रहो बाह्येंद्रिया निजयज्ञ वेदाध्ययन अर्जव तापासि स्वरुपी ॥ १ ॥

**अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनम् ॥**
**दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥ २ ॥**

अपर पीडा सत्य असणे रुसणे क्रोधावरी अणि त्यागी या सर्वस्व शांत दुरुक्ति ना ऐके ॥ भूत समस्ता पूर्ण तृप्ती नुचंबळे न करी कुकर्म ॥ वृथाच हव्यासी पडेना चपळता करुनी ॥ २ ॥

---

१ मुळासकट उपटणें.

**तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ॥**
**भवंति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥ ३ ॥**

आत्मरूपे फाकतू नेणे क्षमेचा मूर्त धैर्यमेरु जैसा अमल अंतर्बाह्य निराभिमाने । येतुले संधी सुचिन्हे पावला तो दैवि संपत्प्राप्तिचा म्हणुनी वळखावा वरा पुरता ॥ ३ ॥

**दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ॥**
**अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥ ४ ॥**

ऐक आता आसुरी जेणे घडे अवसान नरकी दंभ आणि क्रूरता अभिमान सक्रोधे ॥ त्रिकरणी निष्ठूर आपण कवण म्हणुनि सेच नाही हे संपदे तूं त्यजुनिया सुखे धरी दैवी ॥ ४ ॥

**दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता ॥**
**मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ॥ ५ ॥**

म्हणुनिया दोहीत दैवी संपदा मोक्षानुकूल अणिक दुसरी आसुरी जीवास बंधक होये ॥ जाण तूं तव संपदा दैविक अहासी पातला, परि शोक करिशि झाणि दुरासुरी संपतीचा तूं ॥ ५ ॥

**द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च ॥**
**दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे शृणु ॥ ६ ॥**

सृष्टि हे द्विविधा अनादि आसुरी अणि दैविकी जेवी रात्री राक्षसाचा दिन मनुष्याचा । याच लोकी दैवी संपाति तूजला सांगितली अता पुढे अवधारी असुरसंपदाविस्तार ॥ ६ ॥

**प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः ॥**
**न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ॥ ७ ॥**

धर्म अणिक अधर्म हे तव नेणतीच तया समाते सुकृत दुष्कृत दृष्टी कैंची त्या असुरलोका ? ॥ ठाव आचारासी नाहीं ! शौच कैंचे? तेथ आले सत्य तो मुळिहूनि नेणति अनृतवादी की ! ॥ ७ ॥

**असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ॥**
**अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥ ८ ॥**

मूळीच केवळ असत्यु तेथ धर्माधर्म म्हणति कैंचा ? ईश्वर हे मात कैंचीं त्रिजग निर्माया ?॥ स्त्रीपुरुषसंयोग अपणचि होय जग हे म्हणुनि- या शिश्नोदरपरायण विमुख स्वसुखासी ॥ ८ ॥

**एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः ॥**
**प्रभवंत्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ॥ ९ ॥**

कामनापर पडेल[1] दृष्टीसि आड येता आंधळे होउनी आपुला घात अपणचि करिति दुर्बुद्धि ! । तामसे हिंसादिक कर्म करिति नाश करांवया ! जग उपजति अपणही बुडती, बुडविति ते येरा ! ॥ ९ ॥

**काममाश्रित्य दुष्पूरं दंभमानमदान्विताः ॥**
**मोहाद्गृहीत्वासद्ग्राहान्प्रवर्ततेऽशुचिव्रताः ॥ १० ॥**

दुरतरू जो काम त्याचा करुनि आश्रय दंभमानमनादि दुष्टगुणे सर्वदा ते पहुडले असती । तेथ मोहे क्षुद्र दैवत पूजुनी धरण प्रलोभा बैसती अंतर्बाह्य ते सर्वदा अशुची ॥ १० ॥

**चिंतामपरिमेयां च प्रलयांतामुपाश्रिताः ॥**
**कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः ॥ ११ ॥**

दुस्तरु चिंतासमुद्री बुडुनि गेले वहात ते कीं प्रळयकाळ घडो- नि ये तन्हि न टकती चिंता ! । कामभोग यथेष्ट भोगुनि येतुलेचि कृतार्थ ह्मणती वोढुनी शिर कासया हे वोडखे श्रमती ! ॥११॥

**आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ॥**
**ईहंते कामभोगार्थमन्यायेनार्थसंचयान् ॥ १२ ॥**

दुष्ट आशापाशयंत्री अडकले तनु बंदिशाले पाडिले पायातची बेडी क्रोधकामाची । तेथ पडुनि उगे न राहती. मागुती कामोपभोगी दुष्ट

---

१ पटल; पडदा.

अन्यायार्थ संचय माघतातिं चणे ! ।। १२ ॥

**इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ॥**
**इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ॥ १३ ॥**

आंतल्यातचि वटवटी आजी अम्ही जे जोडिले की मत्पितामह आदित्यासही स्वप्निहि नव्हते ! । हा मनोरथ कां फळेना ? किं आम्हाला काय हे उणे ? अणिक येणारही धन वहुत वहु आहे ! ।।१३।।

**असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि ॥**
**ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी ॥ १४ ॥**

फिरविती मग कर मुखावरी. म्हणती कैसा मारिला हा रिपु अणिकही जे तेही मारीन! । मीच मी माझा स्वतंत्र मीच भोक्ता सिद्ध बलवान् या जनात आम्हीच येकू वहु सुखी आहो ! ।। १४ ।।

**आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया ॥**
**यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ॥ १५ ॥**

द्रव्य आदीकरुनि तितुक्या सिद्धि माझ्या घरिच राबती. गोत सकळहि मजचि अनुसरताति, मी ऐसा ! । मजसमान असे कवण ? मी दिक्षतु देणार बहुधा तुष्टमानहि मी, असा अज्ञान मोहांधे ! ॥ १५ ॥

**अनेकचित्तविभ्रांता मोहजालसमावृताः ॥**
**प्रसक्ताः कामभोगेषु पतंति नरकेऽशुचौ ॥ १६ ॥**

बहुविधा संकल्पवहणि चित्त गेले वहात म्हणुनी भ्रांत जहाले अंध मोहा वरपडति कैसे । कामकल्पनाकल्मशि जे नित्य लिगटुनि राहिले म्हणुनि अशुचि नर्ककुंडी पचिजेति ते बहुधा ॥ १६ ॥

**आत्मसंभाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः ॥**
**यजंते नामयज्ञैस्ते दंभेनाविधिपूर्वकम् ॥ १७ ॥**

आपणचि आपणासी बहुधा पुजुनि घेती स्तब्ध केवळ दंभ मद गर्वेचि सर्वापरिस मुसमुसती । हे परम दीक्षित श्रोत्रिय वाढावया अपुली

प्रतिष्ठा नाममात्रे यजति दंभे त्यजूनिया विधिते ॥ १७ ॥

**अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः ॥**
**मामात्मपरदेहेषु प्रद्विषंतोऽभ्यसूयकाः ॥ १८ ॥**

हे अहंता परम पीडा आणि दर्प काम क्रोध आपुले हेची करूनि भांडवल ते नाडले कैसे । आपुलाहि पराचिया हृदयस्थ मी तव एकला मजसि करिति द्वेश अगुणी दोष उच्चरती ॥ १८ ॥

**तानहं द्विषतःक्रूरान्संसारेषु नराधमान् ॥**
**क्षिपाम्यजस्रमशुभानासुरेष्वेव योनिषु ॥ १९ ॥**

ते असे जे आत्महत्यारे कृतराधमाते संसारनर्काणवी बुडवीन वारंवार । श्वान शुकरे व्याघ्र वृक मार्जार वारुण आदि योनी निरवले त्या मारणे मरणे कदा न चुके ॥ १९ ॥

**आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि ॥**
**मामप्राप्यैव कौंतेय ततो यांत्यधमां गतिम् ॥ २० ॥**

या असुर योनीत फिरता प्राणियासी उसंत कैंचा जन्मजन्मि फिरा फिरोनिया येति अणि जाती । यापरी सीणूनि त्थीत्या मज न पउनी परमाधमागती पावती त्या असुरी संपत्तिचे ते लोक ॥ २० ॥

**त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ॥**
**कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥ २१ ॥**

कठिण नरका दाखवे हेचि जाण धनंजया जे काम अणि क्रोध तिसरा लोभ तोहि जाण । आपुल्या स्वहितासि चीरा घातला त्यानेंची जो या अखिला म्हणहुनि शहाणे त्यागिती त्याते ॥ २१ ॥

**एतैर्विमुक्तः कौंतेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः ॥**
**आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् ॥ २२ ॥**

जाणुनी हे अंध तामसद्वार जे कां शाहणे यापासुनी सुटती विवेके

बोधले बोधे । आपुल्या स्वरुपीच आपण रमति पाउनि निजगती मग जन्ममरणा ग्रासुनी जैसेचि ते तैंसे ॥ २२ ॥

**यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ॥**
**न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥ २३ ॥**

नावडे वेदोक्त निज आचार केवळ काम मोहे विधिनिषेधा त्यागुनीया इंद्रिये पाळी । त्यासी इहैक सुखा ळवहि तो स्वप्निही नाहीच पा पर लोकसुख त्या केउते त्या स्वपद मग कैंचे ? ॥ २३ ॥

**तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ॥**
**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥ २४ ॥**

म्हणुनि या गा अर्जुना हे शास्त्र तुज प्रमाण जेथे कार्य अणि अकार्य हा निष्कर्षु दोहीचा । जाणुनी बरवेपरी शास्त्रार्थयुक्त विधान तैंसे रहट तूं सत्कर्म काजालागी अवतरसी ॥ २४ ॥

यावरी देवासुराच्या संपदा निवडूनि त्यातें त्या नवौदानासी दाउनि दिधले कृष्णे । हे बरे ऐकुनिया अर्जुन करील प्रश्न पुढति तेचि गीतादीपिका शिवराम दावितसे ॥ २५ ॥ हरिहिः ॐ तत्सदिति श्रीमन्महाभारते शतसहस्रसंहितायां वैयाशिक्यां भीष्मपर्वणी श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे दैवासुरसंपद्विभागयोगोनांम षोडशोध्यायः ॥ १६ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

**॥ श्रीमंगलमूर्तये नमः ॥ श्रीपांडुरंगाय नमः ॥ श्रीगुरू दिनमणी**

अधिकारी याचा सूर्यवंशध्वज रिपू जय अठव्या भजनाचिये निजरत्न दिप्तीचे ॥ भक्त तो अर्जुन करील प्रश्न जो श्रद्धा विशेष तसाच लक्ष्मीनाथ संशयगांठि उकलुनि देतो ॥ १ ॥

॥ अर्जुन उवाच ॥

**ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजंते श्रद्धयान्विताः ॥**
**तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्वमाहो रजस्तमः ॥ १ ॥**

आळसे क्लेशेचि किंवा अंतरुनि शास्त्रासी केवळ सोलिये श्रध्येनि भावे यजति यज्ञाते ॥ सांग त्याची कवण निष्ठा ? सात्विकी ते राजसी कीं तामसी ते कवण हा अधिकार हे त्याचा ॥ १ ॥

**श्रीभगवानुवाच**

**त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा ॥**
**सात्विकी राजसी चैव तामसी चेति तां शृणु ॥ २ ॥**

पूर्ण वैकुंठादिराज कृपालु तो पार्थासी बोले पूसिले ते तेथ ते श्रद्धा त्रिविध आहे ॥ स्व स्वसंस्कारे उठी ते सात्विकी आणि राजसी ते तामसी हा म्हणुनि हे त्रिविध श्रद्धा तेचि तूं ऐके ॥ २ ॥

**सत्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत ॥**
**श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥ ३ ॥**

तारतम्य प्राणिमात्रहि आपुलाल्या भजनभावे भक्ति करिति सत्व रज तम स्वाधिकारी ते ॥ म्हणुनी श्रद्धामय पुरुष तो जो जसा संस्कार घेउनी ऊठिला तो तो तसा गुणरूप भक्ति करी ॥ ३ ॥

**यजंते सात्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः ॥**
**प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजंते तामसा जनाः ॥ ४ ॥**

सत्व संगे बाधिजे श्रधा करूनिया सात्विकी ते स्वर्ग संपत्तिसाठी देवालागी भजताती ॥ येथ राक्षस दैवताते पूजिति श्रद्धेनि राजस यजति तामस भूत प्रेत गणादिका भजती ॥ ४ ॥

**अशास्त्रविहितं घोरं तप्यंते ये तपोजनाः ॥**
**दंभाहंकारसंयुक्ताः कामरागबलान्विताः ॥ ५ ॥**

स्व स्ववर्णाचार शास्त्री विरुध आणि प्राणीमात्रा बहु भयंकर करिती कर्मे तापसी तपती ॥ मीपणे ते कर्म तपलोकी पहावी म्हणुनि उघडे दाविती विषई प्रलोभे काम अनुरागी ॥ ५ ॥

**कर्षयंतः शरीरस्थं भूतग्राममचेतसः ॥**
**मां चैवांतःशरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान् ॥ ६ ॥**

सकळ भूतग्राम हिंसा करुनिया मज भजू म्हणती ते भजन नोहे अंतरात्मा शीण तो मजला ॥ आसुरी ते भक्त केवळ नेणुनी मज सकळा भूतात्म्यासि जे ऐसे तयाचा करिति झणी संगू ॥ ६ ॥

**आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः ॥**
**यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं शृणु ॥ ७ ॥**

प्राणीमात्र आहर तोही त्रिविध जाण आहेति त्या त्या पूर्व संस्कारेचि परि ते आवडति फार ॥ यज्ञ तप अणि दान तेही त्रिविध गुण भेदेचि असती त्यांत सात्विक अहार लक्षण परियसे आधी ॥ ७ ॥

**आयुःसत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ॥**
**रस्याः स्निग्धाः स्थिराहृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ॥ ८ ॥**

येथ दैवी योग भोक्ता बैसला तरी सुरस सुघृते तिंबिले हळुवार सारक्षुत्करा नव्हती ॥यापरी सुग्रास परिमित जेविता तेणेचि अयुष उत्सवो आरोग्यबळ सुख वाढति प्रीती ॥ ८ ॥

**कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः ॥**
**आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥ ९ ॥**

राजस्याचि परवडी हे ऐक आता डोकुडे आत्यंत कडु अणि आंबटे ग्रामार्ध मीठ रुची ॥ कर न घलवे उष्णखार तसेचि राखेपरिस शुष्क ही रोग शोक दुःखासि देती तनुसि दाहक हे ॥ ९ ॥

**यातयामं गतरसं पूतिपर्युषितं च यत् ॥**
**उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियं ॥ १० ॥**

तामसाचे आवडाति जे आहार तेही सांगू ऐके प्रहर क्रमिल्या वरिल निरस पीळिल्या परिजे ॥ वीटले दुर्गंधी आणि उच्छिष्ट, भक्षाया अयोग्य अशी दुराने सेविता बहु गोड तामसीया ॥ १० ॥

**अफलाकांक्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते ॥**
**यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्विकः ॥ ११ ॥**

ऐक आतां यज्ञ सात्विक करुनिया एकाग्र मानस यज्ञ हाचि अगत्य यजिजे याच आस्तिक्ये ॥ विधि दिटि सुनि फल न मागुनि ईश्वरार्पणबुध्धि यजती ते पदासि मिळावया सोपान यज्ञाचे ॥ ११ ॥

**अभिसंधाय तु फलं दंभार्थमपि चैव यत् ॥**
**इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसं ॥ १२ ॥**

स्वर्ग सकळा आजी यावा कीर्तिही लोकांत व्हावा दीक्षितु होईन चित्ति हाचि आवांकां ॥ यज्ञ जे पार्था यजति निजहित विहित विसरुनी तो पण यज्ञ राजस म्हणत तेही लोक राजस गा ॥ १२ ॥

**विधिहीनमसृष्टान्नं मंत्रहीनमदक्षिणम् ॥**
**श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ॥ १३ ॥**

न देख श्रध्धा वदत तेही विधि म्हणवी तरि तिला नाहीच ठाव तथापि भक्ती तेहि परि नाही ॥ हिंसनिरासुच नूपजे ब्राह्मणही ज्या नातळती तो यज्ञ तामस जाणिजे आणि विमुख तो मजला ॥ १ ॥

**देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् ॥**
**ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥ १४ ॥**

हरिहरादिक ब्रह्मवेत्ता स्वगुरू द्विज आणि संत याचा पूजने हात शोभती शुध्ध अंतर्बाह्य ॥ आवडे सकळासि आपुल्या स्वस्वरूपी निमगुनि तेथे कदापि हिंसा नेदिजे शारीर तप ते गा ! ॥ १४ ॥

**अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ॥**
**स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥ १५ ॥**

नाश अविवेकासि चित्ता गोड प्राणा अगर करिते वचन सत्सुधामय जयाचिया मुखीचे ॥ वेद अथवा नामघोष, अहंकृतीविण आत्मचर्चा तेचि तप वाचीक आता ऐक मानासिचे ॥ १५ ॥

**मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ॥**
**भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥ १६ ॥**

आपणाविण तेथ कांही न देखो, म्हणुनि प्रसन्न सदा. अकार्ये बोलणे तद्विपई जो मौनी ॥ चित्त ते चैतन्य जहाले, बुद्धि बोधे बोधली, आणि नसती भावाभाव ते तप मानसिक पार्था ! ॥ १६ ॥

**श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः ॥**
**अफलाकांक्षिभिर्युक्तैः सात्त्विकं परिचक्षते ॥ १७ ॥**

त्रिकरणी जे कथियले गुणभिधा ते सांगतो तुज त्यात आधी सत्त्व गुण तप ऐक बा पार्था ॥ तेचि फळ सांडूनि आस्तिक बुधि ते श्रधेने करिता सत्वशुद्धिलागि तप सात्विक ते म्हणिये ।। १७ ।।

**सत्कारमानपूजार्थं तपो दंभेन चैव यत् ॥**
**क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥ १८ ॥**

सकळही मज सर्व भावे मी भजावे परमात्म मी बहु तापसी सादंभ आंगी दुमदुमित वाजे ।। हा पवाडा आणुनी तप करिति ते राजस गुणाचे तापसी, अस्थिर फळानी ते पिसे केले ।। १८ ॥

**मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तपः ॥**
**परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ॥ १९ ॥**

इहपरत्र सुखासि रुसूनी मूढपण अग्रह धरूनी पीडाही करुनि आपुली ईतरासहिी जाचू ।। जारणादिक कर्मसित्धी न्यावया जे करिति ते तामसिक तप म्हणुनि बोलती आत्मवेत्ते ते ।। १९ ।।

**दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ॥**
**देशे काले च पात्रे च तद्दानं सात्विकं स्मृतम् ॥ २० ॥**

पै अता जे दान तेही त्रिविध गुणरूपेचि आहे त्यांत सात्विक दान ऐके मार्ग जे मुक्तिशी ॥ क्षेत्र कुरु तो देश आदि सुदेश ग्रहणादिक-काळी अनुपकारी पात्र पाहुनी आस्तिके देणे ॥ २० ॥

**यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः ॥**
**दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् ॥ २१ ॥**

ऐक राजस दान ते उपकार त्याचा पाहुनी ठेऊनि फळविषयीं[1] मनात साभिलाषे गा ! ॥ आपुल्या चित्तास दुखउनि,येर भोळे जाचउनी,कीर्तिचा विस्तार व्हावा म्हणुनि देईजतो ॥ २१ ॥

**अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते ॥**
**असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥**

म्लेंछलोकनिवास आदी ठांई किंवा अर्ध रात्री भाट गणिका नाग-रीसे लोक देखुनिया ॥ आणिले जे चोरुनी करुनि घात जिवास जे का अर्जिले अवगूनि देणे दान तामस ते ॥ २२ ॥

**ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणः स्त्रिविधःस्मृतः ॥**
**ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ॥ २३ ॥**

सात्विकी जे दान त्या विनियोगविधिते ऐक आता ब्रह्म जे वर्ण त्रयात्मक जाण ॐ तत्सत् ॥ तपदिव्योपदेश जो तेणेची वेद ब्राह्मण ही ब्रह्मादि देवहि आणि यज्ञ पुरातनी जहाले ॥ २३ ॥

**तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः ॥**
**प्रवर्तंते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनां ॥ २४ ॥**

म्हणुनि ॐ मुच्यार त्याचा ठीच यज्ञक्रिया शास्त्रोक्त विधिने ज्याचिया आंगी प्रवृत्तलिया ॥ आणिखी उच्चार तो ब्रह्मैवकरणीची क्रिया ते सहज जहाले ब्रह्म ते. मोक्षासि कवण पुसे ? ॥ २४ ॥

---

१ या एकाच ठिकाणीं विषयीं असें रूप आलें आहे एरव्ही याच्या ऐवजीं " ई " असावयाचें.

**तदित्यनभिसंधाय फलं यज्ञतपःक्रियाः ॥**
**दानक्रियाश्च विविधाः क्रियंते मोक्षकांक्षिभिः ॥ २५ ॥**

नाम जे दुसरें जयाचे ऐक तो बडिवार जे फळवासना त्यागूनि यज्ञ तपे त्रयादाने ॥ वहुविधा कीजेत क्रीया मोक्षईच्छा ज्यासी तोही ब्राह्मरूप फळांत तेथे उरीच कांहि नुरे ॥ २५ ॥

**सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते ॥**
**प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते ॥ २६ ॥**

असत् तितुके आटुनी सत्तचि दाउनि सर्व कर्मी पूर्ण हा सत्कार ऐंसा उगवला पाहे ॥ ॐ तदाकारची ब्रह्माकार कर्महि दाविले ते गाळुनी चिन्मात्र होणे म्हणुनि सद्‌बुध्दि ॥ २६ ॥

**यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते ।**
**कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते ॥ २७ ॥**

यज्ञ तप दानादिके असता असतचि तेथ हा सच्छब्द येउनि त्यासि बरवे आश्रयो जहाला ॥ म्हणुनि तेहि तसेचि कर्म जहाली ब्रह्मैव केवळ ॥ यास्तवचि ॐ तत्सदिति मद्रूप ते ब्रह्म ॥ २७ ॥

**अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ।**
**असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥ २८ ॥**

या चमत्कारासि नेणुनि मोडुनी श्रद्धाध्वजाते अश्वमेधादीक यजन मोहाग्रतप तपणे । कांहि जे करणे समग्र धरादि दान आदि किंबहुना सकळ ते व्यर्थ इहपर प्राप्ति त्या नाही ॥ २८ ॥

यापरी शौरी तया श्रद्धात्रयाचा हा विभाग करुनि पार्था सांगता सप्रेम वोसरतु । त्या सुखी हरपोनि गेला जेंवि जळमयगार लक्ष्मीनाथ वदुनी काय बोले ते वदे शिवराम ॥ २९ ॥

हरिहिः ॐ तत्सदिति श्रीमन्महाभारतेशतशहस्रसंव्हितायां वैयाशक्यां भीष्मपर्वणी श्रीमद्भगवगीतासुपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे श्रद्धात्रयविभागयोगोनां सत्पदशोध्यायः॥१७॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

**श्रीमन्महागणाधिपतये नमः । श्रीभानुभास्कराय नमः ।**
**श्रीउमामहेश्वराय नमः ॥**

येथ तो साद्यंत गीतार्थ प्रगट करावया तो पार्थ बोले त्याग अणि सन्यास प्रश्नमिसे । हाचि अटरावा करूनि सिंव्हावलोकन पहाता तो सकल गीतासार सिध्ध समर्पि हरि पार्थासी ॥ १ ॥

**॥ अर्जुन उवाच ॥**
**सन्यासस्य महाबाहो तत्वमिच्छामि वेदितुम् ।**
**त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिपूदन ॥ १ ॥**

कृष्णजी ! संन्यास अणि त्याग, दोनी, पहता येकूच अर्थ दिसे जसे संघात अणि संमुख्य तत्त्व पुसावया इच्छितसे दोहीच तो त्याग अणि संन्यास कैंसे भिन्न दैत्यारी ? ॥ १ ॥

**॥ श्रीभगवानुवाच ॥**
**काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।**
**सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥ २ ॥**

अर्जुना ! तूं म्हणसी दोनी त्याग शब्दी बोलिजेती. तरी सत्यते इतुकेचि. भेदालागी कारण हे स्वर्ग भोगादिक कामिक कर्म त्यजणे. मुख्य हा संन्यास. निजकर्मांचिया फळसांडि तो त्याग. ॥ २ ॥

**त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः ॥**
**यज्ञदानतपःकर्म न त्याज्यमिति चापरे ॥ ३ ॥**

कोणी येक त्यजावंया जे कर्ममोहे ते फळाशा न ठकवे म्हणूनि हिंसारोप कर्माते । पै त्यजांवे येक व्हणती कर्म त्यागादीक तप ते अणि दान हे करणेचि येणे चित्तशुध्दि होये ॥ ३ ॥

**निश्चयं श्रृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम ॥**
**त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः ॥ ४ ॥**

तरी पुरुषपंचानना तो त्यागु कैंसा के[1] विधी म्हणसि तरि तो त्रिविध त्याचे रूप करू आता । त्रीप्रकारे कीजती गोचर. तयाचे सार ते इतुकेचि. जो मज संमतू तो त्याग अवधारी. ॥ ४ ॥

**यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ॥**
**यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥ ५ ॥**

आपुले सोडवण इच्छित जो मुमुक्षु असे, तयाते[2] यज्ञ दान तपादि कर्म नाचि टाकावी । बुद्धिमंत विवेकयाने कर्म यज्ञादीक हे करणेचि जसे पांथिकू तो पाउला न टकी[3] ॥ ५ ॥

**एतान्यपि तु कर्माणि संगं त्यक्त्वा फलानिच ॥**
**कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥ ६ ॥**

यज्ञ आदिक सर्व कर्म जी अवश्यक आणि आपुल्या अवसरेचि ते करावी कर्त्तृता त्यजुनि आणि या बाजो फळाचा तेथ हेतु न ठेउनि मनोरथँ, यापरी कर्मचि त्यागु हा होये. ॥ ६ ॥

**नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते ॥**
**मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ॥ ७ ॥**

जो जयाचा वर्ण आश्रम युक्त त्याचा त्यागु करिता सर्वथा त्या नाव कांही नव्हेचि संन्यासू । काय येणे होय ? म्हणुनी मोहदृष्टी त्यागिता,तो त्यागु तामस बोलिजे. नृपपंचवदन ऐके ! ॥ ७ ॥

---

१ कोठें; कोणता. २ तयानें. चतुर्थीविभक्ति अविहित आहे. ३ यांबवीत नाहीं. ४ हेतू न ठेउनी=मनोरथ.

**दुःखमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत् ॥**
**स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत् ॥ ८ ॥**

जे करूं आरंभिता श्रम मानुनि कायेसि तेथिल निबरपणे[1] देखोनि उबगुनि[2] कर्म जो टाकी । राजस त्यागीच तो पण त्यागफळ न लभेचि तो. जो सिदोरी भार म्हणुनी टाकिल्या, मग काये ? ॥ ८ ॥

**कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन ॥**
**संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्विको मतः ॥ ९ ॥**

तरि कवण त्यागेचि मोक्षकरासी हे म्हणसि अहंता टाकुनि सोडूनि पाणी त्या फळासेला । नियत अपुले कर्म हे करणेचि म्हणुनी कर्मकरिता फळ अहंता टाकणे तो सात्विकत्यागू ॥ ९ ॥

**न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते ॥**
**त्यागी सत्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः ॥ १० ॥**

रजतमावरि रुसुनिया चोखाळला सत्वेचि जो तो दुःखकार कर्मासि देखुनी द्वेश मानीना । सुखकर कर्माचरण करिता तेथ न धरी तोष निर्मळ बुद्धि बोधे डोळसू निःसंशये खेळे ॥ १० ॥

**नहि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः ॥**
**यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ॥ ११ ॥**

देह तव हा मुळिच कर्मविकारमय असता कदापी कर्म न घडे टाकणे हे सत्य नृपवीरा । या अहंकारासी टाकुनी, इश्वरी फळ अर्पिता, तो त्यागीता, अज्ञान दवडुनी, आत्मसुख लाभे ॥ ११ ॥

**अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम् ॥**
**भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ॥ १२ ॥**

नर्क देते येक ते स्वर्गासि,दुसरे देतसे मनुष्यत्वासि,देते कर्मफळ हे तीं[3]

---

१ कठिणपण. २ कंटाळून. ३ तीन.

परींचे जे । पै ते काम्यालागी हे फळरूप बाधी सत्यसत्वत्यागी त्यासी कदा न बाधी शुध्ध संन्यासू ॥ १२ ॥

**पंचैतानि महाबाहो कारणानि निबोध मे ॥**
**सांख्ये कृतांते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम् ॥ १३ ॥**

म्हणासि करिता कर्म बाधिच, तरीच हे हो सकळ कर्मासिद्धिसाठि पांच कारण वेगळे अहाति । तेचि बरवे ऐकिजे वेदांत आणि सिद्धांतही. ते तुज मी सांगेन संख्या जाण पांचाची ॥ १३ ॥

**अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ॥**
**विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पंचमम् ॥ १४ ॥**

प्रथम जाण शरीर दुसरा तो अहंकारू तसी ते ईंद्रिये येऱ्हवी वेगळाली प्राणपंचकही । दैवते इतुके मिळोनी पांच, कर्मोत्पत्ति कारण शुभहि होत जात. हे निमित्त मात्रे वा ! ॥ १४ ॥

**शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः ॥**
**न्याय्यं वा विपरीतं वा पंचैते तस्य हेतवः ॥ १५ ॥**

काईक कर्म आणिक वाचीक अणि मानसीक न्याय हो अन्याय कर्मे त्रिकरणी होता । पै तया कर्मासि कारण हेचि पांच, परस्परे तनुदैवतेंद्रिय प्राण अंतःकर्ण प्रवृतिही ॥ १५ ॥

**तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः ॥**
**पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ॥ १६ ॥**

जाण याहुनि वेगळा नोहूनी कांहि अंतरात्मा कर्म प्रगटी पांच पाचा होसि परभारे । नेणुनी हे वर्म कर्त्ता मी म्हणुनि या कर्तेपण आंधळा जाहला ! तयाला दृष्टी मग कैंची ? ॥ १६ ॥

**यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ॥**
**हत्वापि स इमाँल्लोकान्न हंति न निबध्यते ॥ १७ ॥**

ज्यासि मी करितो अशाची सेच नाही,पूर्ण तेथिल बुध्दिही जहाली न

लिंपे कांहि अलुमाळा । स्व स्ववर्णी कारणी हे कार्य होय असे वळखुनी कामिता त्रैलोक्यहि ते मनी न लिंपे तो ॥ १७ ॥

**ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना ॥**
**करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसंग्रहः ॥ १८ ॥**

पै अता अज्ञान पटि हे अन्यथा ज्ञानाचिये उठताति चित्रे ज्ञेय ज्ञाता तो तसे ज्ञान । त्या चित्री कुठें कर्म चालत कर्मसंग्रह करण कर्ताकर्म हेचि फिरोनी पहाता सुटिजे तत्काळ ॥ १८ ॥

**ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैवः गुणभेदतः ॥**
**प्रोच्यते गुणसंख्याने यथावच्छृणु तान्यपि ॥ १९ ॥**

ज्ञान अणि ज्ञेय हे ज्ञाता तिन्हि कर्म प्रवर्ति यत्र तसे कर्तार कर्महि कार्य हे तिन्ही । विविध भेद गुणानुसार सांगिजे तू ऐक तेथे । विचारिता आत्मा निराळा अनुभउनि राहे ॥ १९ ॥

**सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ॥**
**अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्विकम् ॥ २० ॥**

ब्रह्म आदि पिपलिकात विभक्तभूति स्वात्मता अविभक्त अद्वय पहा तूं पहात्यासि ग्रासुनिया मावळत संकल्प सकळहि आप आपणामाजी सुखीया तेचि जाण धनुर्धरा तूं सात्विकु ज्ञान ॥ २० ॥

**पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान् ॥**
**वेत्ति सर्वेषु भुतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ॥ २१ ॥**

ऐक बोध निमोनि जाये. मग पृथग्भूती भूति सुखदुःखिया ठिकऱ्या जिवींच्या! मानिल्या भावे नामरूपातीत जै ते नामरूपे भेदुनि आपणासी ऐसे जाणणे ते राजसे ज्ञान ॥ २१ ॥

---

१ थोडी सुद्धां " अलुमाळा " असें रूप आढळत नाहीं. २ चित्रें अकारांत नपुंसकलिंगी नानाची अनेक वचनाची रूपें एकवचनासारखींच आहेत.

**यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम् ॥**
**अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥**

दगुड शेंदूर लाविला देखूनि कार्यच पुरता हेचि प्रतिमा देव म्हणुनी देहे बुद्धि भावी । तत्वता जाणेचिना न सत्यफळासी टपत, टाकुनी विधि निषेधा वाट, तेची ज्ञान तामस गा ! ॥ २२ ॥

**नियतं संगरहितमरागद्वेषतः कृतम् ॥**
**अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्त्विकमुच्यते ॥ २३ ॥**

ज्ञान त्रिविध निरोपिले. आता परियसी कर्म त्रिविध. तेथ सात्विक कर्म ते अवधारि वीरेशा ! ॥ युक्त ते वर्णाश्रमा अनंहकृति न द्वेशरागावरि रुसोनि फळाश टाकुनि उत्सवे करणे ॥ २३ ॥

**यत्तु कामेप्सुना कर्म साहंकारेण वा पुनः ॥**
**क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम् ॥ २४ ॥**

करुनिया आयास फार, अपार अंगी अणुनि अहंकार, वोढा कामना गणिकांगनी धरण ॥ बैसुनी,फळ वा सुनिच्या अडकला खोडा, करी जे कर्म विसरुनि आपणा ते कर्म राजस गा ! ॥ २४ ॥

**अनुबंधं क्षयं हिंसामनपेक्ष्य च पौरुषम् ॥**
**मोहादारभ्यते कर्म तत्तामसमुदाहृतम् ॥ २५ ॥**

सर्वथा हे करिन ऐसा धरुनि फार दुराग्रहो अपणासि तो सुटका नव्हे हिंसादिके करिता ॥ विधिनसे तनु पाहातू मोहांध माजी माजला अक्षय फळाशि मुकुनि करणे ज्ञान तामस ते ॥ २५ ॥

**मुक्तसंगोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ॥**
**सिद्ध्य सिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते ॥ २६ ॥**

कर्म कथिले त्रिविध, आता त्रिविध कर्त्ते, ते कसे त्या माजी सात्त्विक ऐके सांगो सदा तुष्ट ।। कर्म माझे मी करीत, कदापि नुमटे हे मनी, धीरु असिध्दिसी होत तेणे तो विकारेने ॥ २६ ॥

**रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः ॥**
**हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः ॥ २७ ॥**

विश्वसाम्राज्यासि ईच्छी कर्मफळ लोभीट दोषा वरकडा हिंसात्मकू भूतघातकी चपळु ॥ वेगळाचि सबाह्य, सिद्धि पावलीया हर्ष नपवे, तरी रडे ! ऐसे करी तो राजसी कर्त्ता. ॥ २७ ॥

**अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः ॥**
**विषादी दीर्घसूत्री च कर्त्ता तामस उच्यते ॥ २८ ॥**

कांहि कृत्याकृत्य नेणे, काथियले ते न करणे, न लवेचि. कपटी आणि अपर उत्कृष्ट तामस हे ! ॥ आळशी अणि पेठ तू चित्तात नित्य क्रोध अनळू झोंबलासे दीर्घता तो तामशी कर्ता ॥ २८ ॥

**बुद्धेर्भेदं धृतश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु ॥**
**प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनंजय ॥ २९ ॥**

ऐक आता त्रिविध बुधि धैर्य तेही त्रिविध का गुणभेद रूपेरूप अधिकार अनुसारे ॥ आत्मनिश्चय तेचि पै जिय आरिसा प्रगटेल आता अन्यथा विपरीत तेही धनंजया अवधारी ॥ २९ ॥

**प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये ॥**
**बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी ॥ ३० ॥**

आपणा मोक्षा उपाय बरा फळे अचरे तयाते सत्क्रियाचि प्रवर्त्तवि विपरीत टाकविजे ॥ विहित अविहित अर्थ अणि अनर्थ हे करिताचि बंधन मोक्ष सिध्धी जाणती ते सात्विकी बुधि ॥ ३० ॥

**यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेवच ॥**
**अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ॥ ३१ ॥**

ऐक आता राजसी माति जे अधर्मा आणी धर्मायोग्य करणे कीं अयोग्य विचारण नाही । पूर्ण संदेहार्णवीच बुडोनि जाये आपुले हीत तत्वही नेणेचि नाही येक विश्वासु ॥ ३१ ॥

**अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसा वृता ॥**
**सर्वार्थान्विपरीतांश्चबुद्धिः सा पार्थ तामसी ॥ ३२ ॥**

आपुल्या वर्णाश्रमासी नव्हेचि योग्य विचार तेची अम्हासी युक्त म्हणोनि जाणे पूर्ण अज्ञाने ॥ जे प्रतिष्ठिले श्रुतिस्मृति शास्त्र सिद्धितिये तितुके अन्यथा मानीत जे ते बुद्धि तामस गा ॥ ३२ ॥

**धृत्या यया धारयते मनः प्राणेंद्रियक्रियाः ॥**
**योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्त्विकी ॥ ३३ ॥**

अैक सात्विक बुद्धिधैर्य सबळते स्फुरता सवे विषयेंद्रियाचि गांठी आपआपल्या सुटली ॥ प्राण ते आयामिता मग मन वसे निज आसनीच अचंचळे, या पूर्णयोगे हृद्रता मिळणे ॥ ३३ ॥

**यया तु धर्मकामार्थान्धृत्या धारयतेऽर्जुन ॥**
**प्रसंगेन फलाकांक्षी धृतिः सा पार्थ राजसी ॥ ३४ ॥**

अणि मनोरथसागरी जे वहावी धर्मार्थकामा लहरिया आदळति तो करवीत आयासू ॥ जाण कर्माचे चतुर्गुण फळ अपेक्षा वाढवी ते धैर्य राजस वोळखे हृदयस्थ ते येणे ॥ ३४ ॥

**यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च ॥**
**न विमुंचति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी ॥ ३५ ॥**

ज्या महा अपवित्र धैर्ये बळेचि मिथ्याभूत जे स्वप्नादिकी व्यापार मानी सत्यता तेथे । दुष्टबुध्दीनें भयाशी न भिशा दुःखाजया हा शोक जिवलग आपुला धृति तामसा तो जाण ॥ ३५ ॥

**सुखं त्विदानीं त्रिविधं शृणुमे भरतर्षभ ॥**
**अभ्यासाद्रमते यत्र दुःखांतं च निगच्छति ॥ ३६ ॥**

धैर्यलक्षण त्रिविध हे तुज कथियले कीं ऐक आता सुख तसेची त्रिविध गुणभेदेचि सांगेन । जेथ अभ्यासे हळु हळु दुःख दग्ध करूनिया आत्माराम सुख लाधे म्हणुनि ते सत्वसुख ऐके ॥ ३६ ॥

**यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ॥**
**तत्सुखं सात्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ॥ ३७ ॥**

जेथ यमनियमादि अभ्यासात रिघता इंद्रिये विषयासि त्यजिता कठिणता जे वाटते आधी । मग तया सुविरक्तियोगे प्राप्ति भगवंती घडे भगवत्प्रसादे होय ते सुख तत्व गुणिचे बा ! ॥ ३७ ॥

**विषयेंद्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ॥**
**परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥ ३८ ॥**

इंद्रिये विषयात रिघती नेणुनी परिणाम दुःखा जेथ आरंभीच अमृतासारिखे वाटे । कठिण नरकी नेउनी जे लोळवी सेखीः विषाये जाणति सुख राजसी ये धनुर्धरा खोटे ॥ ३८ ॥

**यदग्रे चानुबंधे च सुखं मोहनमात्मनः ॥**
**निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥ ३९ ॥**

जे अभक्षापथ अग्राह्यादि अंगिकारितो दुसऱ्यासी हो अपणासि जाच असेचि ठेवीले । आळसे निद्रेन प्रमादू आदिअंति दुःख करिजे नेणता सुख वाटते ते जाण तामस गा ॥ ३९ ॥

**न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः ॥**
**सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ॥ ४० ॥**

स्थूळ सूक्ष्मादीक पृथ्विवरि बरे पाहती यया त्रिकुटीविन्हा प्रकृति असे हे तव नसे कोठे । म्हणुनि प्रकृतिबंधने सत्वादिकी सुटिजे स्वरूपी राहिजे म्हणहूनि तुज म्यां प्रगट सांगितले ॥ ४ ॥

**ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ॥**
**कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥ ४१ ॥**

गुणविशिष्ट या चतुर्वर्गीले जे वर्ण सहज ब्रह्म क्षत्रिय आणिक शुद्र याच अभिदान । त्यांत मुख्य ब्रह्म क्षत्रिय अणिक जे वैश्य तेही ब्राह्मणचि जो शूद्र तो वर्ण त्रयानुचरु ॥ ४१ ॥

**शमोदमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च ॥**
**ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥ ४२ ॥**

ऐक आता ब्राह्मणीये सुलक्षण गोवृत्तिशी मी तपीश्वरीच मीळे शमू तो अन्य विषयत्याग । दमविचार शुचि सबाह्य धरेसी लाजवणे क्षमा सकळासि आवडिजे स्वरूप स्थैर्य आस्तिकता ॥ ४२ ॥

**शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ॥**
**दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥ ४३ ॥**

अैक धर्म क्षेत्रियाचा जो निजांगे शत्रु निवटी स्वप्रकाशे चोख, धैर्य मेरु परि अचळ । दक्षता अंगी अलौलिक, झुंजता परि तेचि नाशे, सत्पात्र देणे, भूतमात्री निज हरी पाहे. ॥ ४३ ॥

**कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ॥**
**परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥ ४४ ॥**

दृष्टि सूनि पिकेस करण शेत गोधन राखणे, वसु विक्रित अलाभ लाभे वैश्य कर्म हे । ब्राह्मण क्षेत्रिये वैश्य त्रिवर्णिकाशि द्विजत्व आहे म्हणुनि याते सेवणे हा शूद्रनिजधर्म ॥ ४४ ॥

**स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ॥**
**स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विंदति तच्छृणु ॥ ३५ ॥**

ब्रह्मनवरत्नाकरू क्षेत्रिय सप्तहि सागरु त्रिलोचन तो वैश्य चौथा शूद्र येकांगी । स्व स्वकर्मी लागल्या निजसिध्दि लाभू येणेचि होये । हे तुला सांगेन ते तू ऐक गा पार्था ॥ ४५ ॥

**यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ॥**
**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥ ४६ ॥**

जो अविद्याचिंधिया गुंडाळुनि निज बाहुल्याते खेळवी जेणे चराचर वसत अंतर्बाह्ये । पै तया सर्वात्मयाते आपुलाल्यावाधि धर्मी सर्वभावे पूर्ण भजता मनुज सिद्धि जाये ॥ ४६ ॥

**श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ॥**
**स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ ४७ ॥**

यद्यपि विषय स्वधर्म परस्वधर्म जऱ्ही वराच तथापि अपुला धर्म अपणा मोक्षसुख देतो । शुभ विरक्ती विवेकता निष्काम भजता ईश्वरी वर्णाश्रम जे योग्य करिता कर्म न बाधिते त्यासी ॥ ४७ ॥

**सहजं कर्म कौंतेय सदोषमपि न त्यजेत् ॥**
**सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ॥ ४८ ॥**

आपुल्या देहासहित जे पावले निजकर्म ते दोषास्पदु जरी जहाले तरी ते त्यजावेना । अग्नि धूम्रे वेष्टिला तैसाच कर्मारंभ तितुका दोषवेष्टित जऱ्ही, अकामे जाणते निर्दोष ॥ ४८ ॥

**असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ॥**
**नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति ॥ ४९ ॥**

शुध्दसत्त्व विरक्ती सबळ सदृश्य देखुनि बुध्दि न भुले. प्राप्त परमानंद मन उन्मनि दृश्य आले । अन्यथा बोधासि ग्रासुनी सद्गुरूकरुणाबळे संन्यासयोगे पावतू निष्कर्म सिध्दिते ॥ ४९ ॥

**सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे ॥**
**समासेनैव कौंतेय निष्ठा ज्ञानस्य या परा ॥ ५० ॥**

पाउनी निष्कर्म सिध्दिसि मग कसा निजधाम हा विश्रांति ये संक्षेपते तुज सांगतो ऐक । बाणता आंगी जयाचा कर्म करिता ब्रह्म होणे ज्ञान निष्ठा कर्म ते अवधारि कौंतेया ॥ ५० ॥

**बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च ॥**
**शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा राग द्वेषौ व्युदस्य च ॥ ५१ ॥**

स्नान करुनी विवेकतीर्थ, क्षाळुनीया बुद्धीचे मळ, स्वसुख धैर्ये आणुनी,मग गुरुवचन मार्गी । लाउनी, विषयाकडे न घलूनि पाय,अदृष्ट संगे शुभ अशुभ येता, तयाचे न मनि रागद्वेश ॥ ५१ ॥

**विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः ॥**
**ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥ ५२ ॥**

दिसति रागद्वेष जेथुनि त्यजुनिया येकांत राहे परिमिती अन्नासि सेवी त्रिकरणाच फुडा । उठाचि नेंदी सद्विरागे जो मने नुचंबळेची युक्त वस्तू ध्यानयोगे धरुनि सुखीया तो ॥ ५२ ॥

**अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ॥**
**विमुच्य निर्ममः शांतो ब्रह्मभूयाय कल्पते ॥ ५३ ॥**

लेउनी सुविरक्तिकवच स्वगुरुमंत्र धरूनि शस्त्र सुराजयोगहयावरी आरूढला कैसा ! । मारिताचि चाले रिपू दळभार काम क्रोध अहंता दर्पदळ ममता स्वरूपसाम्राज्यपद भोगी ॥ ५३ ॥

**ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ॥**
**समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ॥ ५४ ॥**

आत्मबोध सर्वदाही प्रसन्न स्वपदी बैसला तो फिरूनि न दिटे शोक कांक्षा दासि दःसाढयासी । सर्वभूति समसमान मिळोनि या हा प्रकृति भाव असे सविस सरूनिया निजांगे भक्त माझा होय ॥ ५४ ॥

**भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः ॥**
**ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम् ॥ ५५ ॥**

येर जिज्ञास ते अर्थार्थी नव्हति जे ज्ञान चौथी तेहिपण नोहेचि भक्ती प्रथम ना चौथी । माझिये सहज स्थितिने जेव्हढा जैसा असे मी तत्त्वता जाणोनिया मज मीच ते होती ॥ ५५ ॥

**सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ॥**
**मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ॥ ५६ ॥**

ऐक गा सुभटा सकळ कर्मकरित असता मर्दपण । करुनि मन्मुख मन धरूनी आश्रयो माझा । मज मनोहरणासि जाउनी पूर्ण माझ्या सुप्रसादे नाशरहित अखंडपद पावोनि मी होये ॥ ५६ ॥

**चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः ॥**
**बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ॥ ५७ ॥**

ह्मणुनि तूंही धनंजया चिन्तेसहित हा सर्व कर्मन्यास मद्रुपि करि फिरे मजकडे आता । हे अनन्य सुखैक बुध्दि रीघता मजमाजी ते चैतन्य होय चित्त मग मज तुज भेद काये ॥ ५७ ॥

**मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ॥**
**अथ चेत्त्वमहंकारान्न श्रोष्यसि विनंक्ष्यसि ॥ ५८ ॥**

चित्त जै मद्रूप होय तेधवा माझ्या प्रसादे जन्म मृत्यु प्रमुख दुर्गे लंघुनी जासी । हे अव्हेरूनिया ममाज्ञा आपुलिये अहंकृतीने न ऐकसी तरी नाससी मग मी तुला कैंचा ॥ ५८ ॥

**यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ॥**
**मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥ ५९ ॥**

व्यर्थ हा अहंकारी होउनी मानिशी मी एक अर्जुन या जनासि मी झुंजता मज दोष बहु आथी । तरी वृथा व्यवसाय तुझा हा दिसे तूं क्षत्रियत्वे प्रकृतिने घडिलासि ते तुज उठविलेचि जाण ॥ ५९ ॥

**स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा ॥**
**कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ॥ ६० ॥**

ह्मणुनी त्रिगुणी बांधिलाचि आहेसी अपुल्या जन्मधर्मे न करू ह्मणसी, ते कैसेनि तुज सोडी ? । मोहममतेचा दुराग्रह धरुनि न करू म्हणसी तरी तो प्रकृतिधर्म तुझेचि हाती जाण करवील ॥ ६० ॥

**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ॥**
**भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥ ६१ ॥**

प्रकृतिचीर लेउनि अपुल्या निजकर्म यंत्री नाचती नाचवी भूतजात ब्रह्मादिक चरअचरा । वसुनी आपण पूर्ण सकळा अंतरंगी नाटकू नाचवित असताहि तथापि नव्हेचि लिप्तू ॥ ६१ ॥

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ॥**
**तत्प्रसादात्परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥ ६२ ॥**

ह्मणुनि करणे न करणे ते प्रकृतिचे जाणोनि ऐसे मग तया गोसा-
विया रिघ शरण सद्भावे । त्याचिया करुणाप्रसादे शांतिचे विश्रामधाम
तये पदीचा तूचि रावो अर्जुना होसी ॥ ६२ ॥

**इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ॥**
**विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥ ६३ ॥**

जे गुजाहुनि गूजगुप्त ज्ञान गीतातत्व अर्थ विवळुनी तुज दाविलो-
चिद्रत्न हातवटी । हे विचारुनिया बरे निज बुध्दियोगे अनुभउनी
माघिजे तुझ्या चित्तासिये तसे करी पार्था ॥ ६३ ॥

**सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः ॥**
**इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ॥ ६४ ॥**

अणिकाहि गुज हे गुजाचे तुज मी सांगेन तूं मज जीविचा जिवलग
सखा आवडसी मज फार ॥ बोधअंमृत बुद्धि तुझी अस्तिके भरली असे
ह्मणुनि तुजसी कांहि पडदा ठेविला नाही ॥ ६४ ॥

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ॥**
**मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ॥ ६५ ॥**

मग उठी संकल्प धरुनी तितुकियात फिरूनि पाहे भक्त होय योग-
तेही करि मर्दपण गा । भूतमात्र समग्र मी अनुभउनि, संविदान दृष्टी
मज नभी, मी होउनि ठासी मत्प्रिया पार्था ! ॥ ६५ ॥

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ॥**
**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि माशुचः ॥ ६६ ॥**

स्वर्गनर्का सूचविति हे धर्म सकळ ज्ञानगर्भी घालुनी मज येकल्या
ते शरण तू येई । मग तुला सकळाच संघापासुनि मी सोडवीन ॥ असता
असे तूं व्यर्थ पार्था शोक हा टाकी ॥ ६६ ॥

**इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ॥**
**न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥ ६७ ॥**

अर्जुना गीतार्थतत्व प्रगटिसे जे तुज हे स्वसुख तूं प्रगट न करी अशा या अनाधिकाऱ्याते । वर्ण धर्म तपे विहिन मसी विभक्त तसेचि सेवाचोर आणि माझ्या स्वरूपी प्रीती ज्या नाहीं ॥ ६७ ॥

**य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति ॥**
**भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः ॥ ६८ ॥**

परम हे गीतार्थगुह्यज्ञान माझे भक्त पाहुनी जो करील प्रगट त्याप्रती उरी न ठेऊनी । तोची माझ्या भक्तिमार्गीं लाउनि सेखी स्वबोधे शीघ्र मजसी समरसे पै संशयो नाही ॥ ६८ ॥

**न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः ॥**
**भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि ॥ ६९ ॥**

लउनि तनुचि चालणे वेगळेपण न दावी संता ज्ञानि कर्म ताप शाहुनी तो जसा पढिये पण तसा या भूतळी पहाता न देखे आन जो गीतार्थतत्व प्रगटितो मद्भक्त लोकाते ॥ ६९ ॥

**अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ॥**
**ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ॥ ७० ॥**

आमुचा तुमचा बरा संवाद मग जो ईश्वराच्या वालभास्तव न करित पारायण सुखे भरितू पूर्ण तो ज्ञानाग्नितची विद्या अविद्यासह हो मुनी मज तुष्ट केले अर्जुना तेणेचि मजलागी ॥ ७० ॥

**श्रद्धावाननसूयश्च शृणुयादपि यो नरः ॥**
**सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान् प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ॥७१॥**

सर्व मार्गीं साडुनी निंदेशी कुरवंडुनि अशा परमविश्वासे नरू सद्भावला ऐके । तोहि परित्या पुण्यप्रबले उत्तम लोकाशी पावे करूनिया मद्भजन सेखी मीच तो होयें ॥ ७१ ॥

**कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा ॥**
**कच्चिदज्ञानसंमोहः प्रनष्टस्ते धनंजय ॥ ७२ ॥**

हे असो आता विशेष जो तुला सिध्धांत कथिला तो तुंवा धरिला मनी किं नाहि ते कैसे । मोह जो मागील तुझ्या वध्य हे वधणार, हे उरलेचि कर्माकर्म ऐसे कांही तुजमाजी ? ॥७२॥

**॥ अर्जुन उवाच ॥**

**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ॥**
**स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ॥ ७३ ॥**

कृष्णजी ते काय सांगू निजसुखे घडिलो तेंव्हा मोहासि ठाव दिसेचिना मी ब्रह्म हेहि नसे । सकळ कर्माकर्म संकल्पासि पाणी सोडुनी तुझिया प्रसादे पूर्ण मी जे म्हणसि तेचि करिन ॥ ७३ ॥

**॥ संजय उवाच ॥**

**इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः ॥**
**संवादमिममश्रौषमद्भुतं रोमहर्षणम् ॥ ७४ ॥**

त्यासुखे उचंबळत संजय तव म्हणे राया कसे संवाद सुख अम्हासि आले पार्थ अणि हरिचे ॥ तेथ दोघे दोनिपण न दिसेचि पहाता अरिसा मुख भासताहि जेवि तसे एकवटले दोघा ॥ ७४ ॥

**व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम् ॥**
**योगं योगेश्वरात्कृष्णात्साक्षात्कथयतः स्वयम् ॥ ७५ ॥**

म्हणसि तुज हे साध्य कैसे व्यासगुरुच्या सुप्रसादे गुह्य जे गुह्याहुनि ते ऐकिले राया । योग जो प्रत्यक्ष नारायणचि अपुल्या निजमुखे वदला तया भ्या पात्र होउनि प्रकट तुज केले ॥ ७५ ॥

**राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमिमद्भुतम् ॥**
**केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ॥ ७६ ॥**

सांगता धृतराष्ट्ररायां संजयो संवाद जो जो आठवीतो तो तयाचा मूर्त होउनी ठाये । मग म्हणे कृष्णार्जुनाचा सांगता संवाद भेद दिसेचिना तो काय तुज सुख केउते बोलो ! ॥ ७६ ॥

**तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः ॥**
**विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुनः पुनः ॥ ७७॥**

पुढत पुढति तो म्हणे राया कसे हे जहाले पहाते रूप हरिचे देखणाविण दिसे कैसे ।नाहिंपणेंचि असे कसे आठव विसर या दोहिसी चुकलो कसा आनंदसिंधु दुमदुदित भरला ॥ ७७ ॥

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ॥**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ ७८ ॥**

हे असो पुढती म्हणे जय संजया कवणा असे ते सांग ऐसे ऐकुनी हा निती[1] बोले । ऐक राया जेथ योगीराज कृष्ण धनुर्धरा तो जेथ तेथ संपद्विजय सुख आथी ॥ ७८ ॥ श्लोक समाप्त ॥

**अर्पुनी सर्वस्व तुं त्या पांडवासी प्रार्थुनी निज-**
**पुत्र सकळही वांचवीं येऱ्हवी करी भलते ॥ ७९ ॥**

हा असा निर्धार माझा म्हणुनी तूं पुत्रासहित नमुनी कृष्णपदांबुजाप्रतीं शरण जाई बा ॥

अपण अपुला पूर्ण निज आनंद सेउनि तृप्त जहाला कृष्ण अर्जुन सुखरसे रचला सुख स्वरूपे । डोल येत महा सुखासी समग्र आठही भाव जिरउनी संजयो राजपदी सुखरूप राहीला ॥ ८० ॥ जाण हे गीतार्थ दुभते करुनिया पार्थासी वत्सजगजननी ते कृष्ण गाय दुभीनली कैसी । येथजींवे जरि न हाल तरिच ते आंगेचि व्हाल उगेचि पारायण कराल तथापि पद पावाल ॥ ८१ ॥ म्हणुनि थोरी व्यास मुनिचीं परम हा

---

१ निश्चय. निर्णय.

उपकार सकळ कृष्ण उक्ती ग्रंथ हा साकार जो केला । तेचि गीता पद्यरचना देशभाषा अर्थ वदता सद्गुरूने नाम दिधले चांद्रिका ऐसे ॥८२॥ म्हणुनी गीताचंद्रिका हे देव लक्ष्मीनाथ नारायण पदी निरउनी संता प्रार्थितसे मी । पद्य पद्यामाजि येथिल अर्थुकुर्मा अवयव असुडिल्या परिगर्भ आहे अनुभउनि पाहा ॥ ८३ ॥ जेवी संकोच ग्रही सर्वस्व साटव दडपदडपुनी साठविता थोडक्यातची सर्वही माये । तेचि येक्या पद्य पद्यामाजि हा श्लोकार्थु अवघा पूर्ण जाणविला असे पण विवळुनि पहा ॥ ८४ ॥ नेणवे हे पद्यरचना स्वामिला आवडले म्हणुनी बुद्धिते पेरोनि कैसे लिहिविले हाती । मग उदास करूनि ठाता येउनी स्वप्नात आपण पदपदार्थ करूनि विवरण वदुनि लिही म्हणे ॥ ८५ ॥ जाग्रती हे चंद्रिका स्वप्नांत पहाता चंद्रिकाची सुषुप्तिमाजी अनुष्ठिता हे चंद्रिका दीसे । उठता बसता तसे हो बोलता अणि चालता हे सर्वदा सर्वत्र गीता चंद्रिका प्रगटे ॥ ८६ ॥ हे असो प्रत्येक्ष या नागेशरूपे प्रकटुनीच अगत्य गीता चंद्रिका लिहवी बलत्कारें लेखणी लेखण मिषे लिखिता स्वये नारायणचि तो आपण पै शिवरामरूपें चांद्रिका लिहिली ॥ ८७ ॥ **अब्दरुधिरोद्गारिनामा दक्षणायन मास हा तव मार्गशीर शुभ्रुध्ध सप्तमी वासर गुरूच्या ।** त्रितिय प्रहरी पूर्ण गीता चंद्रिकाख्य ग्रंथ ते दिनीं संपलासे सकल सती जाणिजे खूण ॥ ८८ ॥ सद्भाविकचकोरेष्टा व्यामोहतमनाशनी बुद्धिचंद्रमनिद्रादी सेयं गीतार्थचंद्रिका ॥ ८९ ॥ लक्ष्मीनारायणाबोधाब्धिपुष्टिदात्री विनिर्गता शिवराममुखंप्राच्यासेयं गीतार्थचंद्रिका ॥ हरिहिः ॐ तत्सदिति श्रीमन्महाभारते शतसहस्रसंहितायां वैयाशिक्यां भीष्मपर्वणी श्रीमद्भगवद्गीता सूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे मोक्षसंन्यासयोगानां अष्टदशोध्यायः ॥ १८ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ शके १८१३ खरनाम संवत्सरे उत्तरायणे वसंत ऋतु चैत्रमासे शुक्लपक्षे

पौर्णिम्यां भृगुवासरे हनुमत्‌जयंती दिने द्वितिय यामे ग्रंथ समाप्तः ॥ कष्टेन लिखितं ग्रंथं यत्नेन प्रतिपालयेत् ॥ अबध्योवा सुबध्योवा मम-दोषोन विद्यते ॥ १ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

श्रीअच्युतविरचित

## श्री गीतेची आरती

॥ आर्ती ॥ संग्रामाचे समई देखुनि स्वजनासी ॥ अर्जुन बोले कृष्णा निवटु कोणासी । सोहंश्रुति जे मजला दिसतो दृष्टीसी ॥ यात वधिता पातक मी नव्हे देहासी ॥ जयदेव जयदेव जय भगवद्गीते साक्षाद्भग-वद्रूप भवदुस्तर हरते ॥ धृ ॥ विषई निराकार मज आत्मयाचा ॥ आत्माबुध्धी पाहे अनुभव पै साचा ॥ समुळी भेदाभेद पाहे तूं कैचा ॥ देही गेही गांडिव भ्रम सांडी यांचा ॥ २ ॥ सर्वही भूति आत्मा अद्वय परिपूर्ण ॥ तेथ वधिता पार्था दुसरा तूं कोण ॥ केवळ तूं जडमूढ आत्मा निर्गूण ॥ मरणा बंधन पाहे कवणा स्वाधीन ॥ सर्वहि संशय गेलो जहाला विश्राम आत्माबुद्धि पाहे परिपूर्ण ब्रह्म ॥ त्वंपद तत्पद ऐक्य सांगितले वर्म ॥ विष्णुः पादांवुज अच्युत सप्रेम ॥ ४ ॥ जयदेव ॥ ० ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ।

॥ श्री ॥

# परिशिष्ट.

॥ श्रीमाहागणाधिपतये नमः । श्रीमत्पूर्णानंद लक्ष्मीनारायणशिवराम देशिकेंद्राय नमः । शुभमस्तु श्रीगुरुगोविंदायनमः । श्री सरस्वत्यैनमः मातै चंदली प्रसंन ॥ औं न्नमो जी विघ्ननाशा सकलनिगमार्थप्रकाशा अद्वया जय परमपुरुषा त्रिजगदाभासा । सावकाशा हृदवकाशा माजि वसवीं जगंन्निवासा स्वरूप ईशाधीश–चित्सैत्यैक–सिधीशा ॥ १ ॥ हे चि शब्दब्रह्म अवघें मूर्ति तुझी स्मृति च अवयव अर्थशोभा ते चि निजलावण्यघनदाटी । जाण अठरा ही पुराण तीं च मणिगणभूषण अणि पद्यबंधन पट्टअंवर झळकतें कैसें ॥ २ ॥ क्षुद्रघंट्टा काव्यनटक रुणझुणीती अर्थध्वनी व्यासादिकाच्या बुध्दिदीप्ती मेखले शोभा । बाहु शडदर्शनभुजाकृती निजविसंवाद चि धरीती आयुधातें तो चि विद्वदनुक्रमू ऐका ॥ ३ ॥ तर्कु तो चि फरशु नीतीभेदु तो अंकुश महावेदांतरस तो मोदक रसभरित मिरवतसे । बौधमत खंडतिकदतु अपरकरी शोभत श्रुतिशी युक्त तर्क अभय वरदी हे स्वनिजधर्म ॥ ४ ॥ अणि चतुर्विध पुरुषअर्थ भुजा स्वधर्म पद्मकर पदीश चुकवी अनर्थविपरितार्थ आयुध ते परिघ निष्कासत्व । अपरोक्ष चि सुदर्शनचक्र हा दशबाहुचा कुलपति विनायक म्हणुनि वदलों ॥ ५ ॥ तेथ शूंडादंड तो सुविवेक परमानंद स्वमुखें हालत स्वानंदरदनु शुभ्रसा झळके सूक्ष्मईक्षणदृष्टि पूर्वोत्तरमीमांस श्रवण बोधामृतमदा सुनिभ्रमर सेऊं सेवनी ध्वानिती ॥६॥ द्वैत अणि अद्वैत कुंभ तया वरी उपनिषदसे विज्ञान–तेजे झळक देत किरीट तो साजे । मुक्त मुक्तामाळ सकळ मुखाचि ही स्वमुख दावी रसबोधाचा मिरवला नागबंद तो ॥ ७ ॥ गुरुकटाक्ष विनायकाची समपद म्यां वंदिली जो तवं कसा भरला भला गितार्थमकरंदू । जाण तेणें

जीवभ्रमर विगूंत्तली तेथ चि खुणखुण करित गीताचंद्रिकेनें ध्वनित गुरु-करुणा ॥ ८ ॥ ते चि नमिली भारती वाचेसि वाचिक चित्तचाळक घातका बुधीशि अजड–जडिवसे समता । शुत्धसत्वप्रधानप्रधान त्या पितांबरें वेष्टित सोहहंस त्या वरी बसुति शक्तिची वाजती वीणा ॥ ९ ॥ तें यतो वाचे निवर्त्तेते त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्म असि इत्यादि सुश्वर मूर्छना ध्वनवी । सुख अनिर्वाच्यावधी शुकभूतसृष्टिमालिका करिवरवरद ऐश्या भुजा सायुध लखलखिती ॥ १० ॥ मध्य सूक्ष्म स्वानुभव निजमेखळा तेथ अधोमुख उपनिषद त्या क्षुद्रघंट्टा सुरस खुणखुणिती । सुमनमाळाप्रणद्धकंठ अपूर्व जेथु निगमघोषोद्घटसुविचारैक्यतातांबुल निजरंगे ॥११॥ आस्तिक उचावलें तें सरळ नाक अग्रामलग्नमुक्तमोतीज्ञानविज्ञानेक्यता डोळे । देखणें टवटवित देखति पूर्णबोध टीला सुकुंकुम आड येति सलोभ केश श्रवणमुळी लावी ॥ १२ ॥ मुकुटि कुंडल सुज्ञानभक्तिविरक्तितेज राजयोगस्थिति सुखें आभरण लखलखिती । त्रिगुण ही समता मिळुनी सरळ वेणी पाठिशी हे सच्चिदानंदैकघडित निजमूर्ति जगदंबा ॥ १३ ॥ प्रकटली जेशीं मुखीं तो गुरुगुणार्णव वर्णिता दिधली बुडी आगें विना सर्वांगशीतळ । आंत बाहिर निजसुखें सुखाडली भवसिंधु तरली आठवें विण आठवी उपकार सद्गुरुचे ॥१४॥ जयजया लक्ष्मीवरा जय आत्मदानी जी उदारा चुकविल्या तां येरझारा सहज तुज नमिता । जीव हा चोखाळला तुझिया कृपासलिले चि शिवपण सोविलें तें ही मला आतळुं दिल्हे नाहीं ॥१५॥ स्वप्रकाशें पाहतां न दिसे चि जगदाडंबरु ज सच्चिदानंदद्रय चि दिसते म्हणों जरि बा । तें हि मायिकता अतद्यावृत्तिने वाचि केले म्हणुनि तूझा तूं चि असशी देखशी आपणा ॥ १६ ॥ कुलगुरू तूं आमुचा अज्ञानहर मार्तांडकुळिचा अकुळ तूं मार्तांडभैरव तूं चि देवता । तूं चि तूं उपनीतगुरु विद्यागुरु तु जनकजननी तूं चि तूं अपरोक्षगुरु निजअंत्तरात्मा तूं ॥ १७ ॥ मायबाप जरी म्हणो तुज तेथ ही

तनुचेनि संबन्धें विटाळ असतसा तूं नव्हशि गा देवा । तां असे केल मला की शरीर होते काय मागे तनु पुढें होणार ऐसा शब्द ही नेणो ॥१८॥ दीसतां व्यवहार होतां वृत्ति वरि ही खेळतां सर्व अयंतिक अभाव चि करुनि दावियेलें । मायबापे मायबाप चि ने देखु ऐश्या तुला म्या मायबाप म्हणोनि देवा काय बडबडणे ॥ १९ ॥ जननिजनकें पूर्ण हे संसारदायक म्हणुनि जाउनि वैद्य अस्य गुरूशि वंदुनि स्वहित साधावें । हें तसें मज नाहि जालें भवपुरी तारावया हृदयस्थ आपण बाप होउनि गुरुरुपें आलाशी ॥ २० ॥ जें यशोदानंद गौळी त्याचिया उत्कटतपें तूं देखोनि तुष्टुनी तूं तयाचा पुत्र जालाशी । लक्ष्मणादिकां वरि बधू अर्जुनादिकां सखा त्या भीमकादिकेंशि तूं जामात होशी बा ॥ २१ ॥ जन्मजन्मार्जिततपें तूं त्याहला जालाशि सुलभ हें नव्हे आश्चर्य कांहीं पाहतां देवा । केवळ प्राकृत अहर्ती अज्ञानग्राहणी वहवता तां बाप होउनि तारिलें हे नवल मज वाटे ॥२२॥ माय लक्ष्मी बाप नारायण कसें अनकूल दाविशि गृह चि मुक्तकुटुंब करुनि गृहस्थ जालशी । तूं गुरु आपण चि अपुला असशि पुर्णानंद होउनि मज ही पूर्णानंद केलें पुत्र म्हणवीतां ॥ २३ ॥ हृदयी पूर्णानंद भरता वदनि पूर्णानंद उमटे नयनि पूर्णानंदमात्र दिसे चराचर हें । म्हणुनि पूर्ण परंपरा हें आदि अंतीं शिवस्वरूप घराशि आली तो अनुक्रम संत्त हे ऐका ॥ २४ ॥ ईश दत्त तथा सदानंद तयाच्या शिष्य रामानंद निर्मलदेव तो गंभीर गुरुरावो । ब्रंहाआनंदाख्य सहजानंद योगीराज पूर्णानंद चित्तीं साटवा तुम्ही सदानंद ॥ २५ ॥ देव नारायणगुरु अवतार दाहा रचुनि नटूनि प्रकटला धरुनी च हा आवतार आकरावा । सहजराजकुळींशि भूषण बाप नारायण आतां लक्ष्मी–विराजित ऐकनाथपरंपरा ऐका ॥ २६ ॥ देवनारायण तयाचा तो चि पूर्णानंद होउनि शिवमुखी प्रकटोनि गीताचंद्रिका प्रकटी । मुख्य आदी शिवगुरु मग दत्त योगीराज बरवा चंद्रआश्रम या जनी च जनार्दनू जाण

॥ २७ ॥ ऐकनायक तो चि जाली बाळकृष्ण चि होउनी लक्ष्मीशस्वपदीं ठेविलें नारायणाकार । तो चि लक्ष्मी माय होय परंपरारूपे चि हे प्रत्यक्ष गोदा आपण जाली कन्यकारूप ॥ २८ ॥ मेरु सहजानंद नारायण गुरु स्वपरंपरामंदार येकोबाचि लक्ष्मी संप्रदायाची । येका रुपा भूमिका तेथें सहज तें बीज पडतां सरळ हा शिवरामअंकुर सूक्ष्म अंकुरला ॥२९॥ भक्तिगोदेचा जळें हा वाडतां वाक्पुष्पमेळी सुफल हा गीतार्थ कैसा सफलीतू फळला । पद्यस्वनामोदगंधा वासवी सर्वस्वदेशे परंतु जे ग्राहिक सज्जन चि सेविती हें ॥ ३० ॥ आंठुळी ते टाकणे की वरिल साली काढणें हे कांहीं नलगे सेवणे सहज चि फळती । क्षीरआवर्णव येकनायक लक्ष्मीयेचा गर्भ तेथें गोडिये तो सहज नारायण असे हो कां ॥ ३१ ॥ तेथूनी शिवरामचंद्र तया च पासुनि चंद्रिका त्रैलोक्य नुजळी रात्रीदिवस ग्रशितु चि निघे । म्हणुनि गीताचंद्रिका हे संजयो धृतराष्ट्र तो संवाद आर्तचकोरतृष्णा ॥ ३२ ॥ व्यासआननपद्मगीता ध्यावया मकरंद तेथें भ्रमर होउनि पातलों मग चंद्रिका ध्वनयी । वित्पती मज नाकळे सद्भक्ति म्हणिजे काय कीं साधन मुळीहूनी काहिं नेणे ज्ञान कैंच काय ॥३३॥ मी असा गीतार्थरचना रचित म्हणणे हा विनोद निलाजिरा संत्ता पुढें वटवटित मी आलों । श्रीमहाभगवंतगीतागर्भ कोठें पामराहुनि पामरु हे बुध्दि कोठें अर्थ वित्रराया ॥ ३४ ॥ वृक्षफळ ते गगनगर्भी ते धराया उडत वामन देखतां उपहास तैसा बुध्दि हे माझी । हा विनोदु पहावया व्यासादिमुनिवर पातले आणीक ही ते संतु मुकुंदराजादिक आणि नाम ॥ ३५ ॥ ज्ञानदेवादीक दिगंबरदास सहजानंद येका दत्त सुंदर केशवादिक पावले मागें । काशिविश्वनाथशिश नृहरी भगवंत मृत्युंजय ही परमानंद आणि अनंतजिवसींधु ॥ ३६ ॥ राम तो जयराम भानू अंबरषी हे वृत्ती आगोर ते ही आले पहावया कौतूक । संतजन हे देखता सर्वे ॥२७॥

## श्री शिवराम महाराजकल्याणकरकृत.

१ भक्तिमार्ग आन्हिक व प्रबोध सुधाकर ( सटीक ) किं. १॥४
२ श्रीगुरुगीता व अपरोक्षानुभूति ( सटीक ) किं. ॥१२
३ श्रीगीताचंद्रिका किं. १

## विक्रीस तयार आहेत.

कोणत्याही पुस्तकास शिवराममहाराजांचें चरित्र फुकट देण्यांत येईल.

**यशवंत गंगाधर हुम्रीकर.**

मॅनेजर, पूर्णानंद कार्यालय,
मु. चिटगोपा,
व्हाया गुलबर्गा
( निजाम स्टेट )